
महाराष्ट्राचा आर्थिक विकास



प्र. चिं. शेजवलकर

म हा रा ष्ट्रा चा

आ र्थि क वि का स

लेखक

प्रा.चि. शेजवलकर

व्हीनस बुक स्टॉल : पुणें २

प्रकाशक
सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.
व्हीनस बक स्टॉल : पुणें २

★

प्रथमावृत्ति
१९ ऑक्टोबर १९६१

★

★

चित्रकार : सुधाकर खाजगीवाले

★

मूल्य रु. १ = २५

★

मुद्रक
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण, पुणें २

उ|३८

थोडेसें आधी

महाराष्ट्राची सर्वांगीण उन्नति व्हावी अशी आपली सर्वांची सदिच्छा असते. परंतु ज्या महाराष्ट्राची आपण उन्नति करूं इच्छितों, त्याची आर्थिक, भौगोलिक, औद्योगिक वा नैसर्गिक पार्श्वभूमि काय आहे, महाराष्ट्राची सद्य:स्थिति सुधारण्याच्या दृष्टीने सरकारी व बिनसरकारी व्यक्तींनी वा संस्थांनी काय काय केलें आहे, आणि काय काय करूं इच्छितात यासंबंधीची आपणांस सविस्तर माहिती नसते. आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनांत त्यासाठी आपणांस स्वास्थ्यहि मिळत नाही.

म्हणून अशी माहिती देणारी छोटीशी पुस्तिका लिहून देण्याची आम्हीं बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. प्र. चिं. शेजवलकर, एम्. कॉम्., पीएच्. डी. यांस विनंति केली. आमच्या विनंतीस मान देऊन अत्यंत थोडक्या वेळांत त्यांनी ही पुस्तिका लिहून दिली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

माझे मित्र व विमा, बँकिंग, सहकार, उद्योगधंदे या क्षेत्रांतील मुरब्बी तज्ज्ञ श्री. दा. वा. पोतदार यांनी या पुस्तिकेस प्रास्ताविक लिहून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

चित्रकार सुधाकर खाजगीवाले व संगम प्रेसचे श्री. पटवर्धन हे आमच्या घरचे. त्यांनी आपलें काम चोख केलें ! त्याबद्दल त्यांचे आभार मानण्याचा उपचार त्यांना आवडणार नाही, म्हणून त्यांस धन्यवाद !

आमच्या कल्पनेचें वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

अ. ह. लिमये

प्रास्ताविक

मराठी भाषिकांचें महाराष्ट्र राज्य झाल्यामुळे स्वतंत्रपणें व स्वावलंबाने स्वतःची आणि स्वबांधवांची उन्नति घडवून येण्याचा मार्ग सुलभ झाला असावा अशी सर्वसामान्य समजूत व प्रतिक्रिया आहे. परंतु ती तितकीशी वस्तुस्थिति-निदर्शक नाही असें प्रत्यक्षांत बारकाईने पाहिल्यास आढळून येईल. याचें कारण महाराष्ट्राच्याच गतेतिहासांत आपणांस सांपडेल. महाराष्ट्राच्या प्रादेशिक आणि भौगोलिक परिस्थितींतील वैशिष्टचें लक्षांत घेतलीं असतां वरील विधानांचा पुरावा स्पष्टपणें आढळेल.

स्वभावतःच महाराष्ट्रीय लोक वणिक् वृत्तीशीं असहकार करून वागणारे आहेत. आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणांत व्यवसाय-उद्योग करून धनसंचय करण्याऐवजी परखडपणें कष्टाचा आणि स्वावलंबनाचा व्यक्तिनिष्ठ संसार चालविणें हाच त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे असें दिसतें.

निसर्गाची कृपा कांही प्रमाणांत जी सिद्ध आणि उपलब्ध आहे त्याचासुद्धा शक्यतों फायदा योग्य ते उपक्रम अवलंबून आम्हीं करून घेतलेला दिसत नाही. सह्याद्रीच्या आसमंतांत ज्या नद्या कांही खोऱ्यांतून वाहतात तेथे योग्य त्या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून आधुनिक स्थापत्यशास्त्राच्या करामतीने प्रचंड प्रमाणांत वीज उत्पादन होऊं शकते ही गोष्ट टाटाने प्रत्यक्षांत आणून आम्हांस दाखविली.

अशा रीतीने मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग केल्यामुळेंच आज मुंबई शहरास जें अद्वितीय असें स्थान देशाच्या औद्योगीकरणांत प्राप्त झालें आहे, तें होतें ना.

मुंबई येथें निसर्गानें सिद्ध झालेलें व बारमहा उपयोगी पडणारें व लष्करी दृष्ट्या अत्यंत सुरक्षित असें बंदर आहे हा विशेष लक्षांत घेतां टाटाच्या या दूरदर्शी योजनेमुळे त्या शहराला जी आर्थिक संपन्नता प्राप्त झाली आहे त्याचा अभिमान महाराष्ट्रास वाटणें यथार्थच आहे. त्यामुळे कोंकणपट्टीसारख्या मागासलेल्या व आजवर आर्थिक विकास न होऊं शकलेल्या विभागांतील लक्षावधि लोकांना रोजगार आणि पोटापाण्याचा व्यवसाय करण्यास संधि उपलब्ध झालेली आहे. तरी सुद्धा या बंदराच्या वैशिष्टयपूर्ण परिस्थितीला साजेसा असा नौकारचनांचा (Boat Building) उद्योग आम्हीं केलेला नाहीं. कोल्हापूर विभागांतील खनिज संपत्तीचा विचार केला असतां तेथें प्रचंड प्रमाणांत उपलब्ध असणाऱ्या बॉक्साइटपासून ॲल्युमिनिअमचा कारखाना काढला गेला असता तर तेथील विभागामध्यें आज दिसते त्यापेक्षा फार वेगळी आर्थिक परिस्थिति अनुभवास आली असती. फार काय, ॲल्युमिनिअमचा कारखाना काढण्यासाठी परवाना मिळविल्यानंतरहि आवश्यक तेवढे रस्ते आणि मुख्यतः वीज उपलब्ध नसल्यामुळे हा कारखाना निघूं शकला नाही.

कोल्हापूर, कांही प्रमाणांत सोलापूर, पुणें आणि अहमदनगर या जिल्ह्यांतून उसाचें जें उत्तम पीक तयार होतें त्यांतून साखर काढण्याचा उपक्रमहि प्रथमतः परदेशी भांडवल असलेल्या कंपन्यांनीच केलेला आढळतो. आणि अगदी अलीकडे म्हणजे गेल्या २५–३० वर्षांत कांही महाराष्ट्रीयांनी तिकडे लक्ष दिल्याचें आढळतें. व त्यांतहि सर्वतोपरी ज्यांची मायबोली मराठी आहे असेच सर्वजण आहेत असें म्हणवत नाहीं.

अनेकांच्या अनुभवसिद्ध ज्ञानांतून जो फायदा प्रत्यक्षांत शेतकरी आणि जनता यांना मिळावयास हवा होता तो मिळाला नाही असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें आणि म्हणून गेल्या ६–७ वर्षांत सहकारी पद्धतीचा अवलंब करून वरील जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं साखर-कारखाने काढण्यांत आलेले दिसतात. परंतु युद्धोत्तर काळांतील चढत्या किंमती लक्षांत घेतां अशा कारखान्यांमध्ये जी परदेशी यंत्रसामग्री वापरण्यांत आलेली आहे तीमुळे झालेल्या अवास्तव भांडवली खर्चास तोंड देण्याचा कठिण प्रसंग प्राप्त झालेला आहे. एकदम दहाबारा कारखाने उभारण्याचें धोरण जाहीर केल्यामुळे परदेशांतील यंत्रसामग्रीची किंमत जी आधीच वाढत होती ती अवास्तव वाढली असल्यास नवल नाही. यांतहि दूरदृष्टि आणि योजना यांचाच अभाव दिसतो.

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांनी मळीपासून अल्कोहोल तयार करून त्याची दारूच केली पाहिजे असें नाही. सिंथेटिक रबर आणि ॲसिटेट यार्न तयार करण्याचा चंग बांधला तर त्यांनी पत्करलेल्या आर्थिक जबाबदाऱ्या पेलण्यास ते समर्थ होतील, एवढेंच नव्हे तर सरकारने पुरस्कारलेल्या औद्योगीकरणाच्या विकेंद्रीकरणाच्या

योजनेंतील फार मोठें यश मिळविण्याचा मान त्यांना प्राप्त होईल. आमच्या राज्याच्या योजनेंत या गोष्टीचा नामनिर्देशहि नाही.

हेळवाक, चिपळूण विभागांत कोयना नदींतील पाण्याचा उपयोग करून वीज उत्पादन करण्याचा महाप्रचंड प्रकल्प प्रत्यक्षांत येण्याचे आधी तो तेथे तसा करूं नये असें म्हणणारेहि महाराष्ट्रीय पंडितच होते. आज १९६१ सालांत अशी वस्तु-स्थिति आहे की कोयना योजनेच्या पहिल्या टप्प्यांतील सर्वच्या सर्व विजेस मागणी आहे व त्याशिवाय टाटांच्या तुर्भे येथील वीजकेंद्रामध्ये पूर्वीच्या तीन सेट्स्‌शिवाय १२५ मेगॅवॉट शक्तीचीं वीज उत्पादन करणारीं यंत्रें नव्याने बसविण्यांत येणार आहेत. तरीहि मागणीइतका पुरवठा होत नाही म्हणून २५ ते ३० कोटि रुपये खर्च करून कल्याण–नाशिक विभागांत ३०० मेगॅवॉट वीज उत्पन्न करण्यासाठी व्यवस्था करावी लागणार आहे. याखेरीज ठाणें जिल्ह्यांत तारापूर येथे भारत-सरकारमार्फत ३०० मेगॅवॉटशक्तीचें अणुशक्तीवर चालणारें वीजकेंद्र होऊं घातलें आहे. त्यांतील निम्मी वीज महाराष्ट्रास व निम्मी गुजराथेस मिळणार आहे. पारस, भुसावळ आणि खापरखेडा येथे वीज उत्पादनाच्या योजनांत आणखी भर तिसऱ्या योजनेच्या काळांत टाकण्याचें यापूर्वीच निश्चित झालेलें आहे.

वीज उत्पादनाच्या वरील कार्यक्रमावरून महाराष्ट्रांत मुंबई, ठाणें, कल्याण या भागांतील परिसरांत फार मोठ्या प्रमाणांत औद्योगीकरण चाललेलें आहे हें सुस्पष्ट होईल.

पाणीपुरवठा व पाटबंधारे यांच्या योजना सत्वर हातीं घेतल्यावांचून महाराष्ट्रांतील शेतीव्यवसायास बरे दिवस येणें कठिण वाटतें. कारण महाराष्ट्रांतील जमीन ही अनेक ठिकाणीं दुय्यम दर्जाची व निकस आहे. पावसाचें प्रमाण फारच कमी व अनिश्चित असल्यामुळे शेतीव्यवसायाला शताकानुशतकें विपन्नावस्था भोगावी लागत आहे. पाणी पुरवठ्याच्या अलीकडील योजनांतून फक्त सहा टक्के जमीन भिजली जात आहे आणि नियोजित योजना कार्यान्वित झाल्यास जास्तींत जास्त २० टक्के जमीनच भिजेल म्हणून महाराष्ट्रीय शेतकऱ्यांस कोरडवाहू शेतीचेंच ज्ञान मिळवून आधुनिक पद्धतीने दर एकरीं उत्पन्न वाढविण्यास उद्युक्त करण्यासाठी सर्वतोपरी शिकस्तीचे प्रयत्न करण्यावांचून दुसरा प्रत्यवायच नाही.

सहकारी-जमीन-तारण-बँका आणि राज्य सहकारी बँक यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत पीकउत्पादनासाठी आणि जमीन सुधारण्यासाठी देण्यांत येत आहे त्याचा विनियोग यथायोग्य व यथाठायीं झाल्यास शेतकऱ्यांस बऱ्याच प्रमाणांत मदत होऊन त्यांची आर्थिक स्थिति सुधारूं लागेल. परंतु असें सर्व ठिकाणीं नीटपणें व्यवहारांत अनुभवास येत आहे किंवा कसें याची बारकाईने वारंवार चौकशी करून कांही अपप्रकार चालत असतील तर ते बंद करणें इष्ट ठरेल. याबाबत तूर्त इतकेंच पुरे.

महाराष्ट्रीयांस ऐश्वर्यसंपन्न व्हावयाचें असेल तर एक गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते. ती म्हणजे त्यांनी पूर्वापार रूढीप्रमाणे लक्ष्मीची पूजा करावयास शिकावें. जेथे जेथे लक्ष्मीचा वास असेल त्या त्या व्यक्ती व ते ते व्यवसाय यांबद्दल दुस्वास करण्याचें टाकून द्यावें. लक्ष्मीदेवीची उपासना होत नसेल तर निदान अवहेलना तरी करूं नये. कारण अवहेलना केल्यास तिजकडून वरप्राप्ति होणें केवळ अशक्य आहे.

अगदी अलीकडील कांही नव्या तत्त्वनिष्ठांना यांत कदाचित् चिमटा घेतल्या-सारखें वाटेल; परंतु प्रत्येक व्यक्तिमात्राने बुद्धीची आणि परिश्रमांची पराकाष्ठा केल्यावांचून संपत्ति प्राप्त होत नसते. आणि अशा संपत्तीच्या अभावीं सुखसंपदा कशी लाभेल ?

असो. माझे मित्र प्रा. शेजवलकर यांनी या विषयाचा अभ्यास करून जे विषय या पुस्तकांत मांडले आहेत, ते परिशीलन करण्याजोगे आहेत. सरकारी योजनांच्या पलीकडे जाऊन समाजाने स्वावलंबी बनून परिश्रमपूर्वक आपली आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नति करून घेणें किती आवश्यक आहे हें या पुस्तकाने ध्यानांत येईल.

नवनिर्मित महाराष्ट्र राज्याच्या सुप्त आकांक्षांना व्यवहारांत मूर्त स्वरूप येऊन महाराष्ट्रीयांचे संसार सुखसमृद्धीचे होण्यासाठी महाराष्ट्रीयांनी सर्वतोपरी झटावें हेंच उचित होय.

विजयादशमी,
१९ ऑक्टोबर १९६१

अनुक्रमणिका

निवेदन

एक मे १९६० रोजीं महाराष्ट्र-राज्याची निर्मिति झाल्यामुळे मराठी भाषिकांच्या कार्यशक्तीला राष्ट्राच्या उभारणीस हातभार लावण्याचें आवाहन मिळालें आहे. उत्तम राज्यकारभार आणि प्रगतिशील दृष्टिकोन असलेल्या या नवीन राज्याने मोठ्या उत्साहाने विकासकार्यास सुरुवात केली. महाराष्ट्राचा आर्थिक विकास कोणत्या दिशेने व्हावा ह्यावर अलीकडे विविध थरांमध्ये चर्चा झाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ, द. गो. कर्वे, वैकुंठलाल मेहता, लालचंद हिराचंद, आ. रा. भट, दा. वा. पोतदार इत्यादि विचारवंतांच्या प्रेरणेने आणि मुंबई, पुणें, नागपूर व औरंगाबाद येथील चेंबर्स ऑफ कॉमर्स यांच्या सहकार्याने स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदे'ने महाराष्ट्राच्या आर्थिक विकासावर केलेलें विस्तृत विवेचन ह्या दृष्टीने स्पृहणीय आहे. हेंच विवेचन आणि त्याचबरोबर आपण आत्तापर्यंत केलेली प्रगति व यापुढे आपणांस उचलाव्या लागणाऱ्या जबाबदारीचें स्वरूप प्रत्येक विषयांत थोडाफार व्यासंग असणाऱ्या जिज्ञासू वाचकांच्यापुढे थोडक्यांत मांडावें हा या प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश आहे.

महाराष्ट्राचा आर्थिक अभ्युदय होण्यास येथे फार अनुकूल पार्श्वभूमि आहे. सहकारी आंदोलनांत महाराष्ट्राने आघाडी मारली आहे. सामाजिक सुधारणांबाबत महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर होता. दारिद्र्याची, अडचणींची, विरोधाची महाराष्ट्राला चांगलीच सवय असल्यामुळे कोणत्याही परिस्थितींत कष्ट करण्याची आपली तयारी असते. सांस्कृतिक व बौद्धिक प्रगल्भता येथे मोठी असल्यामुळे बऱ्या-वाईटाची महा-

राष्ट्राला चांगली पारख करतां येते. मुख्य म्हणजे आर्थिक विकासाला कायदा, सुव्यवस्था, कार्यक्षम शासनपद्धति व अंतर्गत राजकीय वातावरणांत स्थैर्य हवें असतें. ह्या सर्व बाबतींत महाराष्ट्राइतकें आदर्श राज्य दुसरें क्वचितच असेल. येथील सत्तारूढ पक्षांत संसदीय व संघटनात्मक अशा दोन्ही पातळींवर धोरण व कार्यपद्धति ह्यांबाबत सुसूत्रता व एकजिनसीपणा आहे. लोकाभिमुख व लोकसंग्राहक वृत्तीमुळे विरोधकांमध्येही प्रिय असलेल्या आणि सर्वांच्या आदरास पात्र झालेल्या ना. यशवंतरावजी चव्हाणांसारख्या व्यक्तीचें नेतृत्व महाराष्ट्रांतील धनिक, श्रमिक आणि बौद्धिक शक्तींना एकत्र आणून सहकार्य निर्माण करूं शकत आहे.


ह्या पुस्तकाचें स्वरूप मर्यादित आहे याची जाणीव आहे. जिज्ञासूंना अधिक विचार करण्याची चालना मिळावी इतपत विवेचन आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीचा व प्रश्नांचा परिचय व्हावा ह्या दृष्टीने माहिती देण्यावर भर आहे. पुणें विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळातर्फे विविध बहिःशाल केंद्रांत ह्या विषयावर व्याख्यानें देण्याच्या निमित्ताने बरीचशी माहिती गोळा झाली होती. श्री. अनंतराव लिमये, प्रकाशक, व्हीनस बुकस्टॉल, पुणें, ह्यांनी त्यांच्या नेहमीच्या लाघवी भाषेत ही माहिती पुस्तकरूपाने नीट मांडण्याचा चिकाटीपूर्वक पण प्रेमळ आग्रह केला, म्हणूनच काम हातावेगळें झालें.

'किर्लोस्कर' मासिकाच्या ५०० व्या अंकांत मीं लिहिलेल्या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासावरील लेखाबाबत कित्येक अपरिचित वाचकांनीही दाखविलेल्या समाधानामुळे पुस्तक पुरें करण्यास प्रोत्साहन मिळालें. 'किर्लोस्कर' मासिकांतील 'महाराष्ट्रांत खूप उद्योग-धंदे काढू या!' ह्या विषयावरील लेख, आवश्यक ते फरफार करून, ह्या पुस्तकांत पुनर्मुद्रित करण्यास संमति दिल्याबद्दल 'किर्लोस्कर'चे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर ह्यांचा कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश येथे करावासा वाटतो.

श्री. दा. वा. पोतदार यांनी प्रस्तावना लिहून नेहमीप्रमाणेच ह्याहि वेळीं मला उपकृत केलें आहे. त्यांनीं वेळोवेळीं केलेल्या अचूक मार्गदर्शनामुळे मी त्यांना गुरुस्थानीं मानतों हें या निमित्ताने व्यक्त करण्याची मला संधि मिळत आहे याचा आनंद वाटतो.

महाराष्ट्र सरकारने संदर्भासाठी व जिज्ञासूंच्या अभ्यासासाठी भरपूर आंकडेवारी गोळा करून प्रसिद्ध केली आहे ही गोष्ट पुस्तक लिहितांना आढळली हें मुद्दाम नमूद करून हें निवेदन संपवितों.

शा. चि. शेजवलकर



१

अविकसित प्रदेश आणि नियोजन

प्रास्ताविक

पारतंत्र्यांतून अलीकडे मुक्त झालेल्या आशिया आणि आफ्रिका खंडांतील देशांपुढे स्वतःचा आर्थिक विकास झपाट्याने करून घेण्याचा प्रश्न इतका गहन आणि तातडीचा आहे की त्या त्या देशांतील लोकांनी पद्धतशीर व सुसंगत प्रयत्न केल्याखेरीज तो सुटणार नाही. सुदैवाने पंचवार्षिक योजनांच्या स्वरूपांत भारताने हे प्रयत्न ताबडतोब सुरू केले. आता दुसरी पंचवार्षिक योजना पुरी करून तृतीय पंचवार्षिक योजना आपण नुकतीच हातांत घेतली आहे. योजना हा यापुढे भारतीयांचा परवलीचा शब्द होऊन बसणार आहे. आपला सबध देश अविकसित प्रदेशांत मोडला जातो. अर्थातच भारतांतील विविध प्रदेशदेखील अविकसितच आहेत व म्हणून संपूर्ण देशाला नियोजनाच्या रूपाने जसे पद्धतशीर प्रयत्न करावे लागत आहेत तसेच प्रयत्न कमीअधिक प्रमाणांत भारतांतील प्रत्येक प्रांतानेदेखील करावयास हवे आहेत. संपूर्ण देशाचें असलेलें नियोजन मंडळ देशांत आर्थिक विकास समतोलपणें व्हावा म्हणून प्रयत्न करीत असतांना प्रत्येक राज्याच्या विकासाकडे लक्ष देत असतेंच. परंतु खंडप्राय अशा भारतासारख्या विशाल देशांत यात त्या प्रांतांतल्या लोकांनीहि नियोजनाची जाणीव ठेवली पाहिजे. प्रत्येक

राष्ट्राला चांगली पारख करतां येते. मुख्य म्हणजे आर्थिक विकासाला कायदा, सुव्यवस्था, कार्यक्षम शासनपद्धति व अंतर्गत राजकीय वातावरणांत स्थैर्य हवें असतें. ह्या सर्व बाबतींत महाराष्ट्राइतकें आदर्श राज्य दुसरें क्वचितच असेल. येथील सत्तारूढ पक्षांत संसदीय व संघटनात्मक अशा दोन्ही पातळींवर धोरण व कार्यपद्धति ह्यांबाबत सुसूत्रता व एकजिनसीपणा आहे. लोकाभिमुख व लोकसंग्राहक वृत्तीमुळे विरोधकांमध्येही प्रिय असलेल्या आणि सर्वांच्या आदरास पात्र झालेल्या ना. यशवंतरावजी चव्हाणांसारख्या व्यक्तीचें नेतृत्व महाराष्ट्रांतील धनिक, श्रमिक आणि बौद्धिक शक्तींना एकत्र आणून सहकार्य निर्माण करूं शकत आहे.


ह्या पुस्तकाचें स्वरूप मर्यादित आहे याची जाणीव आहे. जिज्ञासूंना अधिक विचार करण्याची चालना मिळावी इतपत विवेचन आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीचा व प्रश्नांचा परिचय व्हावा ह्या दृष्टीने माहिती देण्यावर भर आहे. पुणें विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळातर्फे विविध बहिःशाल केंद्रांत ह्या विषयावर व्याख्यानें देण्याच्या निमित्ताने बरीचशी माहिती गोळा झाली होती. श्री. अनंतराव लिमये, प्रकाशक, व्हीनस बुकस्टॉल, पुणें, ह्यांनी त्यांच्या नेहमीच्या लाघवी भाषेंत ही माहिती पुस्तकरूपाने नीट मांडण्याचा चिकाटीपूर्वक पण प्रेमळ आग्रह केला, म्हणूनच काम हातावेगळें झालें.

'किर्लोस्कर' मासिकाच्या ५०० व्या अंकांत मीं लिहिलेल्या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासावरील लेखाबाबत कित्येक अपरिचित वाचकांनीही दाखविलेल्या समाधानामुळे पुस्तक पुरें करण्यास प्रोत्साहन मिळालें. 'किर्लोस्कर' मासिकांतील 'महाराष्ट्रांत खूप उद्योग-धंदे काढूं या!' ह्या विषयावरील लेख, आवश्यक ते फरफार करून, ह्या पुस्तकांत पुनर्मुद्रित करण्यास संमति दिल्याबद्दल 'किर्लोस्कर'चे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर ह्यांचा कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश येथे करावासा वाटतो.

श्री. दा. वा. पोतदार यांनी प्रस्तावना लिहून नेहमीप्रमाणेच ह्याहि वेळीं मला उपकृत केलें आहे. त्यांनीं वेळोवेळीं केलेल्या अचूक मार्गदर्शनामुळे मी त्यांना गुरुस्थानीं मानतों हें या निमित्ताने व्यक्त करण्याची मला संधि मिळत आहे याचा आनंद वाटतो.

महाराष्ट्र सरकारने संदर्भासाठी व जिज्ञासूंच्या अभ्यासासाठी भरपूर आंकडेवारी गोळा करून प्रसिद्ध केली आहे ही गोष्ट पुस्तक लिहितांना आढळली हें मुद्दाम नमूद करून हें निवेदन संपवितों.

भा. चिं. शेजवलकर



१

अविकसित प्रदेश आणि नियोजन

प्रास्ताविक

पारतंत्र्यांतून अलीकडे मुक्त झालेल्या आशिया आणि आफ्रिका खंडांतील देशांपुढे स्वतःचा आर्थिक विकास झपाट्याने करून घेण्याचा प्रश्न इतका गहन आणि तातडीचा आहे की त्या त्या देशांतील लोकांनी पद्धतशीर व सुसंगत प्रयत्न केल्याखेरीज तो सुटणार नाही. सुदैवाने पंचवार्षिक योजनांच्या स्वरूपांत भारताने हे प्रयत्न ताबडतोब सुरू केले. आता दुसरी पंचवार्षिक योजना पुरी करून तृतीय पंचवार्षिक योजना आपण नुकतीच हातांत घेतली आहे. योजना हा यापुढे भारतीयांचा परवलीचा शब्द होऊन बसणार आहे. आपला सबध देश अविकसित प्रदेशांत मोडला जातो. अर्थातच भारतांतील विविध प्रदेशदेखील अविकसितच आहेत व म्हणून संपूर्ण देशाला नियोजनाच्या रूपाने जसे पद्धतशीर प्रयत्न करावे लागत आहेत तसेच प्रयत्न कमीअधिक प्रमाणांत भारतांतील प्रत्येक प्रांतानेदेखील करावयास हवे आहेत. संपूर्ण देशाचें असलेलें नियोजन मंडळ देशांत आर्थिक विकास समतोलपणें व्हावा म्हणून प्रयत्न करीत असतांना प्रत्येक राज्याच्या विकासाकडे लक्ष देत असतेंच. परंतु खंडप्राय अशा भारतासारख्या विशाल देशांत यात त्या प्रांतांतल्या लोकांनीहि नियोजनाची जाणीव ठेवली पाहिजे. प्रत्येक

पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम आखतांना म्हणूनच नियोजन मंडळ त्या त्या राज्यांवर सुसंघटित प्रयत्न करण्याची जबाबदारी टाकतें. महाराष्ट्रानेहि आपल्या-पुढील प्रश्न ओळखून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आपण उचलावयाची जबाबदारी कोणती आहे हें ठरविलें आहे. १९६१–६२ चें अंदाजपत्रक सादर करतांना महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्रि बॅ. शेषराव वानखेडे यांनी गेल्या दहा वर्षांत सरकारने महाराष्ट्रांत केलेली प्रगति आणि महाराष्ट्राचा तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम यांविषयी विस्तृत निवेदन केलें तें याच हेतूने होय.

अविकसित प्रदेश

ज्या प्रदेशांत तेथील लोकांची राहणी निकृष्ट दर्जाची आहे, जेथील अर्थव्यवस्था केवळ शेतीवर आधारलेली म्हणजेच एकांगी स्वरूपाची आहे आणि औद्योगी-करणाच्या अभावीं जेथील लोकांचें उत्पन्न कमी आणि सतत खुंटलेल्या स्थितींत असतें अशा प्रदेशांना अविकसित प्रदेश संबोधिलें जातें. अशा प्रदेशांत भांडवलाचा भयंकर तुटवडा असतो. वाकबगार कामगारवर्ग कमी आढळतो. तांत्रिक ज्ञान उपलब्ध होत नसतें. त्यामुळे उत्पादनाच्या पद्धती जुन्या, अधिक खर्चाच्या आणि टाकाऊ असतात. भांडवली साहित्याच्या अभावीं अशा ठिकाणीं औद्योगीकरणाला वाव नसतो. भांडवल व आधुनिक शास्त्रीय ज्ञान नसल्यामुळे शेती करण्याच्या पद्धतीदेखील जुन्या व टाकाऊ असतात. व या सर्वांचा परिणाम म्हणजे अशा प्रदेशांत आर्थिक उत्पन्न वाढण्यास कोठूनहि वाव मिळत नाही. मागासलेल्या प्रदेशांची अर्थव्यवस्था जणू कांही दुष्ट चक्रांतच सतत फिरत असते. दारिद्र्या-मुळे बचत करण्याची लोकांच्यांत पात्रता नसते. त्यामुळे भांडवलनिर्मिति होऊं शकत नाही. त्याचा परिणाम म्हणून तेथे उद्योगधंदे व तज्जन्य व्यवसाय यांना वाव मिळत नाही. त्यामुळे लोकांच्या उत्पन्नांत पुरेशी भर पडत नाहीं व म्हणून त्या प्रदेशांतील दारिद्र्य तसेंच चालू राहतें. अशा तऱ्हेचें हें दुष्ट चक्र मागासलेल्या प्रदेशांची आर्थिक स्थिति डबक्यांतल्या पाण्याप्रमाणे खुंटवून ठवतें.

उद्योगधंद्यांच्या अभावीं अविकसित प्रदेशांतील लोकांचा जमिनीवरील भार वाढतच जातो आणि त्यांतहि दुर्दैव असें की, त्या जमिनीची आधुनिक पद्धतीने मशागत करण्याचें तांत्रिक व भांडवली सामर्थ्य तेथील दरिद्री जनतेजवळ नसल्याने जमिनीची उत्पादनक्षमता उत्तरोत्तर निकृष्ट होत जाते. जमिनीचा कस वेगाने नाहीसा होऊं लागतो. दर एकरीं उत्पादन कमी होऊं लागतें. साहजिकच कृषि-पदार्थांचा दर्जा व प्रमाण खालावत जातें. त्यामुळे कृषिपदार्थांना अन्नधान्याच्या व व्यापारी पिकांच्या जागतिक बाजारपेठेंत चांगली किंमत येत नाही. शेतकऱ्याला पाणीपुरवठ्याचा अभाव, आधुनिक खतें व बीं-बियाणें यांच्याबद्दलचें अज्ञान, शेती-पद्धतीच्या जुन्या परंपरा, दळणवळणाचा अभाव इत्यादि अनेक कारणांमुळे सधन होण्याच्या दृष्टीने आपल्या व्यवसायांत वाढ करणें ही गोष्ट जमत नाहीं.

त्याच्या शेतावरील मजुरांनाहि त्यामुळे तो पुरेसें वेतन देऊं शकत नाही. अपुरें वेतन मिळाल्यामुळे लोकांची राहणी तर निकृष्ट दर्जाची असतेच, पण शिवाय त्यांची शारीरिक व मानसिक वाढहि खुंटून बसण्याचा संभव असतो. दारिद्र्यामुळे प्रत्येक माणसांत आणि एकूण त्या समाजांतहि एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. समाजांतील बौद्धिक व सांस्कृतिक शक्तींवरहि त्याचा परिणाम होऊं शकतो. अशा समाजांत अंधश्रद्धा व अर्थशून्य परंपरा असण्याची शक्यता फार आढळते. अशा लोकांमध्ये आधुनिक, प्रगमनशील दृष्टिकोन आणणें कठीण जातें. मागासलेल्या प्रदेशाचें केवढें भेसूर चित्र वाटतें हें ! पण ही वस्तुस्थिति आशिया-आफ्रिका खंडांतील बहुतेक सर्व देशांत आहे हें सत्य नाकारून चालणार नाही.

आपण किती मागे आहोंत याची कल्पना व्यवहारांत आढळणाऱ्या अनेक कसोटचा लावून अजमावतां येईल. १९५८ सालीं दर माणशीं असलेलें उत्पन्न अमेरिकेंत सुमारें दहा हजार रुपये होतें. इंग्लंडमध्ये हेंच उत्पन्न साडेचार हजार रुपये, जपानमध्ये बाराशे आणि सिलोनमध्ये सहाशे होतें. पण भारतांत हें उत्पन्न फक्त २७६ रुपये होतें. अमेरिकेंतील माणूस भारतीयापेक्षा पस्तीस पटीने श्रीमंत आहे असा याचा अर्थ झाला. तेथे दर तीन माणसांमागे एक मोटारगाडी उपलब्ध आहे. तेथील मजूर आणि शेतकरी स्वतःच्या घरांत राहून स्वतःच्या गाडीने गिरणींत किंवा शेतावर जातो. त्याच्या घरीं उपयुक्त अशीं सर्व प्रकारचीं आधुनिक यंत्रें आणि टेलिव्हिजनहि असतें. कमीअधिक अंशानें असेंच समृद्ध जीवनमान इतर पाश्चात्य राष्ट्रांत आणि दुसऱ्या युद्धांत अपरिमित हानि झालेल्या जपान व जर्मनींतहि आज आढळतें. अखिल भारतांत जेवढे टेलिफोन आज वापरले जातात त्याच्या दीडपट टेलिफोन जपानमधील एकटचा टोकिओ शहरांत आहेत !

मागासलेल्या प्रदेशांत भौगोलिक व नैसर्गिक संपत्ति कित्येकदा भरपूर असते. परंतु उद्योगधंद्यांच्या अभावीं नैसर्गिक संपत्तीचा पुरेसा उपयोगच केला जात नाही. कित्येक वेळा श्रीमंत मालकराष्ट्रें येथील नैसर्गिक संपत्ति आपल्या देशांत घेऊन जातात. इंग्लंडने भारतांतून वर्षानुवर्षें विविध प्रकारची खनिज संपत्ति आणि कापूस, तेलबिया, तंबाखू इत्यादि व्यापारी पिकें आपल्या देशांत नेलीं. नद्यांना बांध घालून अडविलेल्या पाण्याचा शेतीसाठी व वीजनिर्मितीसाठी करावयाचा उपयोगहि भांडवली व तांत्रिक शक्तीच्या अभावीं राहून जातो. पुरेसे व्यवसाय नसल्यामुळे कित्येक लोकांना रोजगारच मिळत नाही. कित्येक देशांत तर ७० ते ८० टक्के लोकांचें वैयक्तिक उत्पन्न देशांतील सरासरी उत्पन्नाच्या आणि दारिद्र्यरेषेच्या खाली असतें.

वर दर्शविलेल्या वैगुण्यांतून इतर बारीकसारीक दोष, मर्यादा व अडचणी अविकसित प्रदेशांत निर्माण होतात. अशा ठिकाणीं उत्पादन अतिशय कमी असल्यामुळे व नेमकी अशा प्रदेशांत लोकसंख्या जास्त असल्यामुळे पुढील विकासासाठी

गुंतविण्याकरिता म्हणून कांहीच शिल्लक राहात नाही. दारिद्र्यामुळे एकूण मालाला मागणी कमी असते व बाजारांत मागणी कमी असल्यामुळे उद्योगधंद्यांना वाव न राहून दारिद्र्य चालूंच राहतें. निरक्षरता, तांत्रिक अज्ञान, स्थलांतर करण्याची इच्छा, विना उपयोग पडून राहिलेलीं उत्पादनाचीं साधनें हीं चिन्हें अविकसित प्रदेशांत प्रामुख्याने दिसतात.

अविकसित प्रदेश मागे राहण्यास तेथील पूर्वीची राजकीय व सामाजिक परिस्थितीही कारणीभूत असते. बहुतेक अविकसित प्रदेश कित्येक वर्षे पारतंत्र्यांत होते. त्यामुळे या देशांचा नैसर्गिक संपदेचा जास्तींत जास्त उपयोग करून उत्पादन वाढविण्याचा व अधिक रोजगार निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न मालक-राष्ट्रांनी केलाच नाही. कच्चा माल निर्माण करणारा आणि श्रमपुरवठा करणारा एक वडिलोपार्जित मळा म्हणूनच वसाहतीकडे बघितलें जाई. मागासलेल्या प्रदेशांतील सामाजिक संस्था, रूढी व पद्धति यादेखील प्रगतीच्या आड येऊं शकतात. अशा प्रदेशांत तीव्र आर्थिक विषमतेमुळे मूठभर श्रीमंत वर्ग आणि गरीब बहुजनसमाज यांच्यांत व्यवहार व सांस्कृतिक देवघेव कमी होते. परस्परांतील पूर्वग्रह अधिक तीक्ष्ण होत जातात. गरीब जनतेचा आर्थिक व शैक्षणिक विकास होऊं शकेल असे प्रयत्नच केले जात नाहीत. परकीय सत्ता निवडक श्रीमंतांना हातांशीं घेऊन गरिबांच्या विकासाचें दालन उघडण्याकडे दुर्लक्ष करते; कारण त्यामुळेच ती सत्ता तेथे सातत्याने जगूं शकण्याची आशा असते.

नियोजन

वर वर्णिलेल्या आर्थिक दुष्ट चक्रांतून वाट फोडणें एकएकट्या निर्धन व्यक्तीला जरी शक्य नसलें तरी सामुदायिक रीतीने जनतेच्या प्रातिनिधिक संस्थेला, म्हणजे सरकारला, शास्त्रीय व पद्धतशीर प्रयत्न करणें फारसें अवघड नसतें. भारतांत नियोजन मंडळाची स्थापना यासाठीच करण्यांत आली, आणि एकामागून एक पांच पंचवार्षिक योजना कार्यवाहींत आणण्याचें मंडळाने ठरविलें.

देशांतील उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग शास्त्रीय व पद्धतशीर मार्गांनी करणें म्हणजे नियोजन अशी नियोजनाची स्थूल व्याख्या करतां येईल. किंवा अधिक सुलभ शब्दांत सांगावयाचें झाल्यास नियोजन म्हणजे देशांतील उपलब्ध साधनसामुग्रीचा उपयोग कोठे, कसा, किती व केव्हा करावयाचा ह्यासंबंधी मध्यवर्ती तज्ञ मंडळाने ठरविलेला सुसंगत, सुसूत्र व पद्धतशीर कार्यक्रम होय. नियोजन करावें या निर्णयामळे आपोआप अगर ताबडतोब उपलब्ध भौतिक साधनसामुग्री वाढूं शकत नाही. प्राध्यापक धनंजयराव गाडगीळांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, नियोजकांचा प्रयत्न असा असतो की, समाजांतील उपभोगाचें व्यवस्थित सूत्रीकरण करावें आणि शक्य व आवश्यक असेल तर त्यांत कपातही घडवून आणावी; भांडवली साधनसामुग्रीचा सुसज्जता योग्य रीतीने होण्यासाठी दीर्घ

कालीन योजना बनवून तींत अधिकाधिक सुधारलेल्या तंत्राचा वापर करीत जावें भांडवली साधनसामुग्रीचा उपयोग करण्याची कामगारवर्गाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शिक्षणाचा कार्यक्रम आखावा, आणि सामाजिक स्थैर्य व शांतता टिकविण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचें वांटप अधिक चांगलें करावें.

नियोजनाचीं उद्दिष्टें बहुविध व व्यापक असल्यामुळे आणि त्यासाठी करावा लागणारा प्रयत्न भांडवली खर्चाचा आणि विस्तृत संघटनांना लागणारा असल्यामुळे नियोजनाचें नियंत्रण व मार्गदर्शन मध्यवर्ती संस्थेकडूनच, म्हणजे सरकारकडून व्हावें लागतें. सुरुवातीला नैसर्गिक, मानवी आणि भांडवली साधनसंपत्ति, जेवढी उपलब्ध असेल, तेवढी घेऊनच नियोजनास प्रारंभ करावा लागतो. पहिली योजना त्यामुळे मर्यादित स्वरूपाची असते. आणि सहजगत्या दिसून येईल किंवा जाणवेल येवढें मोठें परिवर्तन आपणांस पहिल्या एक दोन योजनांत दिसून येत नाही. पुढे जसजसें नियोजन दीर्घकाल होत राहतें, तसतशी नैसर्गिक साधनसामुग्री अधिकाधिक चांगल्या प्रमाणांत वापरली व संभाळली जाते. मनुष्यबळ अधिक कार्यक्षम होतें. विविध उद्योगव्यवसायांत श्रमपुरवठा अधिक व्यवस्थित रीतीनें विभागला जातो. भांडवली साधनसामुग्री सतत वाढत जाते व ती उत्पादनक्षमही होत जाते. साधारणतः तिसऱ्या योजनेच्या अखेरीस भारताची अर्थव्यवस्था स्वयंचलित होऊं शकेल व ती ' स्वतंत्र रीतीनें उड्डाण करूं शकेल ' असें जें म्हटलें आहे तें याच संदर्भांत आहे. तेव्हा नियोजन म्हणजे एकदाच करून टाकण्याची गोष्ट नव्हे. तें अखंड, सुसंगत आणि योग्य दिशेनें बरींच दशकें तरी चालावयास पाहिजे. प्रयत्न चोहोंबाजूंनी व सतत व्हावयास पाहिजे. दीर्घकालीन योजनांमध्ये अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांची आवश्यक ती क्रमवारी लावून विकास केला जातो. योजनेंत क्रमवारीला खूपच महत्त्व आहे. ' आधीं कळस, मग पाया ' असें करून चालत नाही. प्रत्येक भारतीयास स्वस्तांत व भरपूर कापड हवें असेल तर लगेच कापडाच्या उत्पादनावर सर्व शक्ति खर्च करून चालत नाही. कापड तयार करणारीं यंत्रेंच आपल्या देशांतल्या देशांत कशीं तयार करतां येतील याचाही विचार करावा लागतो. व त्या यंत्रांच्या निर्मितीकरिता लोखंडाचें उत्खनन करून, व इतर खनिज संपत्ति प्राप्त करून प्रथम पोलादाचें पुरेसें उत्पादन कसें सुरू होईल यावर लक्ष केंद्रित करावें लागतें.

अविकसित देशांतील नियोजन सरकारलाच कां करावें लागतें हा प्रश्न फारसा वादग्रस्त नाही. भांडवली सामुग्री, तांत्रिक ज्ञान, पद्धतशीर प्रयत्न, विस्तृत संघटना राबविण्यासाठी लागणारी सत्ता ही अविकसित देशांत खाजगी संस्थांजवळ सहसा नसते व असली तरी कित्येकदा ती संकुचित व स्वार्थी हेतूंनी राबविली जाण्याचा संभव असतो. आर्थिक विकास करतांना विविध प्रदेशांतील आणि निरनिराळ्या सामाजिक वर्गांतील आर्थिक विषमता नष्ट करणें, तसेंच सर्वांना सामाजिक न्याय व विकासाची समान संधि प्राप्त करून देणें ह्या गोष्टी लोकनियुक्त

मध्यवर्ती सरकारलाच करतां येतात. नियोजन म्हणजे आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता राष्ट्रीय उत्पादनशक्तीचें सरकारने अंगीकारिलेलें साहसी संघटन असेंच म्हटलें आहे. सुरुवातीस उपलब्ध साधनसामुग्रीला अधिक चांगल्या संघटनेची जोड देणें एवढेंच नियोजकास करतां येतें. एकंदर फल अधिक मोठें व चांगलें पदरांत पडावें अशा हेतूने वैयक्तिक व सामुदायिक व्यवहाराचें नियंत्रण व मार्गदर्शन दूरदृष्टीने आणि समंजसपणें करणें म्हणजेच चांगल्या संघटनेची जोड देणें होय. अशी जोड सतत देतां आली की तिच्यामुळे साधनसामुग्रीचा दर्जा सुधारून तींत वाढहि होते आणि पुढच्या पुढच्या अवस्थांत वरील वाढ परस्परपोषक होत गेल्याने संपत्ति व उत्पन्न अधिकाधिक वाढत राहतें. सारांश, नियोजन म्हणजे अधिक चांगलें, सुसंगत, दूरदर्शीपणाचें आणि व्यापक स्वरूपाचें संघटन. अशा संघटनांसाठी जरूर ती राजकीय व कारभारविषयक व्यवस्था करण्यामध्ये सार्वजनिक कार्यक्षेत्राचा विस्तार, खाजगी व्यवहारावर नियंत्रण आणि विविध कायदेकानू इत्यादि सर्वांचा समावेश होतो.

नियोजनाचीं उद्दिष्टें :

वरील विवेचनावरून नियोजनबद्ध आर्थिक विकासाचीं लहान मोठीं अनेक उद्दिष्टें असतात हें दिसून येतें. सर्वांना रोजगार देण्यासाठी आणि देशांतील राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी उत्पादनांत झपाट्याने वाढ करणें या उद्दिष्टाला अग्रक्रम द्यावा लागतो. उत्पादनांत जलद वाढ होण्यासाठी देशांतील साधनसामुग्रीची पाहणी करून तिचा जास्तींत जास्त उपयोग करण्याच्या योजना आखाव्या लागतात. उत्पादनांतील ही वाढ कृषिक्षेत्रांत करावी लागते तशीच औद्योगिक क्षेत्रांतहि करावी लागते. उपभोग्य वस्तूंचें उत्पादन देशांतल्या देशांत करतां यावें म्हणून प्रथम या वस्तू तयार करतांना लागणारी यंत्रसामुग्री आपल्याच देशांत तयार व्हावी लागते आणि ही यंत्रसामुग्री तयार करणारीं यंत्रें तयार करण्याच्या योजनाहि आखाव्या लागतात. उत्पादनवाढीसाठी जी भांडवलनिर्मिति लागते ती जास्तींत जास्त देशांतल्या देशांतच उभारण्याचा प्रयत्न करणें हें नियोजनाचें आणखी एक उद्दिष्ट असतें. लोकांचें उत्पादन जसजसें वाढत जाईल त्या त्या प्रमाणांत त्यांचेकडून होणारी बचत वाढण्यास प्रोत्साहन देणें, या बचतीचा जास्तींत जास्त उत्पादन-कार्यासाठी उपयोग करतां येणें आणि भांडवल-उभारणीचा देशाला आवश्यक असणाऱ्या उत्पादनासाठीच वापर करणें हें उद्दिष्ट नियोजित अर्थव्यवस्थेंतच शक्य असतें. आपल्या देशांतील सर्व भागांचा विकास समतोलपणें व्हावा आणि मागासलेल्या प्रांतांकडे अधिक लक्ष पुरविलें जावें या गोष्टीची काळजी सरकारप्रणीत मध्यवर्ती नियोजन मंडळाखेरीज दुसरें कोण घेणार ? उत्पादनाची क्रमवारी ठरविणें, उत्पादनाचा वेग पद्धतशीर वाढवीत नेणें, कृषिपदार्थांच्या कच्च्या मालाच्या आणि उपभोग्य वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणें, इत्यादि उपायदेखील

केवळ नियोजनानेच साध्य होऊं शकतात. ग्रामीण भागाचा विकास, समाज-विकासयोजना, औद्योगिक विकेंद्रीकरण, ग्रामोद्योगांचा विकास, खेड्यांतील प्राथमिक सोयींची उपलब्धता, कुटुंबनियोजन, फिरते दवाखाने व आरोग्ययोजना हे सर्व कार्यक्रम मध्यवर्ति नियोजन मंडळाखेरीज इतरांनी केले नसते व त्यांना शक्यही झालें नसतें. नियोजनाचें आणखी एक उद्दिष्ट म्हणजे एकीकडे राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ होत असतांना त्या उत्पन्नाचा उपभोग मूठभर लोकांच्या हातांत जाऊं नये व देशांतील संपत्ति सर्व थरांतील व सर्व प्रदेशांतील लोकांना उपयोगी पडावी म्हणजेच समाजवादी पद्धतीची समाजरचना निर्माण व्हावी, असेंही असतें.

पहिली, दुसरी व आता तिसरी योजना :

पहिल्या योजनेच्या प्रारंभीं दुसरें महायुद्ध व फाळणी यांमुळे उद्‌भवलेल्या दुष्परिणामांची आपल्या अर्थव्यवस्थेवर गडद छाया पसरली होती. कोरियन युद्धामुळे किंमती वाढल्या होत्या. अन्नटंचाई, कच्च्या मालाचें दुर्भिक्ष आणि चलनवाढीचा ताण हे निकडीचे प्रश्न सोडवावयाचे होते. पहिल्या योजनेमागील आद्य हेतु प्रगत व विविधस्वरूपी कार्यरचनेचा पाया घालणें असा होता. भविष्य-काळांत वेगाने प्रगति व्हावी म्हणून पूर्वतयारी करणें हें पहिल्या योजनेचें प्रमुख सूत्र होतें. म्हणून दूरदृष्टि ठेवून आर्थिक प्रश्नांचें निरीक्षण करण्यांत आलें आणि विकासाचे कार्यक्रम तात्कालिक गरजा भागविण्याबरोबरच सर्वस्पर्शी आणि समतोल आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने आखण्यांत आले. विविध-विकासकार्याकरिता नियोजित केलेला पैसा जरी पूर्णत: खर्च केला गेला नाही तरी योजनेने एक नवी गति उत्पन्न केली. राष्ट्रीय उत्पन्नांत अकरा टक्के वाढ अपेक्षित होती. त्याऐवजी प्रत्यक्षांत ती अठरा टक्के घडून आली.

द्वितीय योजनेंतील मुख्य हेतु राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग वाढविणें व म्हणून त्यासाठी सर्वच क्षेत्रांतील उत्पादनक्षमता वाढविणें असा होता. द्वितीय योजनेंतील प्रमुख उद्दिष्टें अशीं होतीं :

(१) देशांतील राहणीचें मान वाढविण्याकरिता राष्ट्रीय उत्पन्नांत २५ टक्के वाढ करणें;

(२) मूलभूत व मोठ्या उद्योगधंद्यांच्या विकासावर भर देऊन औद्योगीकरण वेगाने घडवून आणणें;

(३) बेकारी व अर्धबेकारी नष्ट करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करणें; व

(४) आर्थिक विषमता कमी करून वाढत जाणाऱ्या उत्पादनाचें समविभाजन घडवून आणणें.

हीं उद्दिष्टें परस्परसंबंधित अशींच होतीं. पोलाद, रसायनें, कोळसा, विद्युत्‌शक्ति इत्यादि मूलभूत पदार्थांच्या उत्पादनांत झपाट्याने वाढ करण्यास दुसऱ्या योजनेंत अग्रक्रम होता. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ रोस्टोव्ह याने मागासलेल्या देशांच्या आर्थिक

विकासाच्या विविध अवस्थांसंबंधी लिहितांना विकासाची तिसरी अवस्था महत्त्वाची मानली आहे. या अवस्थेंत उत्पादनवाढीला इतका पुरेसा वेग येतो की त्यामुळे अर्थव्यवस्था स्वयंचलित झाली असें म्हणतां येतें. या अवस्थेंत राष्ट्रीय उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षाही अधिक रक्कम उत्पादक कार्यांत गुंतविली जाते आणि मग लोकसंख्येच्या वाढीपेक्षा उत्पादनाच्या वाढीचें प्रमाण अधिक होऊन दर माणशीं उत्पादन वाढत्या प्रमाणांत राहतें. या दृष्टीने तृतीय पंचवार्षिक योजनेंत तपशीलवार उद्दिष्टें अशीं आहेत :—

(१) राष्ट्रीय उत्पन्नांत दर वर्षीं पांच टक्क्यांपेक्षा अधिक वाढ करणें;

(२) अन्नधान्यांत स्वयंपूर्णता साध्य करून औद्योगिक कच्च्या मालाच्या आणि निर्यातीच्या दृष्टीने कृषिपदार्थांचें उत्पादन वाढविणें;

(३) पोलाद, कोळसा, विद्युत्शक्ति इत्यादि मूलभूत उद्योगधंद्यांत वाढ करून यंत्रें निर्माण करण्याची उत्पादनक्षमता वाढविणें;

(४) मानवी श्रमाचा जास्तींत जास्त उपयोग करून रोजगार मिळविण्याच्या संधींत वाढ करणें; आणि

(५) आर्थिक विषमता कमी करून वाढत्या उत्पन्नाचें समविभाजन करणें, राहणीमान वाढविणें, मागासलेल्या लोकांना पुढे येण्यास अवसर देणें आणि सर्व थरांतील लोकांमध्ये योजनाकार्यांत आपण भागीदार असल्याची भावना निर्माण करणें.

नियोजनमंडळ

भारताच्या नियोजनाविषयी रूपरेखा आणि धोरण ठरविण्यासाठी १९५० मध्ये नियोजनमंडळाची स्थापना करण्यांत आली. या मंडळाकडे पुढीलप्रमाणे कामें सोपविलेलीं असतात.

१. देशांतील नैसर्गिक व भांडवली संपत्तीचा आणि श्रमशक्तीचा अंदाज काढणें आणि ह्या संपत्तीपैकी योजनेंतील गरजेच्या मानाने जी अपुरी असेल ती वाढविण्याचा उपाय सुचविणें.

२. देशांतील एकूण साधनसंपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतां येईल अशी परिणामकारक योजना तयार करणें.

३. योजनेंतील उद्दिष्टांची क्रमवारी लावून योजनेची अंमलबजावणी कशी व कोणत्या दिशेने व्हावी हें ठरविणें.

४. उपलब्ध साधनसंपत्तीचा कसा उपयोग करतां येईल तें सुचविणें.

५. आर्थिक विकासाला विरोध करणाऱ्या गोष्टी सरकारच्या नजरेस आणून सर्वसाधारण सामाजिक व आर्थिक धोरण कसें असावें त्याची शिफारस करणें.

६. योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध पातळीवर आवश्यक असलेल्या शासनव्यवस्थेचें स्वरूप ठरविणें.

७. योजनेच्या प्रत्येक अवस्थेंत किती प्रगति झाली याचें सिंहावलोकन करून सरकारी धोरणांत व शासनव्यवस्थेंत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत तें कळविणें, आणि

८. सरकारकडून आलेल्या विकासाच्या कार्यक्रमाविषयीच्या प्रश्नांवर सल्ला देणें.

रचना

नियोजन खालपासून वर पाठविलें जावें व अशा रीतीने स्थानिक गरजांकडे शक्यतोंवर लक्ष दिलें जावें म्हणून तालुक्यांतून व जिल्ह्यांतून पाठविलेल्या योजना प्रत्येक प्रांताकरिता असलेल्या विकासमंडळाकडून तपासल्या जातात. प्रांतीय विकासमंडळें केंद्रीय नियोजनमंडळातर्फे त्या त्या प्रांतांतील नियोजनविषयक कामांकडे लक्ष देतात. याखेरीज प्रत्येक प्रांताचे मुख्य मंत्रि व शिवाय अर्थशास्त्रज्ञ ज्यामध्ये आहेत असें एक राष्ट्रीय विकासमंडळ अस्तित्वांत आहे. हें राष्ट्रीय विकासमंडळ नियोजनमंडळाकडून आलेल्या आराखड्याचा विचार करतें; तसेंच प्रांतिक सरकारांकडून आलेल्या प्रांतिक योजनांचें परीक्षण करून योग्य तेथे काट-छाट करून समतोल अशी योजना कोणती असावी याबद्दल धोरण ठरवितें.

पंतप्रधान नेहरू नियोजनमंडळाचे अध्यक्ष आहेत. केंद्रसरकारांतील नियोजन, अर्थ व संरक्षण या तीन खात्यांचे मंत्री, नियोजनखात्याचे उपमंत्रि आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी व मंत्रिमंडळाचे संख्याविषयक सल्लागार हे नियोजनमंडळाचे सभासद असतात. मंडळाचे उपाध्यक्ष पूर्ण वेळ काम करणारे असतात. सर्व सभासद सामुदायिक रीत्या कामकाज पाहतात. मात्र सोयीसाठी प्रत्येकाकडे एकदोन विषय सोपविलेले असून त्या विषयांतील प्रश्नांबाबत तो तो सभासद मार्गदर्शन करतो. उपाध्यक्षांकडे सर्वसाधारण एकसूत्रीकरणाचें आणि कारभारविषयक कामकाज असतें.

नियोजनमंडळाला स्वयंसिद्ध असे अधिकार नाहीत. नियोजन आणि विकास यां-विषयी सरकारला सल्ला देणारी ती एक संघटना आहे. अर्थात् त्यामध्ये प्रधानमंत्रि हे अध्यक्ष आणि नियोजनमंत्रि, अर्थमंत्रि व संरक्षणमंत्रि सभासद आहेत. नियोजना-विषयी राष्ट्रीय दृष्ट्या विचार करणारें तज्ज्ञांचें मंडळ म्हणून नियोजनमंडळाकडे बघितलें जातें. मंडळाने कांही प्रत्यक्ष कामें हातीं घेतलीं आहेत. उदाहरणार्थ, समाज-विकास प्रकल्पांवर देखरेख ठेवणें, त्याबाबत मार्गदर्शन करणें, पंचवार्षिक योजना पार पाडण्याच्या कामीं जनतेचें सहकार्य संपादणें वगैरे. नियोजनमंडळाने तयार केलेली व राष्ट्रीय विकासमंडळाने संमत केलेली योजनेची रूपरेखा सरकारला लोकसभेपुढे सादर करावी लागते व ती मंजूर झाल्यावर सरकारी खात्यांतर्फे प्रत्यक्षांत कार्यान्वित होते. पहिली, दुसरी व सध्या चालू असलेली तिसरी पंचवार्षिक योजना याच पद्धतीने अंमलबजावणीच्या अवस्थेपर्यंत आणण्यांत आली. पहिली

पंचवार्षिक योजना १९५१ मध्ये सुरू झाली, १९५६ मध्ये द्वितीय योजनेला प्रारंभ झाला आणि १९६१ ते ६६ या कालावधींत तृतीय योजना वाटचाल करीत आहे.

प्रादेशिक विकास :

भारतांतील नियोजनाचा येवढा परामर्श घेण्याचें कारण उघड आहे. भारतांतील प्रत्येक राज्याप्रमाणे महाराष्ट्राकडेही नियोजनमंडळ लक्ष पुरवीत आहे. नियोजनाच्या व्यापक धोरणाच्या चौकटींत प्रत्येक राज्याचा शक्य असेल तेवढा विकास केंद्रसरकार करीतच आहे. आपली प्रगति देशांतील कार्यशक्तीवर अवलंबून आहे. देशाच्या नियोजनांत अडचणी आल्यास त्याचा परिणाम आपल्यावरही होईल. त्याचबरोबर सबंध देशाची जशी प्रगति होत जाईल तसें आपलेंही राज्य पुढे पुढे जाईल. अर्थात् देशाच्या नियोजनाचा गाडा ढकलण्याची जबाबदारी सर्वांबरोबरच आपल्यावरही आहे. देशव्यापी नियोजन परिणामकारक, सर्वस्पर्शी व समतोल व्हावें यासाठी प्रत्येक राज्यांतील साधनसामुग्रीची आणि मनुष्यबळाची देशाला गरज आहे. ह्यासाठीच प्रत्येक प्रांतांत असलेल्या साधनसंपत्तीचा व श्रमशक्तीचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल ह्याचा प्रत्येक राज्याने विचार केला पाहिजे.

प्रादेशिक योजनेचा विचार आणखी एका दृष्टीने आवश्यक आहे. आपल्या राज्यांत अमक्या अमक्या गोष्टी व्हाव्यात असें प्रत्येकालाच वाटतें. पण मध्यवर्ती नियोजनमंडळाला सर्व राज्यांच्या गरजा विचारांत घेऊन समतोल विकासाचें तत्त्व कार्यवाहींत आणण्याच्या दृष्टीने प्रांतीय योजनांमध्ये क्रमवारी लावावी लागते. क्रमवारी लावतांना स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल याला महत्त्व असतेंच. आपल्या राज्यांत कांही विशिष्ट कार्यक्रम – उदा. कोंकण रेल्वे – निकडीने घेतला जावा असें वाटत असेल तर आपल्या गरजा किती व कां तीव्र झाल्या आहेत आणि आपल्याजवळील साधनसामुग्री त्या दृष्टीने किती आहे, तसेंच स्थानिक योजना स्वीकृत झाल्यास आपला व एकूण देशाचाही फायदा कितपत होईल हें विश्वासार्ह आकडेवारी गोळा करून आणि तर्कशुद्ध विवेचनाने केंद्र सरकारपुढे मांडणें अगत्याचें असतें. म्हणूनच प्रत्येक राज्याच्या योजनेचा आणि प्रत्येक राज्ययोजनेंतील कितपत जबाबदारी स्वीकारूं शकेल ह्याचा अभ्यास व्हावयास पाहिजे. अशा अभ्यासाला चालना मिळण्यासाठी प्रथम त्या त्या राज्यांतील अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांची तपशीलवार पाहणी झाली पाहिजे. म्हणूनच पुढील कांही प्रकरणांतून महाराष्ट्रांतील उद्योग, शेती, दळणवळण इत्यादि अंगांची पाहणी करून आपल्या संकल्पित योजनांचा त्यांत विचार केला आहे. त्यांमधून महाराष्ट्राची कार्यशक्ति, आत्मविश्वास, सहकारी वृत्ति आणि उत्साह दिसून येईल यांत शंका नाही.



२

महाराष्ट्राचा परिचय

प्रास्ताविक :

गेल्या प्रकरणांत नियोजनाचें महत्त्व आणि खंडप्राय अशा देशांतील प्रत्येक राज्याने आपापल्या परीने करावयाच्या प्रयत्नांची आवश्यकता आपण लक्षांत घेतली. महाराष्ट्राच्या विकासाचा अभ्यास करतांना अर्थव्यवस्थेच्या उद्योग, दळणवळण, शेती, मजूरपुरवठा इत्यादि प्रत्येक अंगाचा पुढे तपशीलवार विचार करावयाचा आहे. पण कोणत्याहि अर्थव्यवस्थेचा विकास मानवी प्रयत्नाबरोबरच तेथील भौगोलिक किंवा नैसर्गिक अनुकूलता कितपत आहे यावरही बव्हंशीं अवलंबून असतो. निसर्ग प्रतिकूल असला तर वैज्ञानिक व तांत्रिक साहाय्याने त्यावरदेखील विजय मिळविण्याचा आपण प्रयत्न करीत नाहीं असें नाही. परंतु निसर्गतःच एखादी गोष्ट अनुकूल असली तर तिच्या आधारें आपला प्रयत्न अधिक सुलभ होतो व त्यापासून मिळणारी प्राप्ति अधिक असते. शिवाय निसर्गाने दिलेल्या संपत्तीचा उपयोग न केल्यास मोठी निसर्गशक्ति वाया घालविल्यासारखी होते. खनिज संपत्तीचा सविस्तर उल्लेख पुढे औद्योगिक विकासाच्या प्रकरणांत आलाच आहे. येथे आपला महाराष्ट्र भौगोलिक दृष्टचा कितपत अनुकूल परिस्थितींत आहे हें थोडक्यांत बघूं.

विस्तार

महाराष्ट्र राज्य दक्षिण भारताचा एक मोठा व महत्त्वाचा भाग आहे. त्याला साडेतीनशे मैल लांबीची किनारपट्टी लाभल्यामुळे सागरी संपत्ति मिळू शकणें हें महाराष्ट्राचें भाग्य आहे. सुमारे साडेसोळा ते बावीस उत्तर अक्षांश आणि ७२·६ ते ८०·९ पूर्व रेखांश इतका त्याचा विस्तार आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेला अरबी समुद्र, वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, आग्नेयेस आंध्र आणि दक्षिणेकड गोवा आणि म्हैसूर आहेत. महाराष्ट्राचें क्षेत्रफळ १,१८,४५९ चौरस मैल आहे. हें क्षेत्रफळ भारताच्या क्षेत्रफळाच्या दहाव्या हिश्शापेक्षा थोडें अधिकच आहे. शासन-व्यवस्थेच्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रांत जळगांव, धुळें, नाशिक, अहमदनगर, पुणें, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, ठाणें, कुलाबा, रत्न गिरी व बृहन्मुंबई असे तेरा जिल्हे, विदर्भांत नागपूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, बुलढाणा, चांदा आणि भंडारा हे आठ जिल्हे आणि मराठवाड्यांत औरंगाबाद, परभणी, भीर, उस्मानाबाद आणि नांदेड हे पांच जिल्हे आहेत.

भौगोलिक वैशिष्टय

भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतें सात कोटि वर्षांपूर्वीपासून लाव्हा रसाचे थरावर थर साचून महाराष्ट्राची जमीन तयार झाली आहे. हे थर बहुतेक ठिकाणीं दोन ते पांच हजार फूट जाडीचे आहेत. दक्षिणोत्तर सह्याद्रीच्या रांगा आणि पूर्व-पश्चिम पसरलेल्या बालाघाट पर्वताचा भाग यांमुळे पश्चिम महाराष्ट्राचे सात जिल्हे व सबंध मराठवाडा मिळून पठार बनलें आहे. यामध्ये गोदावरी, भीमा व कृष्णा या महत्त्वाच्या नद्या आहेत. भीमेचें खोरें सर्वांत मोठें आहे. भीमेला पंधरा उपनद्या मिळतात.

उत्तरेकडील सातपुडा व दक्षिणेकडील बालाघाट यांच्या दरम्यान असलेलें तापीचें खोरेंही सुपीक आहे. त्यामध्ये पश्चिम विदर्भ व जळगांव आणि धुळें हे दोन जिल्हे येतात. येथील जमीन कापसाच्या लागवडीकरिता फार उत्तम आहे. सह्याद्रीच्या रांगा किनारपट्टीला जवळजवळ समांतर आहेत. कोंकणपट्टी चिंचोळी असून कोठेही साठ मैलांपेक्षा रुंद नाही. एकीकडे समुद्र व दुसऱ्या बाजूस पर्वतांच्या रांगा यामध्ये असलेल्या कोंकणांतील तीन जिल्ह्यांत खूप पाऊस व दमट हवा आहे. जमीन सुपीक नाही. त्यामुळे तांदुळाखेरीज दुसरें पीक फारसें काढतां येत नाही.

पावसाचें प्रमाण राज्याच्या विविध भागांत वेगवेगळे असल्यामुळें त्या त्या भागांत कृषि-उत्पादनाचें मोठेंच वैचित्र्य आढळतें. मोसमी वाऱ्यांमुळे कोंकणांत भरपूर पाऊस पडतो. पण घाटमाथ्यावरील जिल्ह्यांत पावसाचें प्रमाण पंचवीस ते तीस इंचांवरच येतें. महाबळेश्वरला १५० इंच पाऊस पडतो, पण तेथून फक्त वीसच मैलांवर असलेल्या वाई येथे, तो देशावरील भाग असल्यामुळे, तीस इंचच पाऊस पडतो. भंडारा, चांदा व नागपूर जिल्ह्यांत चाळीस इंचांपेक्षा जास्त पाऊस पडतो.

चांदा येथे तो साठ इंचांपर्यंत जातो. साहजिकच विविध भागांतील जंगल संपत्तींत वैचित्र्य दिसून येतें. चांदा, भंडारा, अमरावती, ठाणें, कुलाबा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत जंगलसंपत्ति विपुल आहे. पश्चिम घाटावरील प्रदेशांत ठराविक ऋतूंत गळणाऱ्या पानांचीं झाडें आहेत. पाऊस कमी असलेल्या भागांत खुरटलेली वनस्पति व झुडुपें आहेत. मुंबईच्या उत्तरेस समुद्रकिनाऱ्याला लागून मोशी जातीचें उत्तम किंमतीचें गवत उगवतें. जंगलसंपत्तीच्या विविधतेचा अधिक सविस्तर उल्लेख चौथ्या उद्योगविषयक प्रकरणांत आला आहेच.


खनिज संपत्ति

महाराष्ट्रांत मँगेनीझ्, कच्चें लोखंड, बॉक्साईट, चुना, क्रोमाईट, अभ्रक, चिकणमाती, इमारतीला लागणारा दगड इत्यादि मौल्यवान खनिज संपत्ति खूप सापडते. त्याचा उद्योगधंद्याच्या विकासाकरिता उपयोग करण्यास पुष्कळ वाव आहे.

नागपूर व भंडारा जिल्ह्यांत भारतांतील मँगेनीझ्च्या प्रचंड सांठ्यापैकी कांही सांठे आहेत. या दोन जिल्ह्यांत दोनशे खाणी चालू आहेत. येथे पुष्कळ लोकांना रोजगारी मिळाली आहे. रामटेकच्या पश्चिमेकडील जंगलविभागांत कनिष्ठ दर्जाचें मँगेनीझ्ही मिळतें. रत्नागिरी जिल्ह्यांत सावंतवाडी व वेंगुर्लें तालुक्यांत हलक्या प्रतीच्या मँगेनीझ्चा सांठा आढळतो. रत्नागिरी, चांदा, नागपूर व भंडारा जिल्ह्यांत कच्चें लोखंड मिळतें. त्यांतील बरेंचसें निर्यातही होतें.१९५९ मध्ये, ४१ लक्ष रुपयांच्या किंमतीइतकें कच्चें लोखंड महाराष्ट्रांत मिळालें. अॅल्युमिनियमकरिता लागणारें बॉक्साईट कोल्हापूर, कुलाबा, ठाणें, रत्नागिरी व सांगली जिल्ह्यांत मिळतें. कोल्हापूर जिल्ह्यांत अलीकडे याचे अधिक सांठे सापडले आहेत. यवतमाळ आणि चांदा जिल्ह्यांत चुन्याच्या खाणी अधिक आहेत. क्रोमाईटचें उत्खनन रत्नागिरी व भंडारा जिल्ह्यांत यशस्वी ठरलें आहे. महाराष्ट्रांत जुने भूगर्भस्तर जेथे जेथे आहेत तेथे तेथे अभ्रक मिळतें. रत्नागिरी जिल्ह्यांत कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी या भागांत तें विशेष दिसतें. गोवा सरहद्दीपासून कोंकणपट्टीला सर्वत्रच चांगल्या दर्जाची 'सिलिका' (Glass sand) वाळू मिळते. विटा व मातीचीं भांडीं यांकरिता लागणारी चिकणमाती विशेषेंकरून नागपूर, चांदा, अमरावती, रत्नागिरी व ठाणें जिल्ह्यांत उपलब्ध होते.

महाराष्ट्रांत खनिजसंपत्ति अधिकही सापडण्याचा खूप संभव आहे. सह्याद्रीमध्यें अधिक उत्खनन करावें असें या दृष्टीने नेहमीच सांगितलें जातें. खनिजसंपत्तीबरोबर महाराष्ट्र कृषिसमृद्धही आहे. महाराष्ट्रांतील पिकांच्या उत्पादनाची माहिती शेतीविषयक प्रकरणांत येईलच. या सर्वांचा निष्कर्ष इतकाच की आपण पद्धतशीर प्रयत्न केले तर निसर्गाचा वरदहस्त आपणांवर आहेच. आपलें राज्य शासनव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत कार्यक्षम आणि सत्तारूढ पक्ष एकजिनसी व स्थिर असल्यामुळे पुढील योजनेमध्ये प्रयत्नांची उणीव कधीच भासणार नाही. कृषि-

समृद्धीचा कमाल उपयोग होण्यासाठी सरकारने कृषि-उद्योगांवर भर देण्याचें ठरविलें आहेच. कृषि-उद्योग लहान प्रमाणावर खेडोपाडींसुद्धा काढतां येतील. त्यामुळे औद्योगिक विकेंद्रीकरण साधेल व रोजगार वाढून खेड्यांतील लोकांना शहराकडे धावावें लागणार नाही. कृषि–उद्योगांना, ते लहान प्रमाणावर असल्यास, सुरुवातीस फार भांडवल लागणार नाही आणि त्यांना भरपूर मजूर-पुरवठयाचा उपयोग करून घेतां येईल. आपले कृषि-उद्योग श्रमाधिष्ठित असतील. गरीब जनतेस विनामूल्य शिक्षण देण्याच्या कॉंग्रेस सरकारच्या धोरणामुळे शिक्षणांत व ज्ञानांत जशी वाढ होत जाईल त्या प्रमाणांत आपल्या पायावर उभें राहण्याची आपणांत जाणीव व ईर्ष्याही निर्माण होईल. महाराष्ट्रीय मनुष्य बुद्धिवादीही आहे. तो साधा शेतकरी असला तरी प्रत्येक गोष्ट डोळसपणें करतो. साहजिकच नव्या शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाचा तो आपल्या शेतीच्या किंवा अन्य व्यवसायांत निश्चित् उपयोग करील. समाजविकास योजनांमध्ये आढळून येणारी तेथील शेतकऱ्यांची चौकस बुद्धि, नव्या गोष्टी आत्मसात करण्याची हौस आणि श्रम करण्याची आवड या सर्व अनुकूलते-मुळे भौगोलिक दृष्टचा मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा महाराष्ट्र यापुढे कमालीचा उपयोग करून घेईल यांत संदेह नाही.



३

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक प्रगतीचें पहिलें वर्ष

महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ १ मे १९६० रोजीं उभारली गेल्यानंतरचें पहिलेंच वर्ष दोन दृष्टींनी उल्लेखनीय ठरलें आहे. एक म्हणजे दुसऱ्या पंचवार्षि क योजनें तील उद्दिष्टें गाठण्यासाठी येथे मोठ्या प्रमाणावर झालेल्या हालचाली आणि दुसरें, तिसऱ्या योजनेच्या आराखड्याची सिद्धता.

योगायोगाने महाराष्ट्र राज्याचें पहिलें वर्ष हें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें शेवटचें वर्ष होतें आणि पहिल्या चार वर्षांत ठरल्यापेक्षा जो कमी खर्च झाला, तो या वर्षी विकासकामें वेगाने करून ठरल्यापेक्षा थोडा अधिकच म्हणजे २०४.४१ कोटि रुपये इतका झाला. एकूण नियोजित खर्चाच्या एक-चतुर्थांश एवढी रक्कम योजनेच्या या शेवटच्या वर्षांत खर्च झाली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी नियोजन मंडळाने ३९० कोटि रु. खर्चास गेल्या अंदाजपत्रकाच्या वेळीं मान्यता दिली आहे. आता या योजनेंत समाविष्ट करावयाच्या कार्यक्रमांवर तज्ञ सल्लागार मंडळाच्या सल्ल्याने शेवटचा हात फिरवला जात आहे. एप्रिल १९६१ च्या सुमारास राज्याची तिसरी पंचवार्षिक योजना तयार झाली आणि तदनंतर ती लोकमताकरिता प्रसिद्ध करण्यांत आली.

समाजविकास कार्यक्रम

गेल्या वर्षी आणखी कांही क्षेत्रांत समाजविकास कार्यक्रम नव्याने सुरू करण्यांत

आला व १९५१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण लोकसंख्येस त्याचा लाभ मिळत होता व आहे. या वर्षाच्या जनगणनेंत या आकडयांत नक्कीच वाढ झाली असली पाहिजे. बाकीच्या ठिकाणीं या बाबतची प्राथमिक तयारी सुरू आहे.

जनतेने या योजनेस उत्कृष्ट पाठिंबा दिला, हें, यासाठी जनतेकडून ५ कोटि रुपयांवर रोख रक्कम गोळा झाली, यावरून स्पष्ट होतें.

अल्प बचत

गेल्या वर्षीं अल्पबचत मोहिमेची चांगली प्रगति झाली. लागोपाठ दुसऱ्याहि वर्षीं अल्प बचतीचा उद्दिष्टांक राज्याने ओलांडला. अल्प बचतींतून १९६०-६१ या वर्षीं २६ कोटि रुपये प्रत्यक्ष मिळाले. उद्दिष्ट मात्र फक्त १९ कोटि रुपये इतकेंच होतें. एकंदर २० जिल्ह्यांनी उद्दिष्टांक ओलांडले व त्यांतील चार जिल्ह्यांनी तर २०० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्ट गाठलें.

जनगणना

गेल्या वर्षीं जनगणनेसाठी राज्यांतील सर्व यंत्रणा कार्यरत झाली होती. जनगणनेचें कार्य उत्तम प्रकारें पार पडलें व प्राथमिक अहवालानुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ३·९५ कोटि असल्याचें दिसून आलें. तिसरी पंचवार्षिक योजना सुरू होण्याच्या सुमाराला ही जनगणना झाली असल्याने भावी योजना आखतांना तिचें मोलाचें साहाय्य होईल. वाढती लोकसंख्या लक्षांत घेऊनच तृतीय योजनेंतील कार्यक्रम आखले आहेत.

सत्तेचें विकेंद्रीकरण

या वर्षीची आणखी एक दूरगामी महत्त्वाची घटना म्हणजे सत्ताविकेंद्रीकरण समितीची स्थापना आणि तिने प्रसिद्ध केलेला अहवाल हा होय. या समितीच्या अहवालांत पंचायत राज्याचें उद्दिष्ट मांडण्यांत आलें आहे. हा अहवाल विधिमंडळाच्या अंदाजपत्रकी अधिवेशनास सादर करण्यांत आला असून त्यांतील शिफारशींनुसार विधेयक तयार करण्याचें काम नुकतेंच पुरें झालें आहे.

नवबौद्धांना सवलती

महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटनप्रसंगीं मुख्य मंत्र्यांनी जीं विविध आश्वासनें दिलीं, तीं पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्ययंत्रणा सतत प्रयत्न करीत आहे. अनुसूचित जातींना मिळणाऱ्या सर्व सवलतींस सर्व नवबौद्ध पात्र ठरविण्यांत आले. अर्थात् अस्पृश्यतानिवारणाच्या उद्देशाने दिल्या जाणाऱ्या कांही सवलती मात्र त्यांना मिळणें शक्य नाही. शैक्षणिक क्षेत्रांत नवबौद्धांना शिक्षण व परीक्षा-फी माफ करण्यांत आली असून शैक्षणिक संस्थांत अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या जागीं त्यांना प्रवेश मिळतो.

जमीनसुधारणा

'कसेल त्याची जमीन' हें सरकारचें धोरण प्रत्यक्षांत आणण्यासाठी जमीन-

धारणा विधेयक व भूमिहीनांना सरकारकडून पडीत जमिनीचें वांटप हे दोन मार्ग या वर्षी अनुसरण्यांत आले.

विधिमंडळाच्या अंदाजपत्रकी अधिवेशनांत जें जमीनधारणा-विधेयक संमत झालें, त्यांत जमीनधारकांत जमिनीचें अधिक न्याय्य वांटप होण्याची तरतूद असून त्यास सर्व पुरोगामी दृष्टिकोन असलेल्या राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. यांतून जी जादा जमीन मिळेल ती सरकारी प्रकल्पांमुळे व अन्य कारणाने भूमिहीन असणारे लोक, शेतमजूर, लहान जमीनधारक इत्यादींत अनुक्रमानुसार वांटली जाईल.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर ताबडतोब जमीनवांटपाचें कार्य, त्याची पद्धति सुलभ करून, हातीं घेण्यांत आलें. विदर्भांतील आठ व महाराष्ट्रांतील सहा जिल्ह्यांत (धुळें, जळगाव, नासिक, पुणें, अहमदनगर व कोल्हापूर) आतापर्यंत चार लाख एकरांवर जमीन भूमिहीनांना वांटण्यांत आली आहे. राज्याच्या इतर भागांत आता वांटण्यासाठी पडीत जमिनीची मोजदाद केली जात आहे.

शिक्षणावरील खर्च

संपूर्ण विनामूल्य शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा वार्षिक ९०० रुपयांपासून १२०० रुपयांपर्यंत वाढवून व जुन्या मुंबई राज्यांतील दुय्यम शाळांना फी-वाढीची दिलेली परवानगी काढून घेऊन शिक्षण अधिक स्वस्त करण्यांत आलें. राज्याच्या निरनिराळ्या भागांत असणाऱ्या शैक्षणिक सवलती पुढे चालूं ठेवण्यांत आल्या. या उपायांमुळे ग्रामीण भागांत विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने सर्व प्रकारचें शिक्षण घेणें शक्य झालें. कऱ्हाड व औरंगाबाद येथे दोन नवीन इंजिनिअरिंग कॉलेजें सुरू करण्यांत आलीं. याशिवाय मुंबई, पुणें व नागपूर येथे एंजिनिअरिंग कॉलेजें आहेतच. मुंबई व जळगांव येथे पॉलिटेक्निक्स उघडण्यांत आलीं. आज राज्यांत आठ पॉलिटेक्निक्स आहेत. सोलापूर, नासिक, अहमदनगर व जळगाव येथे चार नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यांत आल्या. धुळें येथे शेतकी कॉलेज चालूं करण्यांत आलें. आज राज्यांत पांच सरकारी व अमरावती येथे एक अशीं सहा शेतकी कॉलेजें आहेत. सातारा येथे सैनिक शाळा सुरू करण्याची योजना पूर्ण करण्यांत आली असून ती नकतीच सुरू झाली आहे.

पाटबंधारे

पाटबंधाऱ्याच्या मोठ्या व मध्यम अशा एकंदर ५० योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत हातीं घेण्यांत आल्या व त्यांवर योजनेच्या पहिल्या चार वर्षांत १८ कोटि रुपये खर्च झाला. पांचव्या वर्षांतील खर्चाचे आकडे काढले जात आहेत. पश्चिम महाराष्ट्रांतील वीर, खडकवासला व गिरणा प्रकल्प, विदर्भांतील बोर व नळगंगा प्रकल्प आणि मराठवाड्यांतील पूर्णा प्रकल्प यांचीं कामें भर वेगांत सुरू आहेत. मध्यम स्वरूपाच्या पाटबंधारे योजनांचीं कामेंहि पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या सर्व योजना पूर्ण झाल्यावर १२,३४,६९० एकर जमीन पाण्याखाली

भिजेल. छोट्या पाटबंधारे कार्यक्रमांत १३२ कामें दुसऱ्या योजना काळांत पूर्ण करण्यांत आलीं व त्यामुळे ८४,०२० एकर जमीन भिजत आहे.

जलसाधनांचा उपयोग

राज्यांतील जलावश्यकतेसंबंधीचा अंदाज करण्यासाठी व विविध उपयोगाकरिता पाण्याच्या आवश्यकतेचा विचार करण्यासाठी राज्यसरकारने एका जलसिंचन मंडळाची नियुक्ति केली होती. या मंडळाने आपलें कार्य पूर्वीच चालू केलें असून, राज्यांतील विविध भागांस या मंडळाने भेटी दिल्या आहेत. पुराच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी व तत्संबंधी धोरण निश्चित करण्यासाठी व पुराच्या नियंत्रणाचे उपाय, पुरापासून संरक्षण, पूरग्रस्त लोकांना साहाय्य इत्यादींसाठी राज्य पूरनियंत्रण समिति आणि राज्य तांत्रिक सल्लागार समिति यांची नियुक्ति करण्यांत आली आहे.

वीजशक्ति प्रकल्प

आतापर्यंत महाराष्ट्रांतील वीजशक्ति प्रकल्पांपैकीं सर्वांत मोठी योजना म्हणजे कोयना. या प्रकल्पाचें काम वेगाने चालू असून, या वर्षाअखेरीपर्यंत साठ हजार किलोवॅट्स् शक्तीचें विद्युत्‌निर्मिति उपकरण तयार होईल आणि त्यानंतर प्रत्येक सहा महिन्यांच्या अवधीमध्ये अशा प्रकारचीं तीन उपकरणें तयार होतील. हा पहिला टप्पा पूर्ण होण्याच्या वेळीं दोन लक्ष चाळीस हजार कि. वॅ. वीजशक्ति तयार होईल. दुसऱ्या टप्प्यामध्ये धरणाची उंची वाढविण्यांत येऊन, या धरणामध्ये ७३,००० घनफूट जलसंचय होऊं शकेल. व त्यापैकी सोळा हजार घनफूट पाणी जलसिंचनासाठी देण्यांत येईल. कोयनेपासून जेथे जेथे वीज घेण्यांत येणार आहे तेथे तेथे वीज-वाहक तार टाकण्याचें काम चालूं आहे. विदर्भामध्यें ३०,००० टर्बो ऑल्टरनेटर सेट्स, त्याच्या बॉयलर आणि इतर साहाय्कारी साधनसामुग्रीसहित, खापरखेडा विद्युत्‌केंद्रांमध्ये, गेल्या मेमध्ये व्यापारी दळणवळणासाठी बसविण्यांत आले आणि एक महिन्यापूर्वींच येथे ३० किलोवॅट्स् बाष्पशक्तीची सामग्री बसविण्यांत आली. कऱ्हाड, अकलूज, नांदेड आणि पैठण येथे नवीन तेलशक्तीचीं केंद्रें चालूं करण्यांत येणार आहेत.

नवीन सहकारी कायदा

विधान सभेने सहकारी विधेयक संमत करून, सहकारी चळवळीच्या मार्गांत महत्त्वाचें पाऊल टाकलें. या नवीन कायद्यानुसार संलग्न, नाममात्र आणि सहानुभूति व्यक्तविणारे लोक सभासद म्हणून घेण्याची तरतूद आहे. या तरतुदीमुळे जेथे अस्तित्वांत असलेल्या सभासदांमधून प्रशिक्षित आणि हुशार सभासद मिळू शकणार नाहीत, अशा संस्थांना बाहेरील व्यक्तींचाहि लाभ घेतां येईल. जरी सरकार अशा संस्थांना फार मोठी आर्थिक मदत देणार असलें, तरी सरकारनियुक्त सभासद सहकारी संस्थांच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्ये घेण्याची तरतूद या विधेयकामध्ये करण्यांत आलेली नाही.

अन्नधान्याचा प्रश्न

अन्नधान्याचा प्रश्न दोन आघाड्यांवर हाताळण्यांत आला; महाराष्ट्र, गुजराथ आणि मध्यप्रदेश यांचा धान्याच्या दृष्टीने एकच विभाग निर्माण करण्यांत येऊन राज्याच्या गहूं आणि तांदूळ या संबंधीच्या प्राथमिक गरजा भागविण्यांत आल्या आणि सबंध वर्षभरांत तीव्रतर आणि अधिक व्यापक व महत्त्वाकांक्षी योजना आखून धान्योत्पादन तीव्र करण्यांत आलें; खार जमीनसुधार मंडळाकडून या वर्षांत ७,००० एकरांपेक्षा अधिक जमीन पुन्हा मिळविण्यांत आली. यामुळें आतापर्यंत मिळविण्यांत आलेली जमीन ६४,००० एकर झाली.

जपानी भातशेतीची पद्धति फार वेगाने अंमलांत आणण्यांत येत असून दर एकरीं ११·५८ बंगाली मण अधिक भात उपलब्ध झालें आहे.

काजूची लागवड

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भागांना मदत देणाऱ्या सरकारच्या धोरणानुसार कोंकण विभागांत काजूची लागवड करण्याकडे व मासेमारीच्या धंद्याकडे चालू वर्षीं विशेष लक्ष पुरविण्यांत आलें; आतापर्यंत ४·७२ लाख रुपये खर्च करून १·८१ लाख एकर जमीन काजूच्या लागवडीखाली आणण्यांत आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यांतहि काजूची लागवड करण्यांत येत आहे.

दूधवाडी योजना

'युनिसेफ'च्या सहकार्याने चालू वर्षीं ३ कोटींच्या वरळीच्या दूधवाडीचें काम हातीं घेण्यांत आलें. वर्षअखेरपर्यंत दूधवाडीचें प्रत्यक्ष कार्य सुरू होईल. मुंबईमधून सर्व गुरें बाहेर काढण्याच्या सरकारच्या धोरणाप्रमाणे ठाणें जिल्ह्यांतील डहाणू तालुक्यामध्ये दोन कोटींच्या आणखी एका दूधवाडीचें काम हातीं घेण्यांत येणार आहे. नासिक, कोल्हापूर, सोलापूर, कर्जत, पुणें आणि नागपूर येथील दूधयोजनांचा विस्तार करण्यांत आला आणि मिरज, तळेगांव, अकोला, अमरावती आणि औरंगाबाद येथील योजनांना मंजुरी मिळाली.

सार्वजनिक आरोग्य

राज्यामध्ये वैद्यकीय मदत खेड्यापाड्यापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने अनेक योजना हातीं घेण्यांत आल्या. अनेक ग्रामीण वैद्यकीय साहाय्यकेंद्रें चालू करण्यांत आलीं. या केंद्रांमध्ये सामान्य व्याधींवर प्रमाणित औषधें असलेल्या वैद्यकीय पेट्या ठेवण्यांत आल्या असून तीन नवे पैसे एवढा नाममात्र दर आकारून या औषधांचा फायदा रोग्यांना देण्यांत येतो. खाद्यपदार्थांत सुधारणा करण्यासाठी आणि शुश्रूषेची व्यवस्था नीट करण्यासाठी नगरपालिकांना व जिल्हा लोकल बोर्डांना आर्थिक साहाय्य देण्यांत येतें. जनतेच्या वाढत्या सहकार्याने कुटुंबनियोजन कार्यक्रम वाढविण्यांत आला. या मोहिमेचे चांगले परिणाम दिसून आले व एकूण ६०० संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्याचें उद्दिष्ट ओलांडलें गेलें.


नागपूर येथे चालू साली राज्यकामगार विमा योजना कामगारांच्या कुटुंबीयांनाहि लागू करण्यांत आली. अकोला व हिंगणघाट येथील कामगारांच्या कुटुंबीयांना ही योजना लौकरच लागू करण्यांत येईल.

औद्योगिक धोरण

समतोल विकासासाठी सरकारने औद्योगिक मंडळ कायम केलें असून पुढे कॉर्पोरेशनसाठी स्वतंत्र कायदा करण्याचा विचार आहे. कुलाबा जिल्ह्यांत खारपाडा येथे रंगाचा कारखाना व इतर अनेक कारखाने कोयना योजनेच्या पूर्ततेनंतर निघतील. कुर्ला, हडपसर, नागपूर, अमरावती व कऱ्हाड येथील औद्योगिक वसाहतींचें काम पूर्ण झालें असून मालेगाव, परळी, नांदेड, सांगली, बॅप्टिरोड (मुंबई), गोरेगांव, मरोळ (मुंबई) व इचलकरंजी येथे काम चालू आहे. डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ, नेरळ, येथे लौकरच वसाहती स्थापण्यांत येतील. पोफळी, चिपळूण, पिंप्री, गंगापूर, आपटा-सारपाडा यांजवळ मध्यम व मोठे उद्योग उभारले जातील. सरकारने उद्योगधंद्यांची संघटना व कारभार यासंबंधी सल्ला देण्यासाठी औद्योगिक सल्लागार मंडळ स्थापन केलें आहे. औद्योगिक संपर्काधिकारी नेमण्यांत आले आहेत. ते राज्य व केंद्र यांचे कायदे, धोरण, सवलती यांसंबंधी मार्गदर्शन करीत असतात. चितळी (अहमदनगर प्रकल्प) हा सरकारी उपक्रम आहे. दरसाल पावणेतीन लक्ष गॅलन आॅल्कोहोलचें येथे उत्पादन होईल. औद्योगिक शांततेसाठी त्रिसदस्य समिति नेमण्यांत आली आहे. कामगार कायदे, निवाडे, शिस्तभंगाचीं प्रकरणें यांसंबंधी चौकशीचें काम ही समिति करते. गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाच्या कामासाठी पंधराशे गाळे बांधण्यांत आले असून आणखी ३ हजार बांधले जात आहेत. पुढील कांही वर्षांत पंचवीस हजार गाळे बांधण्यांत येणार आहेत.

'महाराष्ट्रदर्शन, सौंदर्य व अद्‌भुतता' यांचें दर्शन घडविणारीं दोन प्रदर्शनें मुंबईस भरविण्यांत आलीं. दोन एक्स्प्रेस राज्यमार्ग, उत्तरेकडे व कोकणाला जोडणारे पूल व इतर रस्त्यांच्या बांधणीमुळे तिन्ही भागांची रहदारी सुलभ होऊन ते पूर्णपणें जोडले जातील.

वर दर्शविलेली केवळ पहिल्याच वर्षांतील आर्थिक प्रगति यापुढेहि आशेचे अनेक किरण दाखवीत आहे. सरकारी प्रयत्न तर वेगाने चालूच आहेत, पण राज्यांतील नामवंत संस्था आणि अर्थशास्त्रज्ञ यांच्या आणि सरकारी संघटकांच्या विचारांत सुसंवादित्व आणि सहकार्याची भावना दिसत आहे. अर्थयोजनेला आवश्यक अशी शांतता, सुव्यवस्था, कायदा आणि सत्तारूढ पक्षांतील संघटनात्मक आणि सरकारी पातळीवरील एकजिनसीपणा सरकारी योजना परिपूर्ण होण्यास हातभार लावतील अशीं चिन्हें दिसत आहेत यांत शंका नाही.



४

महाराष्ट्रांतील औद्योगिक विकास

प्रास्ताविक

औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्राला स्वातंत्र्यपूर्ण काळांत फारशी धडाडी दाखवितां आली नाही असा इतिहासाचा दाखला आहे. औद्योगिक बाबतींत असलेल्या या औदासीन्याला सभोवतालची आर्थिक, तांत्रिक किंवा राजकीय परिस्थिति जबाबदार होती किंवा महाराष्ट्रीय लोकांचा निरुत्साह, आळशीपणा आणि न्यूनगंड त्याला कारणीभूत होते किंवा कसें या बाबतींत आता चिकित्सा करीत बसणें अनुचित ठरेल. कारण स्वातंत्र्योत्तर काळांत, नियोजनमंडळाच्या नियंत्रणानुसार, आणि महाराष्ट्र राज्यस्थापनेनंतर नव्या उमेदीनें कार्यवाहींत आणलेल्या आपल्या राज्याच्या योजनेच्या चौकटींत विशिष्ट औद्योगिक तत्त्वें डोळ्यांपुढे ठेवून महाराष्ट्रांत औद्योगिक विकासाचें नवें पर्व सुरू झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत. महाराष्ट्र सरकारने या बाबतींत निश्चित पावलें टाकल्याचें अलीकडील प्रगतीवरून तर दिसत आहेच, परंतु शिवाय महाराष्ट्रांतील विविध ठिकाणीं असलेल्या व्यापारी संघटना व चेंबर्स ऑफ कॉमर्स, तसेंच, प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ, प्राध्यापक द. गो. कर्वे, डॉ. चिंतामणराव देशमुख, श्री. वा. रा. नातू, श्री. आ. रा. भट, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, श्री. दा. वा. पोतदार इ. नामवंत अर्थशास्त्रज्ञांच्या पुरस्काराने स्थापन झालेल्या महाराष्ट्र

आर्थिक विकास परिषदेच्या कार्यावरून महाराष्ट्रांतील लोक आणि संस्थाहि औद्योगिक विकास करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करणार आहेत हें दिसून येतें.

पूर्वी अनेकदा संधि येऊनहि आपण औद्योगिक धाडस केलें नाही याचीं ठळक उदाहरणें थोडींथोडकीं नाहीत. मराठ्यांच्या अमदानींत आपल्या हातीं सत्ता असतांनासुद्धा शस्त्रास्त्रनिर्मिति आणि दारूगोळा यांबाबत आपण स्वावलंबी झालों नव्हतों. पहिले बाजीराव पेशवे यांना पुण्यांत औद्योगिक व व्यापारी पेठ वाढविण्यासाठी सुरतेहून महाराष्ट्रीयेतर व्यापाऱ्यांना पाचारण करावें लागलें होतें. स्वदेशीचा मंत्र लोकमान्य टिळकांसारख्या थोर महाराष्ट्रपुत्राने दिला. पण स्वदेशीचें आवाहन प्रत्यक्ष कृतींत आणण्याचें कर्तव्य महाराष्ट्राने फारसें केलें नाही. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत परदेशांतून येणारा माल दुर्मिळ झाल्यामुळे आपल्या मालाची विक्री व उत्पादन वाढविण्यास पुरेसा वाव मिळाला असतांनादेखील महाराष्ट्राने या संधीचा भरपूर फायदा घेतल्याचें आढळत नाही. त्या मानानें महाराष्ट्र राज्यस्थापनेनंतर थोड्याच अवधींत सरकारी पातळीवरून औद्योगिक विकासाबाबत दाखविण्यांत आलेली जागरूकता आणि योजलेले उपाय आपला प्रदेश पुढील दोन योजनांच्या कालावधीअखेर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अधिक सुसंपन्न, समतोल आणि स्वावलंबी झालेला दिसून येईल अशी आशा दर्शवितो.

औद्योगिक विकासाबाबत सरकारी धोरण आणि उपाय कोणकोणते चालले आहेत हें पाहण्यासाठी येथील औद्योगिक परिस्थिति काय आहे, त्यांत कोणकोणत्या उणीवा आहेत, आज कोणते उद्योगधंदे चालू आहेत, नवे उद्योगधंदे कोणकोणते काढतां येतील, त्यांपैकी छोट्या उद्योगधंद्यांची वाढ कशी करतां येईल वगैरे तपशील प्रथम पाहणें अगत्याचें आहे.

औद्योगिक वाढींतील विषमता

औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत महाराष्ट्राचा क्रमांक भारतांत पश्चिम बंगालच्या खालोखाल म्हणजे दुसरा लागतो. पण त्याचबरोबर हें समाधान केवळ मुंबई शहराच्या प्रचंड वाढीबरोबर मिळवितां आलें आहे आणि मुंबई वगळल्यास उर्वरित महाराष्ट्रास फार मोठी औद्योगिक पोकळी भरून काढावयाची आहे असेंहि आढळून येतें. मागासलेल्या देशांत आर्थिक विषमता तीव्र स्वरूपांत असते आणि महाराष्ट्र याला अपवाद नाही. अविकसित प्रदेशाच्या विविध भागांत राहणीचें मान आणि दर माणशीं उत्पन्न या दोन्ही बाबतींत फार मोठा फरक आढळतो, व हेंच तीव्र विषमतेचें गमक आहे. महाराष्ट्रांतल्या विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई शहर या चारही भागांत आर्थिक विकासाबाबत दिसून येणारी विषमता गंभीर आहे. महाराष्ट्रांत अधिकृत अशा ८,०३६ गिरण्या आहेत. त्यांपैकी एकट्या मुंबईत ३,५३९ आहेत. महाराष्ट्रांतील गिरण्यांत सात लक्ष मजूर रोजगारीवर काम करतात. त्यांतील साडेचार लक्ष कामगार केवळ मुंबईंतील

गिरण्यांमध्ये कामास आहेत.

महाराष्ट्रांत भागीदारांच्या मालकीच्या (जॉइंट स्टॉक) सुमारे चार हजार कंपन्या आहेत. त्यांपैकी जवळ जवळ ८७ टक्के म्हणजे ३४९४ इतक्या कंपन्या एकटचा बृहन्मुंबईंत आहेत. मुंबई शहरांत दर चौदा हजार लोकवस्तीमागे बँकेची एक कचेरी उपलब्ध आहे; परंतु उर्वरित महाराष्ट्रांत हेंच प्रमाण चाळीस हजार लोकवस्तीमागे एक कचेरी एवढेंच पडतें.

इतर दृष्टींनीदेखील मुंबई आणि उरलेला महाराष्ट्र यांच्या विकासामधील तफावत जाणवण्यासारखी आहे. विजेचा खप औद्योगिक प्रगतीचें निदर्शक मानतात. या दृष्टीने पाहिल्यास एकूण महाराष्ट्रांत जेवढा विजेचा खप आहे त्यापैकी ६८ टक्के खप एकटचा मुंबई शहरांत होतो. साक्षरतेचें प्रमाणदेखील औद्योगिक वातावरणाची साक्ष देते. याहि दृष्टीने एकूण लोकसंख्येशी साक्षर लोकसंख्येचें मुंबईंत असलेलें प्रमाण पन्नास टक्क्यांच्या वर आहे, तर एकूण महाराष्ट्रांत हें फक्त एकवीस टक्के इतकेंच आहे. वेगळचा शब्दांत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्राच्या केवळ एक दशांश असलेल्या मुंबई शहरांत विजेचा खप दोन-तृतीयांश, लोकसंख्या, नोकऱ्या मिळण्याचें प्रमाण तीन-चतुर्थांश आणि गिरण्यांची संख्या दोन-पंचमांश इतकी आहे.

मुंबईखेरीज उरलेल्या प्रदेशांतहि पुन्हा तीव्र विषमता आढळते ती वेगळीच. उदाहरणार्थ, १९५५–५६ च्या आकडेवारीनुसार, सबंध महाराष्ट्र राज्यांतील दर माणशीं वार्षिक उत्पन्न २९२ रुपये आहे, पण हेंच उत्पन्न केवळ विदर्भांत २३१ रुपये व मराठवाडचांत फक्त १७४ रुपये इतकेंच आहे. साहजिकच केवळ पश्चिम महाराष्ट्रांत हें उत्पन्न जास्त म्हणजे ३४५ रुपये आहे. दळणवळणाच्या आणि वीज-पुरवठ्याच्या बाबतींतहि मराठवाडा मागे आहे, तर पश्चिम महाराष्ट्रांत देशावरील प्रदेशापेक्षा कोकण विभाग या बाबतींत मागे पडतो.

अर्थात् मुंबई आणि इतर महाराष्ट्र यांमधील विषमता नाहीशी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने पावलें उचललीं आहेत. आणि औद्योगिक विकेंद्रीकरणाचें तत्त्व प्रत्यक्षांत आणण्याचा विडाहि उचलला आहे, ही गोष्ट महाराष्ट्र राज्याच्या उद्योगधंदेविषयक केलेल्या 'मास्टर प्लॅन' वरून दिसून येतें. त्या त्या विभागांतील नैसर्गिक व खनिज संपत्तीची उपलब्धता आणि स्थानिक लोकांना रोजगार कसा मिळवून देतां येईल याचा बिचार औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या या योजनेंत प्रामुख्याने केला आहे. महाराष्ट्रभर उद्योगधंद्यांचें जाळें निर्माण होण्याच्या दृष्टीने उद्योगधंद्यांना अनुकूल अशा प्राथमिक सोयी नियोजित औद्योगिक वसाहतींत सरकार उपलब्ध करून देणार आहे. दुसऱ्या योजनेंत कोल्हापूर, हडपसर (पुणें), मालेगाव, कऱ्हाड, नागपूर, अमरावती, नांदेड, परळीवैजनाथ आणि कुर्ला (मुंबई) या ठिकाणीं औद्योगिक वसाहती स्थापन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. धुळें, जळगाव, नाशिक रोड, कर्जत-खोपोली, भिवंडी, चिपळूण,

पोफळी, इचलकरंजी, माधवनगर इत्यादि ठिकाणीं औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचें मास्टर प्लॅनमध्ये नमूद केलेलें आहे. वीज आणि पाणी-पुरवठा, दळण-वळणाचीं साधनें, कच्चा माल पुरविण्याची व्यवस्था, कारखान्यांसाठी अगदी अल्प किमतींत जमीन इत्यादि प्राथमिक औद्योगिक सोयी या वसाहतींमध्ये करून दिल्या जाणार आहेत.

नव्या उद्योगधंद्यांची गरज

वस्तुतः हा प्रश्न आता वादग्रस्त राहिलेला नाही. कोणत्याहि मागासलेल्या प्रदेशाला 'दारिद्र्यामुळे बचत करण्याची असमर्थता–त्यामुळे भांडवलाचा अभाव-त्याचा परिणाम म्हणून उद्योगधंद्यांचा अभाव आणि त्याचा शेवट म्हणजे पुन्हां दारिद्र्य' या दुष्ट चक्राच्या भोवऱ्यामधून बाहेर पडावयाचें असेल तर त्या प्रदेशाची अर्थरचना विविध स्वरूपाची असावी लागते. जेथे अर्थरचना केवळ शेती-प्रधान असते, तेथे जीवनमान गतिशून्य आणि खालच्या पातळीवर राहतें. अशा ठिकाणीं बेकारी वाढतच असते व त्यामुळे उद्योगधंद्यांना लागणारी भांडवलनिर्मिति करण्याची तेथील लोकांची कुवत अधिक घटत जाते. उद्योगधंदेच नसले म्हणजे दळणवळण, व्यापार, विम्याचा व दलालीचा व्यवसाय इत्यादि इतर अनेक क्षेत्रांतहि व्यवसाय करण्यास फारसा वाव राहात नाही. त्यामुळे लोकांचीं उपजीविकेचीं साधनें नेहमीच अपुरीं पडत राहतात. हीं सर्व मागासलेल्या अर्थ-रचनेचीं लक्षणें असतात. अशा प्रदेशांत विपुल खनिज संपत्ति असली तरी उद्योग-धंद्यांच्या अभावीं ती विनाउपयोग पडून राहिलेली असते. यदाकदाचित् या प्रदेशांत शेतींतून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांची विपुलता असली तरी, या पदार्थांचा उपयोग करणारे उद्योगधंदे नसल्यामुळे या पदार्थांना चांगली किंमत येतेच असें नाहीं व त्यामुळे या प्रदेशांत दर माणशीं उत्पन्न कमीच राहतें. शेतमजुरांना देखील त्यामुळे फारशी मजुरी मिळत नाही. उद्योगधंद्यांची गरज त्यामुळेच निर्माण होते.

जनतेच्या खालच्या थरापर्यंत पसरत जाणारें शिक्षण आणि चांगल्या दर्जाच्या राहणीसाठी लोकांच्यामध्ये निर्माण झालेली महत्त्वाकांक्षा व दिसून येणारी धडपड या दोन गोष्टीदेखील औद्योगीकरणाची आवश्यकता दर्शवितात.

वाढत्या शिक्षणाबरोबर चांगल्या राहणीची आवड निर्माण होऊन उपभोग्य वस्तूंना मागणी किती अधिक होत जाते, याची कल्पना येण्यासाठी अमेरिकेच्या समृद्ध अर्थव्यवस्थेकडे बोट दाखवितां येईल. तेथे दर तीन माणसांमागे एक मोटार-गाडी उपलब्ध आहे. तेथील मजूर आणि शेतकरी स्वतःच्या घरांत राहून स्वतःच्या गाडीने गिरणींत किंवा शेतावर जातो. त्याच्या घरीं उपयुक्त अशीं सर्व प्रकारचीं आधुनिक यंत्रें आणि टेलिव्हिजनहि असतें. कमीअधिक अंशाने असेंच समृद्ध जीवनमान इतर पाश्चात्य राष्ट्रांत आणि दुसऱ्या युद्धांत अपरिमित हानि झालेल्या

जपान व जर्मनींतहि आज आढळतें. अखिल भारतांत जेवढे टेलिफोन आज वापरले जातात त्याच्या दीडपट टेलिफोन जपानमधील एकट्या टोकिओ शहरांत आहेत !

आज आपल्या देशांतील सामान्य माणसाच्या गरजा व अपेक्षा अशाच वाढत आहेत. बैलगाड्यांची जागा सायकली व ट्रक्स घेत आहेत. पंचक्रोशीबाहेर क्वचितच पडणारे शेतकरी भारतदर्शन यात्रेंत हजारोंनी सामील होत आहेत. गुळाची जागा साखर घेत आहे, तर प्राथमिक शिक्षण सक्तीचें झाल्याने कोट्यवधि रुपयांचीं नवीं पुस्तकें तयार करावीं लागत आहेत. थोडक्यांत, सायकली, मोटारी, रेल्वे-एंजिनें, घरें, साखर, कागद अशा एक ना दोन, हजारो वस्तु नव्याने आपणांला आपल्या देशांतच बनवायच्या आहेत. उद्योगधंद्यांखेरीज त्या निर्माण तरी कशा होणार ?

लोकसंख्येचा प्रश्न

केवळ शेतावर कितीहि भांडवल आणि श्रम गुंतविले तरी शेतीच्या विकासाला महाष्ट्रांतहि मर्यादाच पडणार आहेत. महाराष्ट्रांतील बरीचशी जमीन कनिष्ठ आणि मध्यम दर्जाचीच आहे. पश्चिम महाराष्ट्रांत बऱ्याचशा भागांत पाऊस अगदीच तुरळक व अनिश्चित असतो. महाराष्ट्रांत जेवढ्या जमिनीवर शेती होते त्याच्या फक्त पांच टक्के जमीन कालवे, विहिरी, तळीं इत्यादि मार्गांनी आज पाण्याखाली भिजते. भारतांत हेंच प्रमाण १७ टक्के आहे. खूप मोठ्या प्रमाणावर पाटबंधाऱ्याचे कार्यक्रम वाढवूनहि महाराष्ट्रांतील २० टक्क्यांपेक्षा अधिक जमीन पाण्याखाली आणतां येणार नाही. साहजिकच, बऱ्याचशा भागांत कोरडवाहू शेतीच चालू ठेवावी लागणार आहे. नेमक्या अशाच वेळीं वाढत्या लोकसंख्येमुळे व शिक्षणाच्या सोयीमुळे शिक्षण व पदव्या घेऊन बाहेर पडणाऱ्या तरुण उमेदवारांची संख्याहि प्रतिवर्षी अधिक वेगाने वाढत जाणार आहे. सुशिक्षित आणि त्यांतील विशेषतः तांत्रिक शिक्षणाची पात्रता मिळविलेल्या तरुणांचे श्रम, बुद्धि व शिक्षणावर झालेला खर्च जास्तींत जास्त चांगल्या तऱ्हेने उपयोगांत आणावयाचा असेल व विकासाला अगोदरच मर्यादा असलेल्या शेतीच्या क्षेत्रावर त्यांचा भार पडूं द्यावयाचा नसेल तर नव्या पिढींतील उमेदवारांसाठी शेतीव्यतीरिक्त इतर क्षेत्रांत नवे व्यवसाय निर्माण झाले पाहिजेत आणि त्यासाठीच औद्योगीकरण हवें.

महाराष्ट्राची लोकसंख्या आज साडेतीन कोटींच्या आसपास आहे. आणखी दहा वर्षांनी ती चार कोटि आणि पंचवीस वर्षांनी पांच कोटि होईल असा अंदाज आहे. म्हणजे येत्या पंचवीस वर्षांत दीड कोटि अधिक लोकांना चांगल्या दर्जाचें जीवनमान पुरवूं शकणारे व्यवसाय उपलब्ध करण्याची जबाबदारी आपणांवर आहे. आधुनिक स्वरूपाच्या उद्योगधंद्यांत प्रत्येक नव्या माणसाला काम उपलब्ध करून द्यावयाचें म्हणजे त्यासाठी दर माणसामागें दोन हजार रुपयांहून अधिक भांडवलाची गुंतवणूक करावी लागते. त्यांत लोखंड, कोळसा यांसारखे मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे

काढण्याचा कार्यक्रम असेल तर दर माणशीं गुंतवणुकीचें हें प्रमाण कितीतरी अधिक वाढेल.

केवळ लोकसंख्यात्र वाढत आहे असें नसून, शिक्षण घेतलेल्या उमेदवारांची संख्याहि वाढत आहे. दहाच वर्षांपूर्वी एस्. एस्. सी. बोर्डाच्या परीक्षेंत पश्चिम महाराष्ट्रांतून १६,०२८ उमेदवार उत्तीर्ण झाले. १९६१ मध्यें उत्तीर्ण उमेदवारांची संख्या ३८,२७१ इतकी झाली आहे. तसेंच दहा वर्षांपूर्वी एकटया पुणें विद्यापीठांतून एकूण १६२६ उमेदवार पदवीधर म्हणून बाहेर पडले. १९६१ मध्ये हीच संख्या ३२४५ इतकी झाली आहे. अशीच वाढ इतर विद्यापीठांमधून बाहेर पडणाऱ्या सुशिक्षित तरुणांच्या संख्येंत होत आहे. या आकडयांवरूनदेखील सुशिक्षित उमेदवारांना त्यांच्या लायकीप्रमाणे योग्य काम देण्याचा प्रश्न उत्तरोत्तर किती तीव्र होत जाणार आहे याची कल्पना येते. वाढती लोकसंख्या, वाढतें शिक्षण, राहणीचें मान वाढविण्याची महत्त्वाकांक्षा आणि शेतीविकासाला असलेली मर्यादा औद्योगीकरणाची आत्यंतिक आवश्यकता दर्शवितात.

शेतीउत्पन्नाला आणि कृषि-उद्योगांना वाव

त्यांतून औद्योगिक विकासाला महाराष्ट्रांत कोणत्याहि बाजूने अजिबात वाव नसता तर दारिद्र्याच्या दुष्ट चक्रांत फिरण्याखेरीज दुसरा उपाय राहिला नसता. परंतु आजच्या वैज्ञानिक युगांत महाराष्ट्रांतील नैसर्गिक आणि खनिज संपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याची शक्यता प्राप्त झाल्यामुळे कल्पकता व धडाडी दाखविल्यास उद्योगप्रधान होणें महाराष्ट्रास फारसें कठीण व दूरचें राहिलेलें नाही. महाराष्ट्रांत व्यापारी पिकांची वाढ होण्यास भरपूर वाव असल्यामुळे शेतीवर आधारलेले उद्योगधंदे ग्रामीण भागांत जागोजागीं काढतां येतील. तेलबिया, कापूस, ऊस, तंबाखू आणि संत्रीं, आंबे, काजू, अननस आणि केळी हीं फळफळावळें आजहि महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर मिळत आहेत. आणि जमिनीच्या उत्पादनक्षमतेंत व शेती करण्याच्या पद्धतींत जसजशी प्रगति होत जाईल तसतशीं हीं पिकें अधिकच मिळत जातील. भारतांतल्या तेलबिया व कापूस यांची लागवड असलेल्या एकूण क्षेत्रफळापैकी अनुक्रमें एक-षष्ठांश व एक-चतुर्थांश क्षेत्रफळ एकटया महाराष्ट्रांत आहे. कापसाची लागवड एकटया विदर्भांत ३५ लक्ष एकर जमिनीवर होते व तींत ७ लक्ष गाठी कापूस पिकतो. हेंच प्रमाण मराठवाड्यांत वीस लक्ष एकर आणि २½ लक्ष गाठी आणि केवळ खानदेशांत नऊ लक्ष एकर व दोन लक्ष गाठी इतकें आहे. तेलबियांच्या लागवडीसाठी एकूण महाराष्ट्रांतील ३४ लक्ष एकर जमीन उपयोगांत आली आहे. संत्र्यांचें उत्पादन केवळ विदर्भांत एक लक्ष टन इतकें होत असतें. परकीय चलन मिळवून देणारे काजू केवळ कोकणपट्टींत सात हजार टन होतात. आंब्याचें उत्पादन दरसाल २३ हजार टन आणि केळयांचें ३६ हजार टन इतकें आहे. या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग स्थानिक छोटे उद्योगधंदे व कृषि-उद्योग काढण्या-

करिता सहज करतां येईल. खनिज संपत्तीच्या बाबतींतहि सह्याद्रीचा आसमंत हा विविध प्रकारच्या धातूंचें आगरच आहे अशा तऱ्हेचे अंदाज शास्त्रज्ञांकडून नेहमीच दिले गेले आहेत. महाराष्ट्रांत कोळशाचें उत्पादन गेल्या दहा वर्षांत साडेतीन लक्ष टनांनी आणि कच्च्या लोखंडाचें उत्पादन तीन लक्ष आठ हजार टनांनी अधिक वाढलें आहे असें अंदाजपत्रक सादर करतांना महाराष्ट्र राज्याच्या अर्थमंत्र्यांनी गेल्याच वेळीं सांगितलें. ॲल्युमिनियमला उपयोगी पडणारे बॉक्साईटचे साठेदेखील कोल्हापूर भागांत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाले आहेत.

आजचे उद्योगधंदे

महाराष्ट्रांत सध्या पुढे आलेल्या प्रमुख उद्योगधंद्यांपैकी म्हणून साखर, कापड, एंजिनिअरिंगच्या क्षेत्रांत मोडणारीं कामें, कांचसामान व कागद या धंद्यांचा उल्लेख करावा लागेल. परंतु याहि धंद्यांमध्ये सुधारणा करून कार्यक्षमता, अधिक रोजगार आणि नफा यांत वाढ करण्यास अजूनहि खूप वाव आहे. वास्तविक पाहतां कापडाचा उद्योगधंदा भारतांत प्रथम महाराष्ट्रांत सुरू झाला. आजहि इतर प्रांतांतल्यापेक्षा महाराष्ट्रांत कापडगिरण्या सर्वांत जास्त आहेत. भारतांतील एकूण गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडउत्पादनापैकी ४६ टक्के कापड व सूत-उत्पादनापैकी ४४ टक्के सूत एकटच्या महाराष्ट्रांत निर्माण होते. तसेंच महाराष्ट्रांतील सर्व प्रकारच्या कारखान्यांत काम करणाऱ्या सात लक्ष कामगारांपैकीं तीन लक्ष कामगार एकटच्या कापडधंद्यांत आहेत. परंतु या कापड गिरण्यांतील यंत्रसामुग्री जुनी झालेली आहे. नव्या सामुग्रीसाठी त्यांना अजून परदेशांवर अवलंबून राहावें लागतें. तसेंच धंद्यांतील उत्पादनपद्धतीचें आधुनिकीकरण करण्याकडे अनेक कारणांमुळे दुर्लक्ष झाल्याने उत्पादनखर्च जास्त येतो व बाजारांत स्पर्धेमुळे टिकाव धरणें त्यांना कठीण होत आहे.

साखरधंदा मात्र महाराष्ट्रांत उशिरा सुरू झाला असला तरी तो फार मोठ्या प्रमाणावर पुढे येण्याची शक्यता दर्शवीत आहे. महाराष्ट्रांतील उसाचें दर एकरीं उत्पादन आणि या उसांतील साखरेचें प्रमाण जावा, सुमात्रा आणि मॉरिशस या साखरनिर्मितींत आघाडीवर असणाऱ्या देशांशीं बरोबरी करण्याइतकें विपुल आहे. त्यामुळेच अलीकडे साखरेचे अनेक कारखाने भराभर पुढे आले. महाराष्ट्रांत आज खाजगी भांडवलाचे तेरा व सहकारी पद्धतीवर काढलेले तेरा असे एकूण २६ कारखाने चालू आहेत. यांखेरीज साखरकारखान्यांना अनेक उपपदार्थ तयार करतां येणार आहेत ते वेगळेच.

एंजिनिअरिंगच्या क्षेत्रांत कृषिप्रधान महाराष्ट्राला उपयुक्त होणारीं नांगर, चरक, पंप, रहाट, शेंगा फोडण्याचीं यंत्रें इत्यादि यंत्रें तयार करण्यांत, तसेंच लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणारे सेंट्रिफ्यूगल पंप्स, कंदील, डिझेल एंजिनें, इलेक्ट्रिक मोटर्स, रंग, मशीन टूल्स, यंत्रमाग, पिठाच्या व तेल गाळण्याच्या चक्क्या

इत्यादि माल बनविण्यांत किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी, वालचंदनगर, टिकेकरवाडी, कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी, पुणें, बेळगांव, नागपूर येथील ४५० वर कारखान्यांनी कौतुकास्पद कामगिरी करून दाखविली आहे.

महाराष्ट्रांतील व्यापारी पिकें आणि खनिज संपत्ति यांचें वैपुल्य लक्षांत घेतल्यास अनेक नव्या उद्योगधंद्यांना वाव दिसून येतो. एंजिनिअरिंगच्याच क्षेत्रांत यंत्रोपकरणें, सायकली, शिवणयंत्रें, घड्याळें, अवजारें यांचे कारखाने कोयनेची वीज मिळणाऱ्या परिसरांत काढणें शक्य आहे. विजेचे पंखे, रेफ्रिजरेटर, बॉक्साइटपासून ॲल्युमिनियम हे कारखानेहि तेथेच काढतां येतील. पुणें व नाशिक येथे तांब्या-पितळेचे पत्रे व भांडीं तयार करण्याचे कारखाने अधिक निघूं शकतील. धातूंचे व ओतीव कामाचे कारखाने खुद्द मुंबईमध्ये पन्नासच्यावर गेले आहेत. मुंबईच्या उपनगरांत या कारखान्यांची वाढ अधिक होऊं शकेल.

भात चांगला पिकणाऱ्या भागांत पोह्यांचे मोठे कारखाने काढणें शक्य आहे. सातारा व कऱ्हाड या भागांत, तसेच वऱ्हाडमध्ये, वनस्पतिजन्य तुपाचे व खाण्याच्या तेलाचे कारखाने निघावेत. सातारा, सांगली या भागांतील कृष्णा खोऱ्यांत, त्याचप्रमाणे वऱ्हाड व खानदेशमध्ये दूध मुबलक असल्यामुळे दुधापासून तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या उद्योगांची निर्मिति होऊं शकेल. सातारा जिल्ह्यांत एरंडीचें तेल काढण्याच्या गिरण्या व मुंबई उपनगरांत साबण, टॉफी, रंग इत्यादि पदार्थांचे कारखाने वाढविण्यास अनुकूलता आहे. चांदा, अमरावती या विदर्भांतील जंगल प्रदेशांत औषधी वनस्पति विपुल आहेत. ठाणें जिल्ह्यांत इमारतीस लागणारें लाकूड मोठ्या प्रमाणावर आढळतें.

जंगल-संपतींत तर महाराष्ट्र खूपच समृद्ध आहे. त्यांतून फार मोठी उद्योगक्षमता निर्माण करतां येईल. पुढील जंगलसंपत्ति महाराष्ट्रांत भरपूर प्रमाणांत मिळते.

(१) इमारती लाकूड – सागवान, चंदन, शिसवी, बाभूळ, खैर.

(२) जळण – बाभूळ, ऐन, धावडा, जांभूळ, चिंच, खैर, हिरडा.

(३) गवत, बांबू व वेत – हिरडा, बाभूळ, कडोल (यांपासून केलेला डिंक मोठ्या प्रमाणावर इंग्लंड-अमेरिकेंत निर्यात होतो व कापडछपाई व सौंदर्यप्रसाधन वस्तूंकरिता त्यांचा उपयोग होतो.)

खानदेशांतील रोषा गवताच्या तेलापासून उंची अत्तरें व साबण इत्यादि सुगंधी माल तयार होतो.

(४) प्राणिज व खनिज पदार्थ – लाख, मध, मेण, कातडीं, शिंगें, चुना, दगड, बॉक्साइट, हेमाईट, कोळसा.

(५) औषधी – हिरडा, बेहडा, आवळा, बेल, शिकेकाई, आपटा, टेंभुर्णी, अंजन, निंब, अशोक.

मच्छीमारीच्या धंद्यांतहि महाराष्ट्र अग्रेसर आहे. यांत्रिक सामुग्रीने सुसज्ज

असलेल्या मच्छीमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या बोटी महाराष्ट्रांतील किनाऱ्यावर सर्वांत जास्त आहेत. मच्छीमारीवर आज दीड लाख लोकांचा उदरनिर्वाह चालतो.

गोंदिया व नागपूर भागांत काचेच्या धंद्याला लागणारीं कच्चीं द्रव्यें मिळत असल्यामुळे तेथे काचेचें उत्पादन वाढवावयास वाव आहे. यवतमाळ जिल्ह्यांत सीमेंट तयार करतां येईल. कारण त्यास लागणारा सगळा कच्चा माल तेथेच उपलब्ध आहे. खतासाठी हाडाची पूड तयार करण्याचे कारखाने कोणत्याहि मोठ्या शहराच्या नजीक काढतां येतील. रबर जरी बाहेरून आणावें लागलें तरी रबराचे टायर्स, जोडे, फुगे, ट्यूब्स इत्यादि वस्तूंचे कारखाने महाराष्ट्रांत जेथे पाण्याची सोय असेल अशा कोणत्याहि ठिकाणीं निघावयास हरकत नाही. कारण अशा धंद्यांत वाकबगार कामगारवर्ग फारसा लागत नाही. चांदीचे दागिने तयार करण्यांत कोल्हापूरनजीकच्या हुपरी या लहान गावाने मोठी कीर्ति मिळविली आहे. कच्च्या कातड्याची उपलब्धता सातारा, सांगली, कोल्हापूर भागांत खूप असल्यामुळे कातड्यांचे पदार्थ, उदा. कमावलेलें कातडें व पादत्राणें तयार करणें इत्यादि निर्मिति–केंद्रें या भागांत निघू शकतील.

सरकारी क्षेत्र

बिहार, ओरिसा किंवा म्हैसूर या राज्यांतल्याप्रमाणे महाराष्ट्रांत सरकारी क्षेत्रांतील औद्योगिक योजना फार मोठ्या प्रमाणावर नाहीत हें खरें आहे. पिंपरी येथील सरकारी क्षेत्रांतील पेनिसिलिनचें उत्पादन हेंच एक नांव घेण्याजोगें केंद्र आहे. परंतु एखादा विशिष्ट सरकारी उद्योगधंदा महाराष्ट्रांत निघालाच पाहिजे हा आग्रह धरण्यापेक्षा सर्वसाधारण औद्योगीकरणासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या प्राथमिक सोयी अधिक प्रमाणांत उपलब्ध करून देण्याविषयी खटपट करणें उचित ठरेल. या दृष्टीने दळणवळणाच्या आणि वीजपुरवठ्याच्या बाबतींत वाढ होण्याचा प्रयत्न अधिक नेटाने झाला तर फार मोठा कार्यभाग साधेल. आपल्याकडे विजेचा खप कमी आहे; इतकेंच नव्हे तर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागांत विजेच्या खपामध्ये होत गेलेली वाढ अगदी अत्यल्प आहे. ठाणें जिल्ह्यांत मात्र एका वर्षांत १९५५ मध्यें विजेच्या खपांत २० टक्के वाढ झाली. यावरून केवळ मुंबई उपनगरांत उद्योगधंदे पसरत असल्याचें दिसून येतें. गेलीं कित्येक वर्षे नव्या उद्योगधंद्यांना दिल्या गेलेल्या परवान्यांपैकीं निम्म्यापेक्षा अधिक एकट्या मुंबई शहरांतील होते.

वरील अडचणी लक्षांत घेतां वीजपुरवठा, दळणवळण, औद्योगिक वसाहतींची स्थापना आणि खनिज संपत्तीचें संशोधन व उत्खनन या चार कार्यक्रमांवर सरकारी क्षेत्रांतील श्रम केंद्रित व्हावयास पाहिजेत.

वीज आणि कोळसा

वीज आणि कोळसा हीं तर औद्योगीकरणाचीं चाकेंच आहेत. महाराष्ट्रांत

कोळशाच्या उत्पादनांत वाढ होत असली तरी चांदा, भंडारा आणि नागपूर या तीन जिल्ह्यांखेरीज इतरत्र कोळशाचे साठे अजिबात नाहीत. महाराष्ट्राच्या बहुतेक भागांत कोळसा लांबून आणावा लागतो व त्यामुळे उत्पादनखर्च वाढतो. तेलाचेहि स्थानिक साठे महाराष्ट्रांत नाहीत. मुंबईजवळ असलेल्या तेलशुद्धीकरण केंद्रामुळे पेट्रोल आणि रसायनें यांची निर्मिति जी कांही थोडीफार होऊं शकेल तेवढाच फायदा. महाराष्ट्राच्या कांही भागांत जलनिर्मित विद्युत्‌शक्तीचा पुरवठा वाढवितां येण्यास मात्र खूप वाव आहे. मोठा उतार असलेल्या सह्याद्रीच्या परिसरांतील मुसळधार पर्जन्याचा कोयना विभागांत विद्युत्‌निर्मितीकरिता उपयोग करून घेतां येतोच आहे. चाळीस वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या टाटा वीजनिर्मिति केंद्राने मुंबईच्या प्रचंड औद्योगीकरणाला फार मोठा आधार दिला आहे. कोयनेची वीज पूर्णपणें मिळूं लागल्यावर पश्चिम महाराष्ट्रांत वीजपुरवठा दुप्पट होईल, व त्यामुळे रत्नागिरी, कुलाबा, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणें, सोलापूर, अहमदनगर, नाशिक आणि पश्चिम मराठवाडा या प्रदेशांना फार फायदा होईल. नागपूर विभागांतहि वैनगंगेच्या खोऱ्यांत व पंच आणि पेनगंगा नद्यांच्या साहाय्यानें विदर्भांत भरपूर व स्वस्त वीज पुरवितां येईल. तसेंच उत्तरेकडील नर्मदा आणि दक्षिणेकडील शरावती या नद्यांवर निर्माण होणारी वीज जर त्या त्या प्रदेशांत पुरवून शिवाय उरली तर तिचा महाराष्ट्राला उपयोग होऊं देण्यांत फारसा खर्च येणार नाही. पूर्णा नदीवरील योजनेमुळे मराठवाड्याला अधिक वीज मिळूं शकेल.

महाराष्ट्रांत एकूण ५३६ गावांत (खेडीं धरून) वीज-पुरवठा होतो. महाराष्ट्रांत एकूण गावें ३५,८९९ आहेत हें लक्षांत घेतां महाराष्ट्रांत एकूण गांवें व खेडीं यांच्या संख्येच्या फक्त दीड टक्का गावांत (खेड्यांसह) वीज उपलब्ध आहे. या ५३६ गावांपैकीं ३३२ गावें विदर्भांत आहेत, १९६ पश्चिम महाराष्ट्रांतील आहेत आणि फक्त आठ गावें (खेडी धरून) मराठवाड्यांतील आहेत. केवढी प्रादेशिक विषमता ही !

छोटे उद्योगधंदे

इतर प्रांतांतल्याप्रमाणे महाराष्ट्रांतहि छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाला पुष्कळ वाव आहे. महाराष्ट्र सरकारने छोट्या उद्योगांसाठी विशेष लक्ष पुरविण्याचें ठरविलें आहे. आता छोट्या धंद्यांसाठी एक स्वतंत्र 'डिरेक्टोरेट' उघडलेलें आहे. ग्रामोद्योगांसाठीहि एक मंडळ आहे. परंतु विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र डिरेक्टोरेट काढल्यास स्थानिक प्रश्नांकडे अधिक लक्ष पुरवितां येईल. स्थानिक व्यापारी संघटनांनी (चेंबर्स ऑफ कॉमर्स) आपल्या प्रदेशांतील लहान उद्योग करणाऱ्यांच्या अडचणींचें निवारण करण्यासाठी, प्रयत्न करणें अगत्याचें आहे. कित्येकदा असें आढळतें, की सरकारने देऊं केलेल्या सवलती व सोयी यांचा बऱ्याच छोट्या कारखानदारांना पत्ताच नसतो. पुण्याच्या 'मराठा

चेंबरने लहान उद्योगधंद्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र विभाग उघडला आहे हें स्वागतार्ह आहे. ग्रामोद्योग मंडळाने घोंगड्या, निरा, दोरखंड वळणें, कागद, मधमाश्यापालन, ताडगूळ, तेलघाणी, हातसडीचा तांदूळ, चर्मोद्योग, साबण, कुंभारकाम इत्यादि उद्योगांना मदत देण्याच्या योजना आखल्या आहेत, पण अजूनहि यांत तीन उणीवा आढळतात. छोट्या उद्योगधंद्यांशीं संबंधित अशी सर्व प्रकारची विश्वासार्ह आकडेवारी मिळविणें अद्याप सोपें आणि सुरळीत झालेलें नाही. त्यामुळे त्यांतील निश्चित प्रगतीचें मान कळत नाही. सरकारी मदतीचा ओघ चालू असूनहि छोटे उद्योग करणारे स्वावलंबी होण्यास कितपत शिकले हें कळू शकत नाही. भारत सरकारने लघुउद्योगधंद्यांसंबंधी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या छोट्या पुस्तकांचा या बाबतींत उल्लेख करणें अवश्य आहे. छोट्या धंद्यांना कृत्रिमपणें जगविण्याच्या प्रयत्नांत मोठ्या, सुसंघटित धंद्यांवर घातलेलीं नियंत्रणें किती काळ चालू राहणार हा प्रश्न मोठ्या धंद्यांना भेडसावतो. तिसरी उणीव म्हणजे पूर्वीं भरभराटींत असलेले ग्रामीण छोटे धंदे अलीकडे डबघाईस कां येत आहेत याची शास्त्रीय चिकित्सा केल्याचें ऐकिवांत नाही. मिठाच्या धंद्यावर आज सुमारे दहा हजार लोक पोट भरतात. याच धंद्यावर पूर्वीं पन्नास हजार लोक पोट भरीत असत. कापडावरील छपाईकाम पूर्वीच्या मानाने हल्ली $\frac{1}{4}$ इतकेंच होतें. खानदेश व नाशिक जिल्ह्यांत यास जास्त वाव आहे.

अर्थव्यवस्थेतील प्रादेशिक समतोल साधण्यासाठी आणि शहरें व खेडीं यांच्यामधील विषमता कमी करण्यासाठी खेडोपाडीं लहान उद्योगधंदे काढण्यास उत्तेजन देणें हें सरकारचें मुख्य धोरण असेल. खेडोपाडीं जेव्हा वीजपुरवठा होऊं शकेल तेव्हा खेड्यांतील विजेवर चालणारे लहान उद्योगधंदे शहरांतील कारखान्यांपेक्षा कोणत्याहि दृष्टीने मागे पडणार नाहीत असा इतर देशांचा अनुभव आहे. पश्चिम जर्मनींत ९० टक्के कारखान्यांमध्ये कामगारांची संख्या शंभरांपेक्षा कमी आहे असें आढळतें. हे लहान कारखान देशांतील एकूण उत्पादनापैकीं २३ टक्के उत्पादन निर्माण करतात. संयुक्त संस्थानांत लहान उद्योगधंद्यांची संख्या ४० लक्षांचे वर आहे. जपानमध्ये लहान व मध्यम उद्योगधंद्यांची संख्या इतकी मोठी आहे की प्रत्येकी तीनशे कामगारांपेक्षा कमी असलेल्या कारखान्यांची संख्या ९९ टक्के आहे.[1] आपल्याजवळील भांडवल मर्यादित पण श्रमपुरवठा भरपूर असल्यामुळे लहान उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचें धोरण उचितच आहे. परकीय चलनाचा तुटवडा असल्यामुळे उपभोग्य व औद्योगिक मालाच्या आयातीवर अधिक नियंत्रणें येत आहेत. अशा वेळीं लहान उद्योगधंद्यांनी नवीन माल उपलब्ध केल्यास अनावश्यक आयातींत आणखी कपात करतां येऊन परकीय चलन वांचेल. केंद्रसरकारनें काढलेल्या 'स्मॉल स्केल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिटयूट' आणि 'नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन

[1] लहान उद्योगधंद्यांवरील भारतीय उत्पादनक्षमता समितीचा अहवाल अधिक संदर्भाकरिता पाहा

लि.' तर्फे लहान उद्योगधंद्यांसाठी मिळणाऱ्या मदतीच्या योजना कार्यवाहींत आणण्यास राज्यसरकार मदत करतें. महाराष्ट्रांतहि केंद्र सरकारच्या धर्तीवर लहान उद्योगधंद्यांसाठी कॉर्पोरेशन स्थापन होणार असल्याचें नुकतेंच घोषित झालें आहे. कोयनेची दुसरी विकास अवस्था पुरी झाल्यावर कमी खर्चात अधिक उत्पादन करण्याचें लघु-उद्योगांचें सामर्थ्य निश्चितच वाढेल आणि पंजाबप्रमाणेच येथेहि छोटया धंद्यांचें जाळें पसरेल. पुण्याच्या मराठा चेंबरने छोटया उद्योगधंद्यांसाठी जसें कार्य चालू ठेवलें आहे तसें इतरत्रहि व्हावयास हवें.

मास्टर प्लॅन

महाराष्ट्र राज्यसरकारचा उद्योगधंदेविषयक 'मास्टर प्लॅन' सरकारच्या उद्योगविषयक उत्साही धोरणाची साक्ष देतो. धंद्यांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सोयी आणि साधनसंपत्ति लक्षांत घेऊन कोणत्या भागांत कशा तऱ्हेचे उद्योगधंदे काढतां येतील याचें सुंदर मार्गदर्शन या योजनेंत आहे. राज्यांतील विविध भागांतील हवामान, पाऊस, लोकसंख्या याचबरोबर तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, साधनांची अनुकूलता, झालेल्या औद्योगिक विकासाची पातळी आणि कृषिसंपत्ति किंवा खनिज संपत्तीची विपुलता यांविषयी त्यांत बहुमोल विवेचन आहे. औद्योगिक विकेंद्रीकरण कसें करतां येईल आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा अधिक उपयोग कसा करतां येईल याविषयी निवेदन करून महाराष्ट्रांत विविध ठिकाणीं औद्योगिक वसाहती कोठे काढल्या जातील आणि काढाव्यात याबद्दलच्या त्यांत शिफारसी आहेत. मुंबईसारख्या शहराभोवतीच अधिक दाटी होऊं नये म्हणून औद्योगिक वसाहतींबरोबरच तेथे धंदे स्थापन होण्याकरिता अनुकूल धोरण ठेवण्याचा सरकारचा मानस आहे. औद्योगिक वसाहतींत मालाची ने-आण करण्याकरिता स्वस्त व कार्यक्षम वाहतूक-व्यवस्था करणें, वीज, पाणी वगैरे प्राथमिक सोयी निर्माण करणें, कमी व्याजानें कर्ज पुरविणें, भाड्याने सुटीं यंत्रें व तांत्रिक मदत पुरविणें, इत्यादि उपायांनी औद्योगिक विकेंद्रीकरणास प्रोत्साहन देण्याचा सरकारचा विचार चालू आहे.

कृषि-उद्योगधंदे

महाराष्ट्रांतील कृषिप्रधान निसर्गसंपदा लक्षांत घेतां ना. यशवंतरावजी चव्हाण यांनी उल्लेखिलेल्या कृषि-उद्योगधंद्यांवर (Industries) आपण भर देणें फार सयुक्तिक होणार आहे. भांडवलाचा तुटवडा, परकीय चलनाची वाण, तंत्रज्ञांची उणीव, संघटना-कौशल्याचें न्यून यांपैकी कोणत्याहि मर्यादा येथे कितीही तीव्र प्रमाणांत असल्या तरी कृषिपदार्थाधिष्ठित उद्योगधंदे वाढण्याच्या त्या आड येत नाहीत उलट त्या त्या ठिकाणचीं कृषि-पिकें व व्यापारी पिकें यांचा तेथेंच उपयोग केल्यास स्थानिक लोकांना रोजगार व व्यवसाय मिळतो, अधिक पीक काढण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळतें. व्यापारी व कृषिपिकांना चांगली किंमत येते व खेडोपाडीं छोटे उद्योगधंदे निघून औद्योगिक विकेंद्रीकरणाचें तत्त्व आपोआप

प्रत्यक्षांत येतें. कृषि-उद्योगधंद्यांच्या वाढीचें धोरण महाराष्ट्राला कमी खर्चाचें, सहजसाध्य आणि उत्पन्नाचीं साधनें वाढविण्यास वाव देणारें आहे. म्हणून ना. चव्हाणांच्या या धोरणाचें अर्थशास्त्रीय वर्तळांत स्वागत करण्यांत आलें.



५

महाराष्ट्रांतील दळणवळण

दळणवळण हा कोणत्याहि प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा मानला जातो. वाहतूकव्यवस्थेस अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या म्हणतात तें योग्यच आहे. दळणवळणाच्या अभावीं आर्थिक प्रगति डबक्यांतल्या पाण्यासारखी गतिशून्य राहते. आणि दारिद्र्याचें दुष्ट चक्र फोडण्याची वाटच उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागांत तयार होणारीं व्यापारी पिकें किंवा धान्य यांची वेळेवर वाहतूक न झाल्यास पिकांना योग्य ती किंमत येऊं शकत नाही. ज्या बाजारांत जास्त किंमत आहे अशा ठिकाणीं वाहतुकीच्या अभावीं माल पाठविणें शक्य नसल्यामुळे स्थानिक बाजारपेठेंतच येईल त्या किंमतीला माल विकावा लागतो. पुरेशी वाहतूक नसल्यास उद्योगधंदे, व्यापार, बँकांचे व्यवहार, दलालीचे व्यवसाय इत्यादि सर्व गोष्टींचीच कुचंबणा होते. कारखान्यांना वेळेवर कच्चा माल मिळणें आणि तयार मालाची वाहतुक कार्यक्षमतेने होणें आवश्यक असतें. देशांतील शैक्षणिक व सांस्कृतिक एकजिनसीपणा निर्माण होण्यासाठीहि दळणवळणाच्या विविध साधनांचें सर्वत्र जाळें पसरलेलें हवें.

पण त्याबरोबरच दळणवळणाचीं साधनें विकसित करण्याकरिता भांडवल दीर्घ मुदतीचें व मोठ्या प्रमाणावर लागतें. साहजिकच वाहतुकविकासाची जबाबदारी सरकारावर अधिक येऊन पडते. सरकारलाच वाहतुकीच्या साधनांवर नियंत्रण ठेवणें

अगत्याचें असतें. दळणवळणाच्या विविध साधनांमध्ये शक्ति वाया जाईल अशी अनावश्यक स्पर्धा होऊं न देतां सुसूत्रता निर्माण व्हावी म्हणून, आणि मालाची व उतारूंची वाहतूक जास्तींत जास्त कार्यक्षमतेने, वेगाने व स्वस्तांत व्हावी म्हणन वाहतुकीच्या महत्त्वाच्या साधनांवर सरकारला खूपच लक्ष द्यावें लागतें.

महाराष्ट्रांतील स्थिति

पूर्वीच्या मुंबई सरकारने दळणवळणाच्या विकासाच्या बाबतींत बरेंच लक्ष घालून विविध प्रकारच्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि आताहि महाराष्ट्र सरकारने तिसऱ्या योजनेंत दळणवळणाच्या कार्यक्रमाकडे विशेष लक्ष दिलें आहे. मोटारीच्या उतारूवाहतुकींचें नियंत्रण व मालकी मुंबई सरकारने आपल्याकडे घेऊन प्रांतांतील खेडोपाडीं होणाऱ्या वाहतूकव्यवस्थेंत अल्पावधींत परिवर्तन केलें. अशीच प्रगति पुढेहि होणार हें जरी खरें असलें, तरी महाराष्ट्रांतील दळणवळणाची स्थिति किती असमाधानकारक आहे व सरकारला या बाबतींत केवढा मोठा प्रयत्न करावा लागणार आहे याची कल्पना येण्यासाठी महाराष्ट्रांतील दळणवळणविषयक विवेचन आवश्यक आहे. महाराष्ट्रांतील क्षेत्रफळ, लोकसंख्या, आर्थिक विकासाची गरज, महाराष्ट्राच्या विविध भागांत झालेली दळणवळणाची एकांगी वाढ व विषमता नाहीशी करण्याची आवश्यकता या कोणत्याहि दृष्टीने पाहतां आपल्या सरकारवर दळणवळणाची प्रगति करण्याची खूप मोठी जबाबदारी आहे हें दिसून येतें. महाराष्ट्रांतील दळणवळणाची स्थितिदेखील कोणतेंहि मोजमाप लावलें असतांनासुद्धा समाधानकारक वाटत नाही. दर शंभर चौरस मैलांस रेल्वेचें सबंध भारतांत असलेलें प्रमाण पावणेतीन मैल आहे, तर महाराष्ट्रांत तें सव्वादोन मैलदेखील नाही. दर शंभर चौरस मैलांस रस्त्याच्या लांबीचें प्रमाण भारतांत एकवीस मैल आहे, तर महाराष्ट्रांत तें साडेसतरा मैल आहे. हेंच प्रमाण फ्रान्समध्यें १८४ मैल आणि इंग्लंडमध्यें २०२ मैल आहे.

रस्तेवाढ

महाराष्ट्राच्या विविध भागांतील रस्त्यांची वाढ सारख्या प्रमाणांत झालेली नाही. मुंबई व पुणें विभागांत दर शंभर चौरस मैलांना हें प्रमाण साडेसव्वीस मैल आहे तर औरंगाबाद आणि नागपूर विभागांत हेंच प्रमाण अनुक्रमें फक्त ११·३ आणि १०·२ इतकेंच आहे. महाराष्ट्रांतील एकूण रस्त्यांची लांबी २०८१४ मैल आहे. त्यापैकी पक्के रस्ते १३२६० मैल लांबीचे आहेत.

१९४३ मध्यें रस्तेवाढीची आखलेली योजना 'नागपूर योजना' या नांवाने ओळखली जाते. क्षेत्रफळ, लोकसंख्या, त्या त्या प्रदेशांतील संभाव्य आर्थिक वाढ, उपलब्ध असलेलीं पर्यायी साधनें या सर्वांचा विचार करून पुढील वीस वर्षांत प्रत्येक जिल्ह्यांत कोणत्या प्रकारच्या रस्त्यांची किती वाढ व्हावयास हवी याची विस्तृत योजना १९४३ सालीं सरकारने पुरस्कृत केलेल्या एंजिनिअर्सच्या परिषदेंत

आखण्यांत आली. कोणतेंहि खेडें पक्क्या रस्त्यापासून पांच मैलांपेक्षा लांब राहतां कामा नये हा नागपूर-योजनेतील एक उद्देश होता. या योजनेंत सबंध भारतांतील रस्ते-वाढीचा विचार केला होता. त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे रस्तेवाढीचे ठरविलेले टप्पे मर्यादित होते. आणि पंचवार्षिक योजनेंतील विकासाच्या संदर्भांत सबंध भारताकरिता १९४३ सालीं आखलेलें रस्तेवाढीचें उद्दिष्ट केव्हाच गाठून झालेलें आहे. पण असें जरी असलें तरी नागपूर-योजनेंत आखलेलीं महाराष्ट्रांतील रस्ते-वाढीचीं उद्दिष्टें मात्र आपणांस अद्याप पुरीं करावयाचीं आहेत. नागपूर-योजने-प्रमाणे महाराष्ट्रांतील रस्त्यांची वाढ ४७,५९८ मैल इतकी करावयाची होती. दुसऱ्या योजनेच्या अखेरीस महाराष्ट्रांत फक्त सुमारें सहवीस हजार मैल लांब इतकीच रस्त्यांची वाढ झालेली होती. पुढील वीस वर्षांकरिता आखलेल्या रस्ते-वाढीच्या अखिल भारतीय योजनेनुसार विकसित भागांतील प्रत्येक खेड्यापासून पक्का रस्ता चार मैलांच्या आंत आणि कच्चा रस्ता दीड मैलाच्या आंत असावा; तसेंच अविकसित भागांतील प्रत्येक खेड्यापासून पक्का रस्ता निदान बारा मैलांच्या आंत व इतर कोणताहि पांच मैलांच्या आंत असावा असें ठरलें आहे. हें अखिल भारतीय उद्दिष्ट गाठणें फारसें कठीण आहे असें नाही. परंतु महाराष्ट्र सरकारला पूर्वीच्या नागपूर-योजनेंतील गाठावयाचें उद्दिष्ट पुरें करून शिवाय नवा पट्टा पुरा करावयाचा असल्यामुळे थोडी अधिक जबाबदारी आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्रांतील रस्तेवाढीकरिता सुमारे सात कोटि रुपये मंजूर करण्यांत आले होते. महाराष्ट्रनिर्मितीनंतर विदर्भ व मराठवाडा या भागांतील रस्तेवाढीवरील संकल्पित खर्च वाढविण्यांत आला. ऊस पिकणाऱ्या आणि साखरेच्या गिरण्या असलेल्या पश्चिम महाराष्ट्राच्या भागांत रस्तेवाढीकरिता तीन कोटि रुपये अधिक मंजूर करण्यांत आले. कोंकणविकास कार्यक्रमांतील एक कोटि रुपयांपैकीं पसतीस लक्ष रुपये कोंकणांतील रस्त्यांकरता मंजूर झाले. राज्यांतील महत्त्वाचे रस्ते सुधारण्याकरिता दोन कोटि रुपये आणि ठाण्याच्या खाडीवरील नव्या पुलाकरिता एक कोटि रुपये खर्च करण्याचें ठरलें.

दोन भव्य रस्ते

लवकरच महाराष्ट्रांत दोन मोठ्या रस्त्यांची बांधणी पुरी होणार आहे. पश्चिम किनारपट्टीला मुंबई–गोवा हा २८७ मैलांचा रस्ता जवळजवळ पुरा होत आला आहे. पांच कोटि रुपये खर्च येणारा हा रस्ता कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील वाहतुकीस फारच उपयुक्त होणार आहे. सीमेंट काँक्रीटचा हा रस्ता बारमहा खुला राहील. मुंबईतून उत्तरेकडे व दक्षिणेकडे जाण्यासाठी असलेला मुंबई उपनगरांतून जाणारा रस्ता सध्या फारच अपुरा होतो हें लक्षांत घेऊन मध्य रेल्वेच्या पूर्वेला समांतर असा मुंबई–ठाणें रस्ता आणि पश्चिम रेल्वेच्या पूर्वेला वांद्रा-घोडबंदर रस्त्याला समांतर असा आणखी एक मोठा रस्ता बांधण्याचें सरकारने ठरविलेलें

आहे. पहिला सुमारे वीस मैल लांबीचा व दुसरा पंधरा मैल असा होईल. दोन्हींचा मिळून साडेपांच कोटि रुपये खर्च होईल. गेट–वे ऑफ इंडियाजवळून किंवा ससून डॉकवरून उरणपर्यंत सुमारे चार मैलांचा तीस फूट रुंदीचा रस्ता समुद्रावरून टाकल्यास पेण-खोपोली मुंबईस तीस मैल जवळ येईल व मुंबईतील विकेंद्रीकरणास त्याचा फारच उपयोग होईल अशीहि कांहींनी सरकारला सूचना केली आहे. हा पूल भारतांतील दळणवळणाचें एक अभिमानास्पद वैशिष्ट्य राहील. जरी ह्या पुलाला जास्त खर्च येणार असला तरी पुलावरील वाहतुकीवर थोडा कर बसवून प्राप्ति करतां येईलच. शिवाय बृहन्मुंबईच्या विकासाला एक नवें दालन मिळेल.

स्टेट ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशन

मोटार वाहतुकीच्या व्यवस्थेंत प्रगति करण्यांत जुनें मुंबई राज्य व आता महाराष्ट्र आघाडीवरच आहे. कांहीं महिन्यांपूर्वीच विदर्भ व मराठवाड्यांतील सरकारी वाहतूकव्यवस्था पश्चिम महाराष्ट्रांतील सरकारी व्यवस्थेशीं संपूर्णपणें संलग्न करण्यांत आली. मोटार वाहतुकीची व्याप्ति आणि लोकप्रियता गेल्या बारा वर्षांत इतक्या झपाट्याने वाढली आहे की महाराष्ट्रांतील ग्रामीण जीवनाचें एस्. टी. ची बस म्हणजे एक महत्त्वाचें अंग होऊन बसलें आहे. विदर्भ व मराठवाड्यांतील एस. टी. चा विस्तार (पूर्वी हे भाग दुसऱ्या राज्यांत असल्यामुळे) अजून संपूर्णपणें व्हावयाचा आहे. उतारूंसाठी करावयाच्या विविध प्रकारच्या सोयी, मालवाहतूक स्वीकारण्याची तयारी, वाहतुकीसाठी सुरू केलेले नवे मार्ग, प्रत्येक मोटारीमागे होणारी प्राप्ति आणि दररोज प्रत्येक उतारूमागे एस्. टी. बसची होणारी धाव यांपैकी कोणतीहि कसोटी वापरल्यास एस्. टी. कॉर्पोरेशनने प्रगति केल्याचें आढळतें. स्टेट ट्रॅन्स्पोर्टच्या महाराष्ट्रामध्ये सध्या दोन हजारांहून अधिक बसेस् आहेत. बसवाहतूक १,४२४ विविध मार्गांवरून होते व या टप्प्यावरील दररोजची एकूण धांव सत्तेचाळीस हजार मैलांपेक्षा अधिक आहे. एस्. टी.च्या बसेसमधून दररोज चार लक्षांपेक्षा कितीतरी अधिक उतारू प्रवास करतात.

बंदरें

३२० मैल लांबीची किनारपट्टी असलेल्या महाराष्ट्रांत ४९ लहान बंदरें आहेत. त्यांपैकी अजून कित्येक ठिकाणीं जहाज थांबवून माल उतरविण्याची अजिबात सोय नाही. कित्येक ठिकाणीं केवळ वीस टनांपासून दोनशे टनांपर्यंत इतकाच माल एका वेळीं उतरविण्याची सोय आहे. मालाची चढउतार होण्याच्या दृष्टीने वेंगुर्लें, मोरा, करंजा, दाभोळ, रत्नागिरी, मालवण आणि जयगड हीं महत्त्वाचीं बंदरें आहेत. वेंगुर्लें येथे प्रतिवर्षीं एक लक्ष टनांपेक्षा अधिक मालाची चढउतार होते. जयगड व विजयदुर्ग बाराहि महिने सुरक्षित बंदरें म्हणून समजलीं जातात. रत्नागिरी, वेंगुर्लें, मालवण व देवगड हींदेखील सुरक्षित बदरांत अंतर्भूत होतात. देवगड येथेसुद्धा सत्तर टनी जहाज आंत येऊं शकतें. रेड्डी ह्या छोट्या बंदरांतही

तेथील कच्चें लोखंड वाहून नेण्याकरिता, अलीकडे सुधारणा झाल्या आहेत. कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील लहान बंदरांनाही फार महत्त्व आहे. रेल्वेच्या अभावीं कोकणांतील मुंबईशीं होणारें दळणवळण या बंदरांतूनच होतें. कोंकण-विकास-निधींतून छोटचा बंदरांच्या विकासाकरिता चाळीस लक्ष रुपये बाजूला काढण्यांत आले आहेत. रत्नागिरी बंदरांतून दररोज सुमारे एक हजार उतारूंची व प्रतिवर्षी बावीस हजार टन मालाची चढउतार होते. पण पावसाळ्यांत हें बंदर निरुपयोगी ठरतें. रत्नागिरी बाराहि महिने खुलें ठेवण्यासाठी करावयाचे उपाय सरकार लवकरच कृतींत आणणार आहे.

केंद्रसरकारनें नेमलेल्या मध्यम बंदरांच्या विकासाच्या चौकशीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर राज्यसरकारला याबाबत अधिक खात्रीपूर्वक पावलें टाकतां येतील. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्रांतील छोटचा बंदरांसाठी सरकार केवळ तीन लक्ष रुपये खर्च करूं शकलें. पण दुसऱ्या योजनेंतील पहिल्याच वर्षांत सरकारने तीस लक्ष रुपये खर्च केले. यावरून कोंकणवाहतुकीकडे अधिक लक्ष दिलें जात आहे असें मानावयास कांहीच हरकत नाही. कोंकणपट्टीवरील जहाज वाहतूक कंपनीच्या कारभारांत मात्र सरकारला अजून खूप सुधारणा करावी लागेल आणि कंपनीला स्वस्त व कार्यक्षम वाहतूक जमत नसल्यास सरकारने जहाज वाहतूक ताब्यांत घेऊन स्वायत्त कॉर्पोरेशन स्थापन करणें अनुचित ठरणार नाही.

लोहमार्ग :

महाराष्ट्रांत २,६५६ मैल लांबीची रेल्वे आहे. त्यापैकी १५५८ मैल लोहमार्ग रुंद आहे. महाराष्ट्रांतील रेल्वेचें प्रमाण अगदीच कमी म्हणजे दर शंभर चौरस मैलांना सव्वादोन मैल इतकें पडतें. सोलापूर जिल्ह्यांत लोहमार्गाची उपलब्धता सर्वांत अधिक आहे. याउलट रत्नागिरी जिल्ह्यांत रेल्वे अजिबात नाही. मुंबई हें जागतिक कीर्तीचें शहर व बंदर असल्यामुळे भारतांतील उत्तरेकडून, पूर्वेकडून व दक्षिणेकडून येणाऱ्या रेल्वेवाहतुकीचें मुंबई हें महत्त्वाचें केंद्र आहे. विदर्भांत ५१२ मैल लांबीची रेल्वे आहे. नुकत्याच पुऱ्या झालेल्या खांडवा-हिंगोली रेल्वेमुळे विदर्भांतील रेल्वे आणखी १२३ मैलांनी वाढली आहे. मुंबई व कलकत्ता, तसेंच दिल्ली व मद्रास या फार महत्त्वाच्या रेल्वेच्या हमरस्त्यावर नागपूर असल्यामुळे नागपूर हें रेल्वेचें आणि मालाच्या चढउताराचें महत्त्वाचें केंद्र होऊन बसलें आहे. मराठवाड्यांत रेल्वेवाहतुकीचा अधिकच तुटवडा आहे. भीर आणि उस्मानाबाद हीं जिल्ह्याचीं ठिकाणें नजीकच्या रेल्वे स्टेशनापासून बरीच लांब आहेत.

रेल्वेच्या कितीतरी नव्या योजना महाराष्ट्र सरकारने केंद्रीय रेल्वेखात्याकडे मांडल्या आहेत. इगतपुरी ते भुसावळ या मार्गावर विजेच्या गाड्या लौकरच सुरू होतील अशी शक्यता आहे. पुणें ते मिरज आणि तसेच पुढे कोल्हापूर व सांगलीपर्यंत मालाची ने-आण प्रचंड वाढल्यामुळे हा रस्ता रुंद लोहमार्गाचा व्हावा अशी


शिफारस पूर्वींच करण्यांत आली आहे. ६१७ मैल लांबीचे नवे लोहमार्ग टाकावे आणि ४०७ मैल लांबीच्या पूर्वी असलेल्या किंवा अरुंद असलेल्या लोहमार्गींचें पुनर्वसन करावें असेंहि राज्यसरकारने रेल्वेखात्यास सांगितलें आहे. ठाण्याजवळील दिवा स्टेशनपासून कुलाबा जिल्ह्यांत दासगावपर्यंत रेल्वे काढण्याचा निर्णय रेल्वेखात्याने नुकताच घेतला असून प्रथम पनवेल आणि उरण रेल्वेने जोडण्यांत येणार आहेत, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कोकणांत टप्प्याटप्प्याने कां होईना, परंतु रेल्वेचें दळणवळण सुरू होण्याची कोकणांतील लोकांची तळमळ महाराष्ट्र सरकारने केंद्रीय रेल्वेखात्याला सांगितलेली आहे. रेल्वेवाढीकरिता लागणारें परदेशी चलन आणि परदेशी यंत्रसामुग्री पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे कोकण रेल्वेचें महत्त्व पटलेलें असूनहि संपूर्ण कोकण रेल्वेचें स्वप्न हळूहळू साकार होईल. कोकणांत रेल्वे-मार्ग काढावयाचा तो रुंद स्वरूपाचा असावा. कमी खर्च येण्यासाठी अरुंद स्वरूपाची रेल्वे काढण्याच्या योजना कांहींनी मांडल्या आहेत, पण त्या भावी काळांत अडचणीच्या ठरतील. मुंबईहून उत्तरेकडे व दक्षिणेकडे जाणारे सर्व रेल्वेरस्ते ब्रॉड गेजचे आहेत. कोकण रेल्वे अरुंद मार्गांची केल्यास कोंकणांतून देशाच्या इतर भागांत सलग वाहतूक कार्यक्षमतेने व स्वस्तांत करणें कठीण जाईल.

खरें म्हणजे पश्चिम किनारपट्टीला मुंबईपासून थेट केरळ आणि मद्रास राज्यांतल्या शहरांपर्यंत वाहतूक होऊं शकणारी रेल्वेची व्यवस्था कालांतराने झाल्यास केवळ कोंकणचाच नव्हे तर म्हैसूर, केरळ व मद्रास राज्यांतल्या अनेक गावांचा आर्थिक फायदा होईल. हल्ली केरळ व मद्रास राज्यांतून मुंबईपर्यंत होणारी रेल्वे-वाहतूक कोंकण-केरळ रेल्वे झाल्यास कमी वेळेंत व कमी खर्चांत होईल. कारण अशा रेल्वेमुळे केरळ राज्याला मुंबई सुमारे ४०० मैलांनी व दिल्ली २०० मैलांनी जवळ येईल. कापूस पिकविणाऱ्या मद्रास राज्याच्या पूर्वभागांतील कोइमतूर, मदुरा, त्रिचनापल्ली, सेलम, तिनेवेल्ली व रामनाद या जिल्ह्यांनासुद्धा कोंकण–केरळ रेल्वे उपयुक्त होईल. म्हणून म्हैसूर, केरळ व मद्रास या राज्यांच्या सहकार्याने महा-राष्ट्राला कोंकणांत रेल्वे आणण्याची शिफारस केंद्र सरकारकडे अधिक आग्रहाने करतां येईल.

विमानवाहतूक :

मुंबई या आंतरराष्ट्रीय विमानकेंद्राशीं भारतांतीलच नव्हे तर इतर देशांतील शहरांचेंहि विमानाने होणारें दळणवळण जोडलेलें आहे. नागपूर, औरंगाबाद आणि पुणेंहि मुंबईशीं विमानाने जोडलेलें आहे. अंजठा आणि एलोरा येथे येणारे परदेशीय प्रवासी औरंगाबादपर्यंत विमानाने येतात. नागपूरसुद्धा देशांतील विमानवाहतुकीचें मध्यवर्ती स्थानक होऊन बसलें आहे. पुणें आणि नागपूर या दोन शहरांना जोडणारी विमानवाहतूक व्हावयास पाहिजे. मात्र पुणें तें मुंबई विमानवाहतूक आवश्यक नाही व चालणारही नाही असें केंद्र सरकारचें मत आहे.

महाराष्ट्रांतील दळणवळणाच्या प्रगतीसाठी राज्यसरकार स्वतः प्रयत्न करीत असून जीं साधनें केंद्रसरकारच्या कक्षेंत येतात त्या बाबतींत योग्य त्या शिफारसी आग्रहपूर्वक करीत आहे. अर्थातच ह्या कामांत भांडवल, तांत्रिक ज्ञान, परकीय चलनाची उपलब्धता, गरजांनुसार लावावयाची क्रमवारी इत्यादि गोष्टींचा विचार करूनच योजना कार्यवाहींत आणाव्या लागणार आहेत.



७

महाराष्ट्रांतील शेतीं

कृषिप्रधान महाराष्ट्र

महाराष्ट्रांत शेतीवर उदरनिर्वाह करणारे लोक ६४ टक्के आहेत. उद्योगधंद्यांच्या पुरेशा विकासाच्या अभावीं वाढत्या लोकसंख्येचा जमिनीवरील भार वाढत गेला. त्याचबरोबर अपुरा पाणीपुरवठा, आधुनिक शेतीपद्धति, शास्त्रीय ज्ञान आणि भांडवल या गोष्टींचा अभाव आणि जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला अधिक कष्ट घ्यावेसे वटतील या दृष्टीने पुरेसें न मिळालेलें प्रोत्साहन, या सर्व कारणांमुळे जमिनीची उत्पादनक्षमता निकृष्ट होत गेली व पिकांचें प्रमाण आणि दर्जा सुधारूं शकला नाही. कृषिपदार्थ संघटित बाजारपेठांत विकण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले नाहीत. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे येईल त्या किंमतीला धान्य व व्यापारी पिकें विकलीं जात. एकूण, सर्वच बाजूंनी शेतीची पुनर्व्यवस्था करण्याची जबाबदारी महाराष्ट्रापुढे येऊन पडली. जमिनीचा दर्जा व कृषि-उत्पादन सुधारण्यासाठी कृषिसंघटनेंत, जुन्या परंपरांना धक्के देऊन, कालानुवर्ति पुनर्रचना करण्याचें धाडस करणें सरकारला क्रमप्राप्त झालें. महाराष्ट्र सरकारने गेल्या दहा वर्षांत कसणाऱ्याला मालकी हक्क देण्याचे कायदे केले. शेतकऱ्यांना स्वावलंबनास प्रोत्साहन देणाऱ्या समाजविकासयोजना प्रांतभर विस्तृत केल्या. जमिनीचा दर्जा सुधारण्या-

साठी पाणीपुरवठ्याच्या व जमिनीचें संरक्षण करण्याच्या योजना अमलांत आणल्या. कृषि-बाजारपेठा मजबूत करणारे नियम राबवून कृषिपदार्थांच्या किंमतींना स्थैर्य आणण्याचे प्रयत्न केले. पण वर्षानुवर्षें गतिशून्य असलेल्या कृषि-अर्थव्यवस्थेला स्वयंचलित करण्यासाठी अजूनही सातत्याने दीर्घकालीन प्रयत्न सरकारला करावे लागतील. त्याचबरोबर शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतही रोजगार निर्माण करावे लागतील. कारण १९५१ मध्ये तीन कोटि वीस लक्ष असलेली लोकसंख्या १९६१ मध्ये तीन कोटि पंचाण्णव लक्ष झाली आहे. आणखी दहा वर्षांनी ती पांच कोटींच्या जवळ जाईल. वाढत्या लोकसंख्येचा जमिनोवरील भार अधिक जड होणार नाही याचीहि काळजी घ्यावी लागेल.

जमिनीचा उपयोग :

महाराष्ट्रांत एकूण जमिनीपैकी ५८ % जमिनीचा उपयोग शेतीसाठी केला जातो ही समाधानाची बाब आहे. भारतांत हेंच प्रमाण फक्त ४४ टक्के इतकेंच पडतें. महाराष्ट्रांतील एक पंचमांश जमीन जंगलाने व्यापली आहे हें योग्यच आहे. मात्र एकूण पडीत जमिनीचें प्रमाण पाणीपुरवठ्यानंतर खूपच कमी करतां येईल. दुर्दैवानें धरणें, कालवे, विहिरी इत्यादि मानवी उपायांनी पाण्याखाली भिजणारी जमीन महाराष्ट्रांत फक्त पांच टक्केच आहे आणि पाणीपुरवठा करण्याचे जास्तींत जास्त प्रयत्न साकार झाल्यानंतरहि फार तर वीस ते पंचवीस टक्के जमीन पाण्याखाली भिजेल. ह्या दृष्टीने ८० टक्के कोरडवाहू जमिनीची शेती कशी सुधारतां येईल हें लक्षांत ठेवून शास्त्रीय उपाययोजना व आधुनिक शेतीपद्धति अमलांत आणल्या पाहिजेत.

हवा, पाणी व जमिनीचा दर्जा लक्षांत घेऊन त्या त्या प्रकारचें पीक काढल्यास अधिक उत्पादन मिळेल. ह्या दृष्टीने परकीय चलन मिळवून देणाऱ्या व्यापारी पिकांस येथे खूप वाव आहे. परंतु आपल्या एकूण पिकांपैकी धान्य व डाळी यांना अजूनही प्राधान्य मिळतें. आणि तें सध्यां तरी स्वाभाविक आहे. अन्नधान्याच्या स्वावलंबनाचा आणि राज्याराज्यांतील सुसूत्र धान्यवांटपाचा प्रश्न अद्याप न सुटल्यामुळे धान्याचें उत्पादन वाढतें ठेवणें उचितच आहे. शेतीखाली येणाऱ्या एकूण क्षेत्रफळापैकी धान्य व डाळी यांच्या वाढीसाठी सत्तर टक्के क्षेत्र वापरलें जातें. १४ टक्के क्षेत्रफळ कापसासाठी आणि अकरा टक्के तेलबियांसाठी मिळतें. उसाची लागवड अजूनहि फक्त अर्धा टक्का क्षेत्रफळ व्यापतें. तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, फळें इत्यादीसाठी कितीतरी अधिक क्षेत्रफळ मिळणें फायदेशीर ठरणार आहे.

जमिनीचा विकास :

सरकारने जमिनीविषयक केलेल्या सुधारणांमध्ये परंपरेने चालत आलेल्या वतनांच्या व विविध प्रकारच्या इनामदारी पद्धतींच्या उच्चाटनाला अग्रस्थान द्यावें लागल. द्वितीय योजनेंत सुमारें दोन कोटि रुपये खर्च करून पडीत व खार जमिनीची

लागवड केली. खार जमीन विकास मंडळ स्थापन केलें. १९४७ मध्येच जमिनीची तुकडेमोड बंद करणारा कायदा केला. ह्या कायद्यामुळे शेतीपद्धतींत सुधारणा झाल्याचें कांहीं खेड्यांतील पाहणीवरून दिसून येतें. बांध घालणें, विहिरी खोदणें, सांडपाण्याची व्यवस्था करणें ह्या कार्यक्रमांकरिता खेड्यांत येणाऱ्या खर्चांत वीस टक्के काटकसर झाल्याचें आढळलें. प्रयोगादाखल भूमिहीनांना पश्चिम खानदेश-मध्ये बासष्ट हजार एकर जमीन वांटण्यांत आली व त्यांना शेतीसाठी आर्थिक साहाय्य दिलें. नंतर हीच योजना इतर पांच सहा जिल्ह्यांत अमलांत आली. महाराष्ट्र सरकारने किरकोळ पाटबंधाऱ्यांसाठी दुसऱ्या योजनेंत ४६४ लक्ष रुपये खर्च केले. विहिरींची दुरुस्ती करण्यासाठी एक हजार रुपयांपर्यंत व नवी विहीर बांधण्यासाठी अडीच हजारापर्यंत कर्ज देण्याची योजना अमलांत आणली. बीं-बियाण्यांचा पुरवठा अधिक व्हावा यासाठी सुरू केलेलीं शेतकऱ्यांना बीं पुरविण्या-साठी तयार केलेलीं शेतें २३३ तालुक्यांतून सुरू झालीं. भिवंडी, कर्जत-खालापूर, मुळशी-भोर-मावळ आणि कोल्हापूर समाजविकासगटांत तांदुळाचें पीक सर्वंकष पद्धतीने काढण्याचे प्रयोग १९५७ मध्यें केले व नंतर ते इतरत्रहि करण्यांत आले. पीकसंरक्षणाच्या योजना काढल्या. नाशिक येथे पीकसंरक्षक डेपो स्थापन केला. जमिनीचा कस तालीबांधाच्या योजना सुरू करून थांबविण्याचा प्रयत्न सुरू झाला. नगर जिल्ह्यांतील कर्जत व पारनेर तालुक्यांत ६४ लक्ष रुपये खर्च करून दीड लाख एकर जमिनीला यशस्वी रीतीने कोंडचा घालण्यांत आल्या. जमिनीची धूप थांब-विण्यासाठी जंगलवृद्धीची योजना कित्येक जिल्ह्यांतून सुरू झाली. मुंबई, पुणें व नागपूर येथे दूधपुरवठायोजना सुरू झाल्या. शेतीविषयक शिक्षणासाठी ग्रामीण भागांत शेतीशिक्षण देणाऱ्या पुष्कळ शाळा आहेत. पुणें, नागपूर, अकोला, परभणी व धुळें येथे शेतकी महाविद्यालयें आहेत. समाजविकास योजनेंतील ग्रामसेवकांना शिक्षण देण्यासाठी मांजरी, कोल्हापूर, परभणी येथे शिक्षण-केंद्रें आहेत. अमरा-वती, बुलढाणा, परभणी येथे शेतीचें मूलभूत शिक्षण देणाऱ्या शाळा चालतात.

पाणीपुरवठा :

महाराष्ट्रांतील जमीन बऱ्याच ठिकाणीं नापीक व दुष्काळी परिस्थिति निर्माण करणारी असली तरी भरपूर पाणीपुरवठा करून व आधुनिक खतें वापरून तिची उत्पादनशक्ति वाढवितां येईल. पाण्याच्या अभावीं किती तरी जमीन पडीत राहिली आहे. जमिनीची धूप थांबविण्यासाठीही पाणी अधिक पाहिजे. नुसत्या मराठवाड्यांत दहा लक्ष एकर जमीन लागवडीखालीं आणतां येण्यासारखी आहे. त्यासाठी गोदावरी, पूर्णा, माजरा, धिट्टुआ इत्यादि नद्यांना बंधारे घालावयास हवेत. गोदावरीचें धरण पूर्ण झाल्यास भीर जिल्ह्यांत साडेचार लक्ष एकर जमिनीला पाणी मिळून तींत पन्नास हजार एकर क्षेत्रफळाच्या उसाच्या मळ्यांची सोय होईल. विदर्भांतील वैनगंगा धरण पुरें केल्यास पंधरा लक्ष एकर अधिक जमिनीला पाणी

मिळेल. वीर धरणामुळे पंढरपूर व सोलापूर जिल्ह्यांना, गिरणा प्रकल्पामुळे पूर्व-खानदेशला, गंगापूर धरणामुळे नाशिक व नगर जिल्ह्यांना, वारणा योजनेमुळे कोल्हापूर भागाला व कर्नूर तलावामुळे सोलापूर जिल्ह्याला अधिक पाणी मिळण्याच्या दृष्टीने खूपच फायदा होणार आहे. मात्र आपण जास्तींत जास्त पाणी-पुरवठ्याचा प्रयत्न केल्यावरही ८० टक्के जमीन कोरडवाहू शेतीचीच राहणार आहे हें लक्षांत घेऊन इतर कृषि-संरक्षक योजनांचा सरकारने विचार करणें क्रमप्राप्त होणार आहे. त्यांपैकी प्रमुख उपाय म्हणजे पिकांचा विमा उतरण्याची व्यवस्था अंमलांत आणणें हा होय. दुपिकी क्षेत्रांत वाढ करावयास हवी. एक पीक पावसावर व दुसरें कालव्याच्या पाण्यावर निघालें पाहिजे. जेथे शेती व बागायती अशा दोन्ही गोष्टी आहेत असें क्षेत्र महाराष्ट्रांत आज पांच टक्क्यांहूनही कमी आहे. छोट्या व मोठ्या पाटबंधाऱ्यांमुळे असें क्षेत्र २५ टक्के करतां येईल.

कालवे, विहिरी, तळीं इत्यादींनी भिजणारें क्षेत्र अजूनही लागवडीखाली असलेल्या एकूण क्षेत्राच्या पांच टक्केच आहे. महाराष्ट्राला मिळालेल्या तापी, कृष्णा, गोदा व भीमा या खोऱ्यांचा बागायतीचें क्षेत्र वाढण्याच्या दृष्टीने आपण म्हणावा तेवढा अजून प्रयत्न केला नाही. भीमेचें खोरें सर्वांत मोठें व २३,६०० चौ. मैलांचें आहे. अडीचशे इंच पाऊस असलेल्या सह्याद्रीच्या डोंगराळ भागांत लहान धरणें बांधून उताराचें पाणी अडवितां येईल. भूगर्भनलिकांची वाढ करण्यास मात्र महाराष्ट्रांत फारसा वाव नाही असें तज्ज्ञांचें मत आहे. माती व मुरुमाचा थर जलधारणाक्षम आहे. परंतु महाराष्ट्रांतील काळ्या दगडाच्या भूमींत हा थर फारच थोडा खोल आढळतो. त्यामुळे गंगा व सिंधु खोऱ्यांतल्या प्रदेशाप्रमाणे, तसेंच गुजराथप्रमाणे संपन्न प्रदेश महाराष्ट्रांत नाही. गुजराथची जलसंपन्न भूमि सातपुडा व अरवली यांतून गाळ येऊन फार पूर्वी असलेला समुद्र हटवून रेताड गाळाची बनली आहे. अशी जमीन खानदेशांत सातपुडा व तापी नदीमधील २५० मैल लांब व ४० मैल रुंद पट्ट्यांत आहे. येथे पूर्वी मोठा जलसंचय असावा. येथे नलिकाकूप शक्य आहेत.

जमिनीच्या मालकीविषयक कायदे


जमीन कसणाऱ्यांच्या मालकीची झाल्याशिवाय त्याला उत्पादनांत वाढ करण्यास प्रोत्साहन मिळत नाही. मग ती मालकी वैयक्तिक असो वा सहकारी शेतींतल्याप्रमाणे सामुदायिक असो. पोटापुरतेंही वेतन न मिळतांना मजूर म्हणून राबणाऱ्यांकडून कृषिअर्थव्यवस्थेंत आमूलाग्र परिवर्तन होण्याची अपेक्षा करणें अन्यायाचें आहे. ब्रिटिशांनी दिलेल्या कृषिसंस्थांच्या परंपरा तीव्र आर्थिक विषमता निर्माण करणाऱ्या होत्या. सर्वांना विकासाची समान संधि मिळवून देणारी समाजवादी पद्धतीची समाजरचना निर्माण करणें हें तर आपलें ब्रीद आहे. त्यासाठी केवळ परंपरेने चालत आलेली मक्तेदारी, फाजील श्रीमंती आणि दुसऱ्यांचें शोषण

करण्याचें व्यसन असलेली सत्ता ह्यांचा उपभोग घेणारा समाजवर्ग नष्ट करून आपल्या श्रमाने स्वतःची व देशाची उन्नति करणाऱ्यांच्या हातांत उत्पादनाचीं साधनें जावींत असें व्यापक धोरण नियोजन मंडळाने आखलें. हें धोरण प्रत्यक्ष कायदे करून कार्यान्वित करण्याचा प्रागतिक उपक्रम महाराष्ट्र सरकारने केव्हाच केला आहे. एक एप्रिल १९५७ रोजीं कूळकायदा अंमलांत आणून आर्थिक विषमतेचें उच्चाटन करणारें पहिलें पाऊल टाकण्यांत आलें. कोणतेंही परिवर्तन सर्वांनाच प्रिय नसतें. परंपराप्रिय वर्गाला हा कायदा घातुक वाटण्यापर्यंतही मजल गेली. आज जरी उत्पादनवाढ करण्याची प त्रता जमीन कसणाऱ्या गरीब वर्गाची नसली तरी सरकारी आर्थिक साहाय्याच्या योजनांच्या द्वारा त्यांना आपल्या जमिनीचा कस खात्रीने व अल्पावकाशांत सुधारतां येईल. वाढत्या शिक्षणाबरोबर त्यांना शास्त्रीय दृष्टिकोनही येईल.

महाराष्ट्र सरकारने आर्थिक विषमता कमी करून भूमिहीनांना व्यवसाय मिळवून देण्यासाठी केलेला दुसरा विधायक उपक्रम म्हणजे जमीनधारणेवर घातलेली कमाल मर्यादा. उपलब्ध असलेली जमीन नेहमीच मर्यादित असते; मात्र उत्तरोत्तर जमिनीवरील उदरनिर्वाह करणाऱ्यांचा भार वाढत जात असतो. अशा वेळीं फार थोड्या लोकांच्या हातांत जमिनीचो मालकी राहिल्यास बहुसंख्य लोकांचें आर्थिक शोषण होत असतें. म्हणूनच जमिनीची फेरवांटणी समाजवादी समाजरचनेला सुसंगत आहे हें सर्वांना मान्य आहे. पांच एकरांपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतमालकांची संख्या ४४ टक्के आहे. पण त्यांची सर्व जमीन मिळून एकूण जमिनीच्या सुमारे आठ टक्के आहे. याउलट साठ एकरांपेक्षा जास्त जमीन असणारे सुमारे पावणेदोन टक्के लोक आहेत. पण त्यांच्याजवळील एकूण जमीन १५ टक्के आहे. शहरांतील उत्पन्नावर असें नियंत्रण घालण्याची एकदम आवश्यकता व शक्यताही वाटत नाही. नियंत्रणें व कर यांच्या रूपाने शहरांतील फाजील उत्पन्नाला वेसण घालतां येते. शिवाय शहरांतील व्यावसायिक उत्पन्न कितीहि वाढविण्यास मानवी प्रयत्नांस वाव मिळतो. त्यावर नैसर्गिक किंवा भौगोलिक मर्यादा नसते महाराष्ट्रांत एकूण कसली जाणारी जमीन साडेचार कोटि एकर आहे आणि शेतमजूर व त्यांचेवरील अवलंबित लोक, १९६१ च्या जनगणनेनुसार, पन्नास लक्ष आहेत. जमिनी-वर कमाल मर्यादा घातल्यास बारा लक्ष एकर जमीन फेरवांटपास मिळेल व दीड लक्ष कुटुंबांना (म्हणजे साडेसात लक्ष लोकांना) त्याचा फायदा होईल. हा फायदा जरी थोडा वाटला तरी नियोजनांतील मूलभूत धोरणाला धरूनच आहे. औद्योगिक विकेंद्रीकरण झाल्यावर ग्रामीण जनतेला कृषि–उद्योग काढण्यास वाव मिळेल आणि शेतीवरील उदरनिर्वाह करणाऱ्यांचा भारही कमी होईल.

सहकारी सेवासंघांना आणि सहकारी शेतीला सरकार देत असलेलें प्रोत्साहन आर्थिक विकासाची समान संधि आणि विषमतेचें उच्चाटन या व्यापक व सर्वमान्य

तत्त्वाज्ञानाकडे नेणारेंच धोरण आहे. आपल्याकडे तोटयांत चालणाऱ्या लहान आकाराच्या जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठीहि सामुदायिक शेती स्वखुशीने सुरू होणें अगत्याचें आहे. याखेरीज एकेकटया गरीब शेतकऱ्याला एरवी ज्या सुधारणा करतां येणार नाहीत त्या सर्वांना मिळून सहकार्यानें करतां येतील. नांगरणी–पेरणीपासून बाजारांत माल नेईपर्यंत व्यापारी पिकांवर भांडवली खर्च लागणारे कितीतरी संस्कार करावे लागतात. हे सर्व संस्कार सहकारी सेवासंघ काढून कमी खर्चांत करतां येतील. सामुदायिक रीत्या प्रत्यक्ष शेती करण्याबाबत आज जरी शंका व भीति व्यक्त केली जात असली तरी सहकारी सेवासंघामुळे आपला खर्च कमी होऊन प्राप्ति अधिक होत आहे हें कळलें म्हणजे सामुदायिक शेतीलाहि शेतकरी तयार होईल. सुरुवातीला गावांतील सर्व कामांकरिता एकच सोसायटी चालवून सहकाराचें महत्त्व गावकऱ्यांना पटलें की सामुदायिक शेतीतील अपेक्षित अडचणी व भीति दूर करतां येईल. वाढत्या शैक्षणिक प्रसारामुळे उत्पादनवाढीचें आणि सहकाराचें महत्त्व लोकांना सहज कळेल. ग्रामीण अर्थव्यवस्था सुसंघटित व एकजिनसी करून तिला शास्त्रीय पाया द्यावयाचा असल्यास कोणत्याहि ग्रामीण योजनेंत सहकारी कार्यपद्धतीला अग्रस्थान द्यावें लागेल. सरकारने हें प्राथमिक व मूलभूत तत्त्व ओळखून आपल्या योजनेंत तें कार्यान्वित करण्याचें ठरविलें आहे ही गोष्ट सरकारचें धोरण पुरोगामी व समाजवादी आहे हें दर्शवितें. अर्थात सहकारी आंदोलन समाजाने आत्मसात केलें पाहिजे या गोष्टीची दखल घेऊन सहकारी शेतीबाबत सरकारी पातळीवरून सक्तीचे उपाय न करतां केवळ संघटनात्मक पातळीवरून प्रचार करून लोकांना सहकाराचें शिक्षण द्यावयाचें असेंहि ठरविण्यांत आलेलें आहे. ही गोष्टदेखील सत्तारूढ पक्षाचा समाजवाद लोकशाहीच्या चौकटींत ठेवण्याकडे कटाक्षानें लक्ष दिलें जाईल असेंच दर्शविते. एकूण परंपरेने चालत आलेल्या पण आर्थिक विषमतेच्या द्योतक अशा जुन्या कृषिसंघटना आणि टाकाऊ शेतीपद्धति नष्ट करून शेतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचें कठीण काम महाराष्ट्र सरकारने यशस्वी रीतीने केलें आहे. हें काम करतांना सरकार धनिकांच्या रोषाला घाबरलें नाही. विरोधी चिकित्सकांनी केवळ राजकीय दुराग्रहासाठी केलेल्या टीकेला सरकारने पद्धतशीर रीतीने उत्तरें दिलीं. त्यामध्ये सरकारची बहुजनसमाजाबद्दलची तळमळ होती, भूमिहीनांबद्दल आस्था होती आणि उपेक्षिलेल्या ग्रामीण जनतेच्या उन्नतीबद्दल उमेद होती.



७

महाराष्ट्रांतील सहकारी संस्था

प्रास्ताविक

मर्यादित भांडवल व अपुरी तंत्रविद्या या अडचणींचें उल्लंघन करण्यासाठी ‘ एकमेकां सहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ ’ हा पूर्वीच्या संतांनी शिकविलेला मंत्र आजदेखील सर्वच मागासलेल्या प्रदेशांनी अंमलांत आणणें अगत्याचें आहे. नियोजनमंडळाने द्वितीय पंचवार्षिक योजनेंतच सहकाराच्या तत्त्वाचा पुरस्कार केला होता. महाराष्ट्रांत सहकाराची चळवळ इतर राज्यांतल्या मानानें आघाडीवर आहे. महाराष्ट्रांतील ८५ टक्के खेडयांत या ना त्या स्वरूपांत सहकारी आंदोलन पसरलें आहे. आणि ३० टक्के जनता या ना त्या भूमिकेंतून सहकारी संस्थेशीं संबंधित आहे. भारतांतील हेंच प्रमाण अनुक्रमें ६१ टक्के खेडीं आणि १९ टक्के जनता असें आहे. भारतांतल ग्रामीण सहकारी पतपेढयांतून जेवढीं कर्जें दिलीं जातात त्यांपैकीं एक-पंचमांश कर्ज महाराष्ट्रांतील सहकारी पतपेढयांतून दिलें जातें. सहकारी संस्थेंतील सभासदाला सरासरी कर्ज मिळण्याचें प्रमाण भारतांत फक्त १०५ रुपये आहे, तर महाराष्ट्रांत हेंच प्रमाण २२८ रुपये आहे. यावरून सहकारी क्षेत्रांत महाराष्ट्र किती आघाडीवर आहे हें प्रत्ययाला येतें. महाराष्ट्रांत पिकांचा प्रकार आणि हंगामांत येणाऱ्या त्या त्या प्रकारच्या पिकांचें उत्पादन यावर आधा-

रित कर्ज देण्याची सोय अस्तित्वांत असल्यामुळे ती अधिक शास्त्रशुद्ध आहे आणि तिचा विधायक कारणांकरिता उपयोग केला जातो. या पद्धतीमुळे ग्रामीण सहकारी कर्जपुरवठा अधिक बळकट झाला असून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति आणि त्यांची कर्ज परत करण्याची कुवत यांत सुधारणा झाली आहे. द्वितीय पचवार्षिक योजनेच्या अखेरीस शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या ह्या योजनेखाली ७५ टक्के शेतकरी आणि सर्वच्या सर्व खेडीं आणलीं गेलीं आहेत. महाराष्ट्रांत आज शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या सहकारी संस्था सुमारें पंधरा हजार आहेत, आणि ह्या संस्थांची सभासद-संख्या सुमारे बारा लक्ष आहे. ह्या संस्थांनी भागरूपाने उभें केलेलें भांडवल जवळजवळ सात कोटि रुपये आहे.

दीर्घ मुदतीचें कर्ज

जमीन तारण घेऊन कर्ज देणाऱ्या बँका दीर्घ मुदतीचें कर्ज देतात. अशा सहकारी बँकासुद्धा महाराष्ट्रांतच जास्त आहेत. मध्यवर्ती सहकारी बँका रिझर्व बँकेकडून कर्ज देण्याच्या कामासाठी जसा पैसा मिळवितात तसा जमीन तारण घेणाऱ्या बँकांना मिळत नाही. त्यांना कर्जरोखे काढून पैसा उभारावा लागतो. या बँका विहिरी खोदण्याकरिता किंवा पंप बसविण्याकरिता कर्ज देतात. सहकारी कर्ज-पुरवठा योजना शास्त्रीय पायावर कार्यान्वित करण्यासाठी १९४६ मध्ये सावकारी धंद्यावर कडक नियंत्रणें आणणारा कायदा मंजूर करण्यांत आला. या कायद्यामुळे कर्जवसुली करण्याकरिता सावकार पूर्वी वापरीत असलेले अयोग्य मार्ग आता अमलांत आणू शकत नाही. त्याच्या व्याज घेण्यावर नियंत्रण आलें आहे. त्याला हिशेब योग्य तऱ्हेने ठेवावे लागतात. या कायद्यामुळे शेतकऱ्यांना होणारा जाच पुष्कळ कमी झाला आहे.

धान्यवांटप

धान्य आणि इतर कृषिपदार्थ सहकारी पद्धतीने विकणें आणि बाजारपेठांत माल नेण्यापूर्वी त्यांवर करावे लागणारे सर्व संस्कार आधुनिक पद्धतीने हाताळणें याहि बाबतींत महाराष्ट्रांतील सहकारी संस्था अग्रेसर आहेत. खेड्यांतील 'अनेक-उद्देश सहकारी संस्था' धान्य, साखर, लोखंड, पोलाद, सीमेंट या वस्तु विकतात. मुंबई शहरांतील ग्राहक सहकारी संस्थेच्या फेडरेशनने सत्तर लक्ष रुपयांचा गहूं व तांदूळ विकला. धान्यबाजारपेठेंतील मालावर प्रक्रिया किंवा संस्कार करणाऱ्या सहकारी बाजार संस्था महाराष्ट्रांत संख्येने सर्वांत अधिक आहेत. कापूस विकणाऱ्या, फळें विकणाऱ्या, सरकी काढून कापसाचे गठ्ठे बांधणाऱ्या, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या पातळीवर काम करणाऱ्या लहानमोठ्या अशा प्रकारच्या २६७ सहकारी संस्था सुसंपन्न स्थितींत काम करीत आहेत. सहकारी खरेदी-विक्रीमुळे कृषिमालाला चांगली किंमत येऊन कर्ज फेडण्याची शेतकऱ्याची पात्रता वाढते. यामुळे केवळ कर्ज देणाऱ्या पतपेढ्या वाढविण्यापेक्षा सहकारी बाजारपेठा, सहकारी

उत्पादन आणि सहकारी शेतीकाम करणाऱ्या संस्था स्थापन करण्यावर भर दिला जाणार आहे हें उचितच आहे.

सहकारी साखरकारखाने काढून त्यांची कार्यक्षमतेने वाढ करण्यांत महाराष्ट्रानेच उपक्रमशीलता दाखविली आहे. महाराष्ट्रांत पंधरा सहकारी साखरकारखाने असून त्यांचें भागरूपाने गोळा झालेलें भांडवल दीड कोटि रुपये आहे. त्यांना सात कोटि रुपयांचें दीर्घ मुदतीचें कर्ज, साडेतीन कोटि रुपयांचें मध्यम मुदतीचें कर्ज आणि साडेआठ कोटि रुपयांचें हंगामांत लागणारें कर्ज मिळूं शकलें आहे. यावरून त्यांचा संघटनाशक्तीवर दिसून येणारा विश्वास त्यांचें उज्ज्वल भविष्य दर्शवितो.

सहकारी शेती

शेतीवरील वाढत्या लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी व जमिनीचे वास्तव मर्यादेपलीकडे तुकडे पडूं नयेत यासाठी सरकारने सहकारी शेतीचा गेल्या योजनेंतच पुरस्कार केला. सहकारी शेतीमुळे जमिनीचें क्षेत्र व्यापक होऊन मोठ्या प्रमाणावर शेती करतां येईल व साहजिकच त्याकरिता एकूण होणाऱ्या खर्चांत काटकसर आणि बचत करतां येईल. उत्पादन, वांटप किंवा शेती – कोणतीहि गोष्ट मोठ्या प्रमाणावर केल्यास अशा उद्योगांत आपोआपच काटकसर, बचत व अधिक प्राप्ति हे फायदे अंतर्भूत असतात. सहकारी शेतींत सामील होणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा आपल्या जमिनीवरील मालकी हक्क त्याच्या स्वत:कडेच राहील. सहकारी शेतींतून होणारी एकूण प्राप्ति विभागली जातांना त्याने केलेले श्रम, गुंतविलेलें भांडवल, वापरलेली बुद्धि आणि शेताचें क्षेत्रफळ या सर्व घटकांचा विचार करून त्याला योग्य तो वांटा मिळेल. विहिरी खोदणें, पंप बसविणें, गुदामें बांधणें, मालवाहतुकीची सोय करणें, भांडवली साहित्य आणणें, बीं-बियाणें व खतें खरेदी करणें इत्यादि भांडवली खर्चाच्या कितीतरी गोष्टी एरवी ज्या शेतकऱ्याला एकट्याला करतां येत नाहीत त्या सहकारी शेतींत करतां येतात. या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने केलेला सहकारी शेतीचा पुरस्कार ग्रामीण जीवनाचा विकास करणारी एक गुरुकिल्लीच आहे असें म्हणण्यास हरकत नाही. १९५९ मध्ये महाराष्ट्रांत एकूण आठ हजार सभासद असलेल्या २५४ सहकारी शेतीच्या संस्था होत्या आणि सहकारी शेतीखाली आलेलें क्षेत्रफळ एक्कावन्न हजार एकर होतें.

दूध आणि मासळी

दूध आणि मासळीविषयक व्यवसाय सहकाराने करण्यांतहि महाराष्ट्र मागे नाही. महाराष्ट्रांत ११२ प्राथमिक दूध-पुरवठा सहकारी संस्था आहेत. तसेंच मासळीविषयक व्यवसाय सहकारी पद्धतीवर करणाऱ्या ९५ संस्था आहेत, व त्यांची सभासद-संख्या पंचवीस हजारांच्या वर आहे.

मागासलेल्या वर्गाकरिता स्थापन झालेल्या सहकारी घरबांधणीसंघटना तीनशेहून अधिक आहेत आणि त्यांनी आत्तापर्यंत एकूण दीड हजारांच्यावर गाळ

बांधले आहेत. जपानी पद्धतीने भातशेती करणाऱ्या सहकारी संस्थांना रासायनिक खतें पुरविणें, शेतीसंबंधीची माहिती सांगणें आणि कर्जपुरवठा करणें हीं कामें सरकार करतें.

शहरांमध्येहि सहकारी बँका, सहकारी घरबांधणी-संघटना आणि सहकारी किरकोळ दुकानें विविध तऱ्हेने मिळणाऱ्या सरकारी मदतीवर उपयुक्त काम करीत आहेत. वाढत्या औद्योगीकरणाबरोबर शहरांतल्या या तीन्ही प्रकारच्या सहकारी संस्थांना अधिक जबाबदारी आणि मोठें क्षेत्र मिळणार आहे. शहरांतील कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था ९२८ आहेत आणि किरकोळ दुकानें एक हजारांहून अधिक आहेत. घरबांधणी सहकाराने करणाऱ्यांत लहानमोठ्या संस्थादेखील एक हजारांपेक्षा जास्त आहेत. त्यांनी आत्तापर्यंत वीस हजारांपेक्षा अधिक गाळे बांधले आहेत.

कुलाब्याखेरीज उरलेल्या सर्व जिल्ह्यांतून जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँका स्थापन झाल्या आहेत. कर्जाचे अर्ज लौकर निकालांत काढण्यासाठी त्यांनी जास्तींत जास्त ठिकाणीं आपल्या शाखा उघडाव्यात असें सरकारचें धोरण आहे.


१९१८ मध्ये सहकारी शिक्षणाच्या प्रचाराच्या उद्देशाने स्थापन झालेली मुंबई राज्य सहकारी यूनियन जिल्हा सहकारी बोर्डातर्फे महाराष्ट्रभर सहकारी शिक्षणाचें काम करीत आहे. सहकारी शिक्षण, उमेदवारी आणि प्रचार करण्यासाठी आणि सहकारी संस्थेंत काम करणाऱ्या सर्व थरांतल्या नोकरवर्गाला द्यावयाचे प्रात्यक्षिक पाठ शिकविण्यासाठी ही यूनियन काम करीत आहे. त्यासाठी पुणें, कोल्हापूर, जळगांव, औरंगाबाद, नागपूर व अमरावती येथें सहकारी शाळा आणि पुणें येथें सहकारी महाविद्यालय या संस्था तिच्यातर्फे चालविल्या जात आहेत. राज्यांतील सहकारी संस्थांना यूनियनच्या शैक्षणिक निधीला वर्गणी म्हणून रक्कम देण्याची तरतूद सहकारी संस्थाविषयक कायद्यांत केलेली आहे. औद्योगिक सहकारी संस्थांचे चिटणीस, इतर संपदाधिकारी, तसेंच ग्रामसेवक यांना शिक्षण देण्याची व्यवस्था यूनियनने केली आहे.

महाराष्ट्रांत औद्योगिक सहकारी संस्था, कुटिरोद्योग आणि लहान ग्रामीण उद्योगधंदे यांची होत असलेली वाढ कौतुकास्पद आहे. येथे दोन हजार औद्योगिक सहकारी संस्था आहेत. या संस्था कापड विणण्यापासून तों यंत्राचे किंवा रेडिओचे सुटे भाग तयार करण्याच्या विविध उद्योगांत भाग घेत आहेत. यांखेरीज विविध उद्योगांत स्वावलंबनाने उभें राहतां यावें असें शिक्षण देणाऱ्या सुमारे पावणेतीनशे शाळा महाराष्ट्रांत आहेत. कातड्याचा माल तयार करणें, कापड विणणें, वेतकाम करणें, कापडछपाई करणें, लोहारकाम करणें, इत्यादि विविध प्रकारचें शिक्षण महाराष्ट्रांत दिलें जातें.

सहकारी सेवा संस्था

महाराष्ट्रांत, विशेषतः देशावर, स्वतः शेती करणाऱ्या लहान व मध्यम

वर्गांतल्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. आपल्या मालकी हक्काच्या जुन्या कल्पना एकदम सोडून देण्यास तो तयार होणार नाही. त्याने मालकी हक्क सोडून सक्तीने व मनाविरुद्ध ग्रामशेतींत आपली जमीन देऊन टाकावी असेंहि सरकारला करावयाचें नाही. सरकार सहकारी शेतीचा पुरस्कार व प्रचार करणार आहे; परंतु सक्ती करणार नाही. या दृष्टीने सहकारी शेतीच्या ध्येयपथावरील पहिलें व सर्वांना पटण्यासारखें पाऊल म्हणून सहकारी सेवासंस्था काढण्यास सरकार उत्तेजन देणार आहे. काँग्रेसने पुरस्कृत केलेल्या सहकारी सेवा संस्थांच्या धोरणास जनसंघासह इतर सर्व भारतीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. खेड्यांतील शेतकऱ्यांनी नांगरणी–पेरणीपासून बाजारांत माल नेऊन विकण्यापर्यंत कराव्या लागणाऱ्या सर्व प्रक्रिया किंवा संस्कार आणि त्यासाठी करावा लागणारा खर्च सहकारी पद्धतीने करावा असें या धोरणाचें उद्दिष्ट आहे. समाजविकास योजनांतील प्रत्यक्षांत दिसून आलेल्या फायद्यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक कोणतीहि कामें सामुदायिक रीतीने केल्यास फायदा होतो हें कळून चुकलें आहे. वाढत्या साक्षरतेबरोबर ग्रामीण जनतेला सामुदा िक कार्यपद्धतीचा महती पटू लागेल. एकदा स्पर्धेची व अलिप्तपणाची भावना गेली म्हणजे प्रत्येक खेड्यांत माल साठविणें, किंमतीवर नियत्रण ठेवणें व्यापारांत प्रामाणिक पद्धति ठेवणें, संकटकाळीं एकमेकांना मदत करणें इत्यादि अनेक गोष्टी खेडुत लोक आपणहून करूं लागतील. महाराष्ट्र सरकार यापुढील योजनांमध्ये म्हणूनच ग्रामीण विकासाकरिता सहकारी सेवासंस्थांना अधिक प्रोत्साहन देणार आहे व या धोरणाचें आपण स्वागत करावें असेंच तें आहे.



८

महाराष्ट्राची तिसरी योजना

गेल्या दशकांतील प्रगति

केंद्रसरकारच्या किंवा इतर राज्यांच्या योजनांमध्ये कितीहि अडचणी आल्या असल्या तरी सुदैवाने महाराष्ट्र राज्याच्या पूर्वीच्या दोन्ही योजना यशस्वी झाल्या आहेत. महाराष्ट्र प्रदेश पहिल्या योजनेंत आणि दुसऱ्या योजनेंतील अर्ध्यापेक्षाहि अधिक भागांत, हें जरी स्वतंत्र राज्य नव्हतें तरीहि योजनेंत तरतूद केलेले महाराष्ट्र-विषयक कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पडले, या अर्थाने हें विधान केलें आहे. दुसऱ्या योजनेच्या पहिल्या चार वर्षांत ७२ टक्के खर्च तरतुदीप्रमाणे झालेला आहे. द्वितीय योजनेंत महाराष्ट्राकरिता २०४ कोटि रुपये खर्च करावयाचें ठरविलें होतें. त्यांपैकी पहिल्या चार वर्षांत १४७ कोटि रुपये खर्च करून झाले होते, व शेवटच्या वर्षांतहि करावयाच्या उरलेल्या खर्चापेक्षा अधिकच खर्च करण्यांत आला. विदर्भ व मराठवाडा या बाबतींतहि असेंच घडलें. १९६०-६१ मध्ये विदर्भांत व मराठवाड्यांत अनुक्रमें ३९ व २६ कोटि रुपये खर्च करावयाचे होते. प्रत्यक्षांत ते अनुक्रमें ४७ व २७½ कोटि रुपये खर्च झाले. यावरून विदर्भ व मराठवाड्याकडे महाराष्ट्रांत दुर्लक्ष होईल ही महाराष्ट्रविरोधकांना वाटणारी भीति निराधार आहे हें सहज दिसून येईल.

महाराष्ट्रांत गेल्या दशकांत झालेली एकूण प्रगति पाहतां तिसऱ्या योजनेचें आव्हान स्वीकारण्याची सरकारची पात्रता आहे हा निष्कर्ष काढणें चूक होणार नाही.

शेतीच्या क्षेत्रांत कोणत्याही कसोटचा लावल्या असतांना महाराष्ट्रांत झालेली प्रगति सहज अजमावतां येईल. दुबार पिकें काढण्याचें क्षेत्रफळ दहा वर्षांत ६६ टक्क्यांनी वाढलें. शेतीखाली येणारी जमीन केवळ सात टक्क्यांनीच वाढली याला अनेक नैसर्गिक कारणें आड आलीं. तरीहि अन्नधान्याच्या उत्पादनांत दहा वर्षांपूर्वीपेक्षा आता तेवीस टक्क्यांनी वाढ झाली आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे अन्नधान्यांच्या किमती पुढील काळांत अस्थिर होण्याची भीति नाही हें घ्यानांत येतें. गेल्या दहा वर्षांत छोटचा धरणांमुळे सव्वातीन लक्ष एकर अधिक जमिनीला पाणी मिळालें आणि चालू कामें पुरीं झाल्यावर जवळ जवळ आणखी दोन लक्ष एकर जमीन पाण्याखाली येईल. केवळ आठ वर्षांत विहिरींच्याच संख्येंत एक लक्ष तीन हजार इतकी वाढ झाली आहे. १९५८ ते १९६० या दोन वर्षांत २१,३६५ नव्या विहिरी खोदण्याचें ठरविलें होतें, त्याऐवजीं पुष्कळच जास्त म्हणजे ४७,३६४ विहिरी खोदून झाल्या.

द्वितीय योजनेंन तालीबांधाच्या योजनेवर (Contour bunding) विशेष लक्ष देण्यांत आलें. दहा वर्षांत तालीबांधाच्या कार्यक्रमाखाली वीस लाख एकरांपेक्षा कितीतरी अधिक जमीन आणतां आली. शिवाय सध्या चालू असलेल्या कामामुळे तिसऱ्या योजनेंत ज्याचा फायदा झालेला दिसेल अशीं अनेक उदाहरणें आहेत. सुमारें चार लक्ष एकर पडीत जमीन लागवडीखाली येईल. खार व खाजण जमीन अर्धा लक्ष एकरांपेक्षा अधिक लागवडीखाली येईल. बियांचा पुरवठा करूं शकणाऱ्या शेतांची संख्या पुष्कळच वाढेल आणि लहान लहान तुकडे असलेल्या सुमारें आठ लक्ष एकर जमिनीची तुकडेजोड झालेली असेल.

ऑक्टोबर १९६३ अखेर समाजविकास योजना सर्व राज्यभर पसरलेली असेल. समाजविकास योजनेखाली साडे-पंचवीस हजार खेडीं आणि दीड कोटि लोकसंख्या दुसऱ्या योजनेच्या अखेरीसच आलेली आहे. सहकाराच्या तत्त्वाने तर महाराष्ट्रांत चांगलें मूळ धरलेलें आहे. १९५३ पासून पुढील सात वर्षांत सहकारी संस्थांच्या संख्येंत दहा हजारांनी वाढ झाली. सहकारी संस्थांच्या सभासदसंख्येंत ६७ टक्क्यांनी वाढ झाली. संस्थांच्या खेळत्या भांडवलांत दोनशे टक्क्यांपेक्षाहि अधिक वाढ झाली. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणांत तिप्पट वाढ झाली. जमीन तारण घेऊन कर्ज देणाऱ्या बँकांनी गेल्या सात वर्षांत दसपट अधिक कर्ज दिलें. मध्यवर्ती सहकारी बँकांनी तिप्पट अधिक कर्ज दिलें.

सहकारी साखर कारखान्यांची वाढ व यश तर अतुलनीयच होतें. १९५० नंतर दहाच वर्षांत जेथे पूर्वी एक सहकारी कारखाना होता तेथे एकूण सुमारे २६,००० सभासद असलेले व सुमारे सव्वापांच लक्ष रुपये भांडवल भागरूपाने मिळविणारे

असे १८ कारखाने अस्तित्वांत आले.

गेल्या दहा वर्षांत औद्योगिक उत्पादनांतहि प्रचंड वाढ झाली. वनस्पतिपदार्थ, साखर आणि डिझेल एंजिनें यांच्यांतील वाढ नांव घेण्यासारखी होती. गेल्या दशकांत नवे कारखाने काढण्यासाठी सुमारे चारशे परवाने देण्यांत आले. अधिकृत गिरण्यांची संख्या गेल्या पांच वर्षांत दीड हजारांनी वाढली. विजेचें साहित्य, औद्योगिक यंत्रें, यंत्रांचे सुटे भाग आणि रसायनें या धंद्यांत या दृष्टीने विशेष वाढ झाली. खनिज संपत्तींतहि कोळसा व कच्चें लोखंड यांत भरघोस प्रगति झाली. गेल्या दहा वर्षांत कच्च्या लोखंडाचें उत्पादन दोन हजार टनांवरून तीन लक्ष दहा हजार टनांवर गेलें. आणि कोळशाचें उत्पादन साडेतीन लक्ष टनांनी वाढलें. आपल्या राज्यांत वापरल्या जाणाऱ्या विजेपैकी ६५ टक्के वीज औद्योगिक कामाकरिता वापरली जाते ही समाधानाची बाब आहे. गेल्या दहा वर्षांत विजेचा खप चौदाशे दशलक्ष किलोवॅट्स्‌पेक्षा अधिक वाढला.

कृषिप्रधान महाराष्ट्राला हवी असलेली रस्तेवाढहि गेल्या दहा वर्षांत तीस टक्क्यांनीं वाढली. बऱ्याचशा रस्त्यांमुळे, पूर्वीं विभक्त असलेला प्रदेश जोडला गेला. कोल्हापूर-रत्नागिरी, पनवेल-महाड, पुणें-अहमदनगर, मोहोळ-पंढरपूर, नाशिक-त्रिंबक, कल्याण-भिवंडी, अमरावती-दर्यापूर, औरंगाबाद-अजिंठा-जळगांव या महत्त्वाच्या रस्त्यांचें आधुनिकीकरण करण्यांत आलें. तसेंच स्वातंत्र्यपूर्व काळांत मोठाले पूल फक्त ४५ होते ते १९६१ अखेर ९० होतील. टाकळीजवळील भीमेवरील पूल, पेणजवळील धरमतरचा पूल, सारणखेडा येथील तापीवरील पूल; त्याचप्रमाणें जलालखेडा आणि मूर्तिजापूरजवळील पूल फारच मोठ्या प्रमाणावरील होते.

राज्याच्या उत्पन्नांतही गेल्या पांचसहा वर्षांत भरपूर वाढ करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला आहे. १९५४-५५ मध्ये महाराष्ट्रांतील उत्पन्न ९४२ कोटि रुपये होतें. अवघ्या सहा वर्षांत उत्पन्नाचें प्रमाण सहाशे कोटि रुपयांनीं वाढलें. चालू किंमत लक्षांत घेतां ही वाढ ४५ टक्के होती. याच मुदतींत किंमती पंचवीस टक्क्यांनी वाढल्या. हा घटक जमेस धरल्यास राज्याच्या उत्पन्नांत वीस टक्के निव्वळ वाढ झालेली आहे.

तिसऱ्या योजनेंतील महाराष्ट्र

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्र राज्यांत ३९० कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत. एकूण सगळ्या राज्यांच्या योजनांवर होणारा खर्च ३,८४७ कोटि रुपये आहे. औद्योगिक दृष्ट्या अत्यंत पुढारलेल्या मुंबई शहरासारख्या प्रदेशाची हेळसांड न करतां इतर भागांतील प्रादेशिक विषमता नष्ट करणें, दुसऱ्या योजनेंत साध्य केलेल्या विकासाचा त्या त्या भागांना प्रत्यक्ष फायदा कसा करून देतां येईल तें पाहणें आणि शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या उत्पादनांत अधिक विविधता व वाढ करणें हीं तीन उद्दिष्टें या योजनेंत प्रमुख असतील. योजनेंत मराठवाडा

आणि विदर्भ या प्रदेशांकडे अधिक लक्ष देण्याचें ठरविलेलें धोरण त्या त्या भागांतील जनतेच्या मनांत असलेले पूर्वीचे कोणतेहि पूर्वग्रह नाहीसे करूं शकतील. पश्चिम महाराष्ट्रांत दर माणशीं ८६ रुपये खर्च व्हावयाचे आहेत तर विदर्भ व मराठवाडा या भागांत दर माणशीं खर्च ९६ रुपयांपेक्षा थोडा अधिकच होणार आहे. जमिनीची धूप थांबविणें, मध्यम आणि लहान धरणांचे प्रकल्प हातांत घेणें आणि बीं-बियाण्यांचीं उत्पादनकेंद्रें वाढविणें या तीन कार्यक्रमांना शेतीविकास-योजनेंत महत्त्वाचें स्थान दिलें आहे. मुंबई-कोयना विभागांत वीज-पुरवठ्यांत वाढ करणें, औद्योगिक वसाहती स्थापन करणें आणि खाजगी क्षेत्रांत औद्योगिक वाढीसाठी सरकारने प्रत्यक्ष रीतीने भाग घेऊन सहकार्य करणें या कार्यक्रमांना औद्योगिक दृष्ट्या महत्त्व देण्यांत यावयाचें आहे. खनिज संपत्तीचें उत्खनन आणि संशोधन करण्याकरिता एक स्वतंत्र स्वायत्त महामंडळ आणि तसेंच एक मंडळ बृहन्मुंबईच्या आसपासच्या जमिनीचा उपयोग औद्योगिक वाढीकरिता कसा करतां येईल हें पाहण्याकरिता म्हणून, अशीं दोन मंडळें स्थापन व्हावयाचीं आहेत.

महाराष्ट्राची दुसरी योजना फक्त २०४ कोटि रुपयांची होती व आता नव्या योजनेंत ३९० कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत, ही गोष्ट नव्यानेच निर्माण झालेल्या आणि प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी कंबर कसून सिद्ध झालेल्या महाराष्ट्राच्या दृष्टीने आवश्यकच होती. परंतु ही योजना खऱ्या अर्थानें यशस्वी व्हावयाची असेल तर दोन प्रमुख कार्यक्रमांची मोठी गरज आहे. एक म्हणजे योजनेकरिता लागणाऱ्या ३९० कोटि रुपयांपैकी सरकार विविध मार्गांनी फक्त १६८ कोटि रुपये उभे करूं शकेल असा सध्याचा अंदाज आहे. याचा अर्थ असा की अजून उरलेले २२२ कोटि रुपये उभे करण्यासाठी सरकारला जनतेच्या सहकार्यानें फार मोठा प्रयत्न करावा लागणार आहे. संकल्पित प्रकल्प आणि कार्यक्रम प्रत्यक्षांत येण्यासाठी जनतेला अधिक श्रम आणि कर देण्याची तयारी ठेवावी लागणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शासनव्यवस्थेलादेखील योजनेंतील कामांची प्रचंड व्याप्ति लक्षांत घेऊन जास्तींत जास्त कार्यक्षमता आणि काटकसर साध्य करावी लागेल. महाराष्ट्र-राज्याला हव्या असलेल्या २२२ कोटि रुपयांपैकी केंद्र-सरकारकडून १७० कोटि रुपये मिळतील. परंतु तरीसुद्धा ५२ कोटि रुपये उभे करण्याकरिता राज्यसरकारला स्वतःच प्रयत्न करावे लागणार. पूर्वीच्या द्विभाषिक राज्यांत दुसऱ्या योजनेंत फक्त २४ कोटि रुपयांचीच कर-उभारणी करतां आली हें लक्षांत घेतां केवळ महाराष्ट्रांत ५२ कोटि रुपये उभे करण्यासाठी किती पराकाष्ठा आणि दृढनिश्चय लागेल व अनावश्यक खर्चांत किती काटकसर करावी लागेल याची कल्पना येईल.

उत्पन्नाचीं साधनें

३९० कोटि रु. ची तिसरी योजना अंमलांत आणतांना केंद्रसरकारची जरी

भरघोस मदत मिळणार असली तरी राज्य-सरकारनेहि स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. विद्यमान करव्यवस्थेप्रमाणे ३९० कोटि रुपयांपैकी राज्यसरकार १६८ कोटि रुपये उभे करूं शकणार असें पूर्वीं लिहिलें आहे. ते कसे तें पुढे दिलें आहे.

उत्पन्नाचें माध्यम	(रक्कम कोटि रुपयांत)
(१) १९६०–६१ मधील करव्यवस्थेप्रमाणे चालू जमाखर्चांतून दर वर्षी राहणाऱ्या शिलकी रकमेपैकी ...	३०·६
(२) अल्पबचत योजनेंतून मिळवावयाचे ...	६६·८
(३) जनतेकडून गोळा करावयाचें कर्ज ...	३६·९
(४) सरकारी उद्योगव्यवसायांतून मिळणारें उत्पन्न* ...	९·४
(५) इतर	२४·३
एकूण	१६८·०

वरील तक्त्यावरून खुद्द जनतेने सरकारला किती आर्थिक सहकार्य करावयाचें आहे याची जशी कल्पना येते त्याचप्रमाणे सरकारलाही शासनव्यवस्थेंत जास्तींत जास्त काटकसर व कार्यक्षमता निर्माण करून किती प्रयत्नपूर्वक पैसा उभा करावा लागणार आहे याचीही आपणांस जाणीव व्हावयास हवी. केंद्रसरकारने नेमलेलें तिसरें फिनॅन्स कमिशन केंद्रसरकारच्या राज्यसरकारांना द्यावयाच्या उत्पन्नांतून किती वांटा देतें यावरही राज्याच्या उत्पन्नाचें प्रमाण अवलंबून आहे. राज्याची भांडवली संपत्तिहि हळूहळू वाढत आहे. पहिल्या योजनेंत भांडवली संपत्ति फक्त २९ कोटि रुपये होती. दुसऱ्या योजनेंत ती ११५ कोटि रुपये झाली. तिसऱ्या योजनेंत सरकारी इमारतींवरील गुंतवणूक जमेस धरून ती १३६ कोटि रुपयांपेक्षा निश्चितच कमी नसेल. सरकारी क्षेत्रांतील उद्योगव्यवसायांसाठी काढावयाच्या कॉर्पोरेशन्स आणि जमीनविकासासाठी निघणाऱ्या बँका या दोन्हींकडून तिसऱ्या योजनेंत लागणाऱ्या भांडवलपुरवठ्यास बरेंच साहाय्य होईल असा सरकार प्रयत्न करणार आहे. कृषिक्षेत्रांतील कर्जविषयक गरजा सहकारी पतपेढ्या स्वतःच्या पायावर उभ्या राहून अधिकाधिक प्रमाणांत भागवूं लागतील हा अंदाज खरा ठरल्यास सरकारचा शेतीविषयक कार्यक्रमाचा बोजा त्या मानाने कमी होईल.

तिसऱ्या योजनेंत शक्य तेवढ्या सर्व मार्गांनी साधनसंपत्ति व भांडवल उभें व्हावें म्हणून सरकार जुन्या पण अनावश्यक अशा खर्चाच्या प्रथा मोडावयास सिद्ध आहे. उदाहरणार्थ, सरकारी खात्यांतील विलंब लावणाऱ्या कामाच्या पद्धतींत आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न चालू राहील आणि शासनव्यवस्था अधिक कार्यक्षम व जनताभिमुख होईल असा विचार अर्थमंत्री श्री. शेषराव वानखेडे यांनी

*इलेक्ट्रिसिटी बोर्डाकडून आणि रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनकडून होणारा पांच वर्षांतील अंदाजें नफा.

१९६१–६२ चें अंदाजपत्रक सादर करतांना व्यक्त केला. कित्येक खात्यांत अजून पुनर्रचना व्हावयाची आहे. उद्योगखात्यांत ती यापूर्वींच झाली आणि तींत एक वेगळा विकास-विभाग निर्माण करण्यांत आला. हा विभाग लघु व कुटिर उद्योगांच्या विकासाकडे विशेष लक्ष देईल. खालच्या थरापर्यंत सहकारी खात्याला अधिकाधिक जबाबदाऱ्या पेलतां याव्यात म्हणून सहकारी खात्यांत पुनर्रचना होत आहे. खाणकाम व भूगर्भशास्त्र हें खातेंही पुनर्रचित होणार आहे. जमा – खर्च, मांडणी व त्याबाबतचे निर्णय झपाट्याने घेतां येतील. अशा तऱ्हेने अर्थखात्यांतही फेरबदल व्हावयाचे आहेत. हिशेबखात्यांत खास अधिकारी-वर्ग स्वतंत्रपणें तयार केला जावयाचा आहे.

समारोप

आतापर्यंत आपण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांचा तपशीलवार विचार केला. या प्रकरणांत महाराष्ट्राच्या तिसऱ्या योजनेचेंही समीक्षण केलें. या सर्वांवरून सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर सत्तारूढ होणाऱ्या सरकारवर जनतेचें हित लक्षांत घेऊन जबाबदारीने राज्यकारभार करण्याची केवढी मोठी जबाबदारी आहे हें लक्षांत येतें. अशा वेळीं साहजिकच सत्तारूढ होणारें नवें सरकार अनुभवी, स्थिर, सुसंवादी, प्रागतिक व आधुनिक विचारांचें, स्वार्थत्याग करून झिजणाऱ्या सभासदांचें व विश्वासार्ह असावें असेंच सर्व नागरिकांना वाटणार. गेल्या दशकांत सत्तारूढ पक्षाने या दृष्टीने आपली जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली ही फारच समाधानाची गोष्ट आहे. महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर श्री. यशवंतराव चव्हाण यांनी मोठ्या कुशलतेने राज्यकारभार आखून महाराष्ट्राची प्रतिष्ठा वर आणली. केंद्रीय योजनेच्या चौकटींत आपली प्रादेशिक योजना यशस्वी व्हावयाची असल्यास आपल्या गरजा व महत्त्वाकांक्षा आणि आपली उमेद नियोजनमंडळाला पटवून देणारा भारतीय कीर्तीचा नेता राज्याला मिळाला तर कार्यसिद्धि व अपेक्षा-पूर्ति झपाट्याने होणार हें उघड आहे. राज्यांतील अंतर्गत राजकीय व सामाजिक वातावरण एकजिनसीपणाचें असावें म्हणजेच आर्थिक योजना सुरळीत कार्यवाहींत येतात असेंच अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला वाटणार. सबंध देशाच्या योजनेच्या यशस्वितेवर आपली प्रादेशिक योजना अवलंबून असणार हेंहि तितकेंच खरें आहे. राष्ट्रीय योजनेंत प्रत्यक राज्याचा, त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या योजनेचाहि विचार केलाच आहे.

महाराष्ट्रांतील अपेक्षित आर्थिक विकासाचें अगदी धावतें अवलोकन केल्यावर एक गोष्ट प्रत्ययाला येते. व ती म्हणजे पद्धतशीर प्रयत्न, चिकाटी, कष्ट व कल्पकता यांच्या जोरावर उद्योगधंद्यांच्या दृष्टीने भारतांत दुसऱ्या क्रमांकाचें असलेलें महाराष्ट्र राज्य केवळ आत्तापर्यंतच्या बौद्धिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक यशामुळे धुंद व गाफील होऊन न बसतां समतोल प्रादेशिक विकास, आर्थिक समता आणि

खेडुतांनाहि उपयोगी पडणारे कृषि–उद्योगधंदे या कार्यक्रमांवर भर देऊन कष्ट करील तर तें सर्वांत प्रगत राज्य होणें कठीण नाही. पण त्यासाठी आर्थिक विकासाची उपयुक्तता व आवश्यकता प्रत्येक महाराष्ट्रीयाला मनोमन पटली पाहिजे. अर्थविकासाचा मंत्र हा कॉलेजमधल्या वर्गामधून अगर केवळ कारखानदारांच्या संघटनांमधूनच ऐकू येऊन भागणार नाही. महाराष्ट्रांतल्या घरोघरीं तो निनादला पाहिजे. एकेकाळीं ज्ञानदेव–तुकाराम आदि संतांच्या वाणीने महाराष्ट्र दुमदुमला. विद्यमान विज्ञानयुगांत ' नवनवे आर्थिक कार्यक्रम उमेदीनें अमलांत आणूंया ' या घोषणेने महाराष्ट्राचा कानाकोपरा घुमला पाहिजे. महाराष्ट्राला काळाचें हेंच आव्हान आहे.

दृष्टिक्षेपांत महाराष्ट्र

१. लोकसंख्या (१९५१) ... ... ३ कोटि २० लक्ष

लोकसंख्येची व्यवसायवार विभागणी (१९५१)	व्यवसाय	महाराष्ट्रांतील टक्केवारी	भारतांतील टक्केवारी
	शेती	६४	७०
	बिगर शेतीउत्पादन	१३	११
	व्यापार	७	६
	दळणवळण	२	२
	इतर	१४	११
	एकूण	१००	१००

२. साक्षरताप्रमाण (१९५१) ... एकूण लोकसंख्येच्या ३२ टक्के

३. उत्पन्न (१९५४–५५) ...	महाराष्ट्रांतील :	भारतांतील :
एकूण (वर्षांचें)	९४२ कोटि रुपये	९६१० कोटि रुपये
दर माणशीं (वर्षाचें)	२७८ रुपये	२५४ ,, ,,

४. सहकारी संस्थांची संख्या (१९५६) २४८९६ ...

५. जॉइंट स्टॉक कंपन्या (१९५६) ४३१६ ...

६. अधिकृत गिरण्यांची संख्या (१९५७) ८०३६ ...

७. वीज (दर माणशीं)	महाराष्ट्रांतील निर्मिति	... ७१	किलोवॅट
	भारतांतील निर्मिति	... २७	,,
	महाराष्ट्रांतील खप	... ६०	,,
	भारतांतील खप	... २२	,,

८. क्षेत्रफळ (चौ. मैल)	... ...	१,१८,४५९
गावांची संख्या	... ...	३७३
खेड्यांची संख्या	... ...	३५,५२६
एक लाख वस्तीवरील शहरें (१९५१)	...	६
९. शिक्षण (१९५८–५९)	महाविद्यालयें ...	१३६
	दुय्यम शाळा ...	१,७२१
	प्राथमिक शाळा	३१,७९८

१०. बँकांच्या एकूण कचेऱ्या (१९५७) ८१० कचेऱ्या

शेड्यूल्ड बँका	४६३	,,
नॉन-शेड्यूल्ड बँका	४८	,,
सहकारी बँका	२९९	,,

११. दळणवळण लोहमार्ग २६५६ मैल

रस्ते : पक्के	१३२६० मैल
कच्चे	७५५४ ,,
एकूण	२०८१४ मैल
मालवाहू गाड्या (लॉरीज्)	१८७८९
उतारूवाहू बसेस्	४६२२
ऑटो रिक्शा	३०८
भाड्याच्या टॅक्सीज्	४६४०
खाजगी मोटार गाड्या	४३६१९
रुग्णवाहिका	१२७